म. ग्रं. सं. ठाणे
ेपर
र. नं.
१६३०

# ...ी लक्ष्मीबाई
# झांशी



REFBK-0004114

लेखक
घनश्याम बाळकृष्ण
चिपळूणकर

GOKHALE

बालबोध शिक्षणमाला—पुस्तक नंबर ५

# महाराणी लक्ष्मीबाई—झांशी


लेखक व प्रकाशक

**घनश्याम बाळकृष्ण चिपळूणकर**

शिक्षक, न्यू इंग्लिश स्कूल व सेवासदन.

घर नं. ८९९ सदाशिव पेठ, पुणें, नं. २



द्वितीयावृत्ति—१९३०



REFBK-0004114

[ सर्व प्रकारचे हक्क लेखकांचे स्वाधीन ]


किंमत ८ आणे

मुद्रक
अनंत सखाराम गोखले,
'विजय' प्रेस, ५७० शनवार,
पुणें नंबर २.

# लेखकाचे दोन शब्द

आमच्या बालबोध शिक्षणमालेंत 'इतिहास' या विषयावर श्री० **नारायणराव पेशव्यांचा खून** आणि **सवाई माधवरावांचें लग्न** हें पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर आज **महाराणी लक्ष्मीबाई—झांशी** हें लहानसें पुस्तक प्रसिद्ध करण्याचा योग येत आहे. राणीसाहेबांचें बालपण व शिक्षण, त्यांस सोसावे लागणारे संसारांतील कठोर आघात, त्यांची दिनचर्या, त्यांच्या ठिकाणीं असणारें प्रसंगावधान, शौर्य व धाडस, त्यांचा तो करारीपणा आणि काटकपणा इत्यादि अनेक प्रसंग या चरित्रांत असे आहेत कीं, मी मी म्हणणाऱ्या राजकारणी पुरुषांचीही तरवार आणि लेखणी राणीसाहेबांपुढें फिकी पडेल. आपल्या समाजांतील स्त्री-पुरुषांच्या ठिकाणीं जो पंगूपणा आला आहे— विशेषतः स्त्रियांच्या ठिकाणचें धाडस अगदीं नाहींसें होऊन त्या ज्या अगदीं दीन होऊन गेल्या आहेत, एखाद्या बदमाषानें धक्का दिला असतां त्याचा प्रतिकार करण्याचेंही धाडस उत्पन्न होऊं नये, अशी जी आपल्या स्त्री-समाजाची स्थिति झाली आहे; ती सुधारण्याला राणीसाहेबांचें चरित्र मदत करील असें वाटल्यावरून, हें पुस्तक बालवाचकांपुढें ठेवीत आहें.

हें पुस्तक लिहिण्याच्या कामीं रा० रा० पारसनीस व वैद्य यांच्या पुस्तकांचा, ज्ञानकोशाचा आणि माझ्या अनेक मित्रांचा मला उपयोग झाला आहे. अर्थात् त्या सर्वांचा लेखक आभारी आहे. मोठमोठ्या लोकांनीं साधनसामुग्री जुळवावी आणि त्या सामानाची शिक्षकांनीं टुमदार इमारत बांधून आंत बागबगीचा तयार करावा हें योग्यच होय. माझी कृति पालकांना व मुलांमुलींना पसंत होईल अशी आशा आहे.

माझ्या या **बालबोध शिक्षणमालेला** अनेक विद्वान् व श्रीमंत

लोकांनीं **यथाशक्ति मदत** केली आहे. त्याबद्दल मी त्यांचा फार **आभारी** आहें. ह्यापुढेंही माझ्या मालेकडे सर्व लोक आपलेपणानेंच पाहातील अशी खात्री आहे. **इंदूर** ग्रंथोत्तेजक-मंडळानें ह्या पुस्तका-बद्दल मला २५ रुपयांचें **बक्षिस** दिलें आहे याबद्दलही मी मंडळाचा फार आभारी आहें.

पुणें **भारत-इतिहास-संशोधक-मंडळानें** राणीचा व **नाना-साहेबांचा** असे दोन **फोटो** दिले; व रा० रा० एम् बी. गर्दे, आर्क्यलॉजिकल सुपरिंटेंडेंट **ग्वाल्हेर** ह्यांनीं ग्वाल्हेरच्या किल्ल्याचा व राणीच्या छत्रीचा असे दोन फोटो पाठविले त्याबद्दलही मी त्यांचा फार ऋणी आहें.

मे० एज्यु० इन्स्पेक्टरसाहेब **मध्यभाग**-मुंबई-इलाखा ह्यांनीं हें पुस्तक **लायब्रऱ्यांकरितां** मंजूर केलें आहे. त्याचप्रमाणें **वऱ्हाड** व **नागपूर** येथील शाळाखात्यानेंही हें पुस्तक मुलींच्या व्हरनॅक्युलर **सातव्या** इयत्तेकरितां **टेक्स्ट्-बुक** म्हणून मंजूर केलें आहे. शिवाय **लायब्रऱ्या** आणि **बक्षिसें** ह्यांकरितांही **मंजुरी दिली आहे**. त्या-बद्दल **दोन्ही** शाळाखात्यांचा मी **फार आभारी** आहें.

माझ्या **ह्या** पुस्तकांत मीं आतां बरीच सुधारणा केली आहे. करितां **मे० एज्युकेशनल इनस्पेक्टरसाहेब मध्यभाग–मुंबई इलाखा** ह्यांस माझी अशी नम्र विनंति आहे कीं, आतां हें पुस्तक **बक्षिसें** व **पुरवणीवाचन** ह्या **दोनही सदरांत** चालू करण्यास त्यांनीं परवानगी द्यावी, व तशी ती दिली तरच माझ्या श्रमाचें **चीज** झालें असें होईल.

शेवटीं **विजय प्रेसचे** मालक रा० **अनंत सखाराम गोखले**, ह्यांनीं हें पुस्तक शक्य तितकें **सुबक** आणि **अल्प मुदतींत** छापून दिलें ह्याबद्दलही मी त्यांचा फार ऋणी आहें.

पुणें,<br>ता. १।१०।३०.

**घनश्याम बाळकृष्ण चिपळूणकर**

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १ झांशी | १ |
| २ महाराज गंगाधरराव | ३ |
| ३ मोरोपंत तांबे | ५ |
| ४ माझ्या नशिबीं दहा हत्ती ! | ६ |
| ५ मनूबाईचें लग्न | ७ |
| ६ सुखाचा संसार | ८ |
| ७ आकाश कोसळलें ! | ९ |
| ८ झांशी खालसा ! | ११ |
| ९ मेरा झांशी देएंगा नहीं | १२ |
| १० मुंज | १३ |
| ११ नानासाहेब | १४ |
| १२ झांशीची फौज बिथरली | १७ |
| १३ कोण बंडखोर ? | १९ |
| १४ तीन लाख रुपये | २० |
| १५ आतां झांशींत कोण ? | २१ |
| १६ नथेखां | २२ |
| १७ कडक बिजली ! | २३ |
| १८ झांशी १८५७ | २४ |
| १९ आतां राणीसाहेब | २६ |
| २० दर्शनाचा थाट | २७ |
| २१ कांहीं गोष्टी | २८ |
| २२ दहा महिने | २९ |
| २३ चूक कोणाची ? | ३१ |
| २४ हळदकुंकू | ३४ |
| २५ युद्धाची तयारी | ३५ |
| २६ पहिली सलामी | ३६ |
| २७ दुसरी सलामी | ३६ |

| विषय | पृष्ठ |
| --- | --- |
| २८ तिसरी सलामी | ३७ |
| २९ पुन्हा कडक बिजली ! | ३८ |
| ३० आगीचा डोंब | ३९ |
| ३१ भयंकर स्वप्न | ४० |
| ३२ तात्या टोपी | ४१ |
| ३३ अकरावा दिवस उजाडला | ४२ |
| ३४ पुन्हा फितूर | ४४ |
| ३५ तटावर इंग्रज | ४४ |
| ३६ बिजन | ४६ |
| ३७ जोहार | ४७ |
| ३८ हरहर महादेव ! | ४८ |
| ३९ हातावर तुरी ! | ४९ |
| ४० यमाचा दरबार | ५१ |
| ४१ झांशींत लूट | ५२ |
| ४२ झांशींत शांतता | ५३ |
| ४३ झांशी ते काल्पी | ५४ |
| ४४ कुंचची लढाई | ५६ |
| ४५ काल्पीचा पाडाव | ५७ |
| ४६ राणीचें राजकारण | ५९ |
| ४७ पेशव्यांचें पत्र | ५९ |
| ४८ शिंदेसरकारचा हल्ला | ६० |
| ४९ राणीसाहेबांचा पराक्रम | ६२ |
| ५० औट घटकेची पेशवाई | ६३ |
| ५१ तोंडीस तोंड | ६४ |
| ५२ लढाईची तयारी | ६६ |
| ५३ शेवटची लढाई | ६८ |
| ५४ राणीसाहेबांचा शेवट | ७० |
| ५५ दामोदरराव | ७२ |
| ५६ नवी माहिती | ७५ |
| ५७ पोवाडा | ७८ |

# महाराणी-लक्ष्मीबाई-झांशी

झांशी हें शहर उत्तर हिंदुस्थानामध्यें बुंदेलखंड प्रांतांत आहे. बुंदेलखंडांत राहाणाऱ्या लोकांना बुंदेले असें म्हणतात मुंबईपासून झांशी ७०० मैल दूर आहे. झांशी हें शहर हल्लीं झांशी जिल्ह्याचें मुख्य ठिकाण असून त्या ठिकाणीं इंग्रज सरकारची लष्करी छावणी आहे. पितळेचीं भांडीं करण्याचे कारखानेही येथें आहेत. झांशी हें रेल्वेचें मोठें स्टेशन असल्यामुळें व्यापारही फार मोठा चालतो. ह्या प्रांतांत गहूं, हरबरा, ज्वारी वगैरे पिकें होतात. झांशीच्या भोंवतीं ग्वाल्हेर, दतिया, ओरछा हीं संस्थानें आहेत. दिल्लीपति **पृथ्वीराज चव्हाण** ह्यानें इ० सन १२००च्या वेळीं ह्या प्रांतावर आपली सत्ता प्रस्थापित केली होती. पुढें गुलामवंशीय राजे कुतुबुद्दिन व अलतमश ह्यांनीं ह्या प्रांतावर स्वाऱ्या केल्या. नंतर कांहीं दिवस ह्या प्रांतांत खंगार जातीच्या रानटी लोकांनीं राज्य केलें. नंतर बुंदेलखंडचे रहिवासी जे बुंदेले लोक त्यांची सत्ता वाढूं लागली. मोगल बादशहा **बाबर** हिंदुस्थानांत आला त्यावेळीं बुंदेलखंडावर बुंदेले लोकांपैकींच रुद्रप्रतापाची सत्ता चालत होती. बाबरानें रुद्रप्रतापाची सत्ता मान्य केली. रुद्रप्रतापाचा मुलगा भारतीचंद ह्यानें इ० सन १५३१ त ओरछा शहर वसविलें. रुद्रप्रतापाच्या वंशांतील दुसऱ्या एका शाखेनें चंदेरीचें राज्य स्थापिलें. पुढें ओरछाचा राजा **बीरसिंग** बुंदेला ह्यानें झांशी हें नवीन शहर वसवून तेथील प्रचंड किल्लाही त्यानेंच बांधिला. बीरसिंग मोठा शूर व साहसी होता. त्यानें सलीमच्या सांगण्यावरून अकबराचा प्रधान

**झांशी**

अबुलफजल ह्यांस ठार मारिलें; म्हणून अकबरानें बुंदेलखंडावर स्वारी करून तो प्रांत आपल्या राज्यास जोडला. अकबराच्या वेळेपासून औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत ह्या बुंदेलखंडावर दिल्लीच्या बादशहांचें राज्य होतें. औरंगजेब वारल्यावर इ० सन १७१० च्या सुमारास औरंग-जेबाचा मुलगा बहादुरशहा ह्यानें झांशीसकट बुंदेलखंड प्रांत छत्रसाल नांवाच्या राजाला जहागीर म्हणून दिला.

**छत्रसाल** रजपूत असून हिंदुधर्माचा अभिमानी होता. त्यानें आपलें राज्य बुंदेलखंडावर चांगल्या रीतीनें चालविलें होतें; त्यामुळें त्याची प्रजा फार सुखी होती. छत्रसाल हा आपल्या प्रजाजनांना फार प्रिय झाला होता. ही गोष्ट न खपल्यामुळें अलाहाबादेचा मोगल सुभेदार महंमदखान बंगष ह्यानें बुंदेलखंडावर स्वारी केली. ह्या वेळीं छत्रसाल अगदीं वृद्ध झाला होता; म्हणून तो मोठ्या विवंचनेंत पडला. दक्षिणेंत **शाहूमहाराज** व पहिले **बाजीराव** पेशवे हे हिंदुधर्मी लोकांचे कैवारी आहेत, ते आपणांस ह्या संकटसमयीं मदत करतील असें वाटून छत्रसालानें बाजीरावास गौरवपर व कविताबद्ध असें एक पत्र पाठविलें. ह्या वेळीं शनिवारवाडा बांधण्याचें काम चाललें होतें, म्हणून बाजीराव पुण्यास होते. त्यांस हें पत्र मिळतांच शाहूमहाराजांच्या परवानगीनें बुंदेलखंडाच्या स्वारीचा बेत ठरवून सर्व सरंजामासह एका सुमुहूर्तावर बाजीराव पेशव्यांची स्वारी बाहेर पडली. पुणें, चाकण, अहमदनगर, बऱ्हाणपूर ह्या रस्त्यानें मजल दरमजल करीत सुमारें पाऊण महिन्यानें मराठ्यांचें सैन्य बुंदेलखंडांत येऊन धडकलें. महंमदखान बंगष व मराठे ह्यांच्या लढाया होऊन, महंमदखान बंगष पराभूत होऊन पळून गेला. छत्रसालानें बाजीरावास नजर-नजराणा व स्वारीचा खर्च तर दिलाच; पण शिवाय बाजीरावास आपला तिसरा मुलगा मानून छत्रसालानें आपल्या तीन कोटि उत्पन्नाच्या

मुलुखापैकीं एक कोटीचें राज्य त्यास दिलें. बाजीरावानें त्या एक कोटीच्या राज्यापैकीं चाळीस लक्षांचा मुलूख **गोविंदपंत बुंदेले** ह्यांस दिला. ह्या गोविंदपंतांचें आडनांव **खेर** असें होतें. हे गोविंदपंत पूर्वी बाजीरावाकडे शागीर्द होते. माणसांची योग्य पारख करण्यांत बाजीराव मोठे कुशल होते. त्यांनीं ह्या गोविंदपंतांची हुषारी व शौर्य पाहून त्यांस सरदारी दिली होती. राहिलेल्या मुलुखापैकीं आणखी चाळीस लक्षांचा मुलूख मस्तानीचा मुलगा **समशेर बहादर** ह्यास दिला. राहिलेला वीस लक्षांचा मुलूख पेशव्यांनीं आपणाकडे ठेविला. हा जो वीस लक्षांचा मुलूख तोच त्या वेळचा पेशव्यांचा झांशी प्रांत होय. नंतर बुंदेलखंडाची स्वारी आटोपून बाजीराव पुण्यास आले.

ह्या झांशी प्रांताचा वसूल गोळा करण्याकरितां पुण्याहून पेशवे आपला सुभेदार पाठवीत असत. त्याप्रमाणें **मल्हार कृष्ण** ह्या नांवाच्या सुभेदारास पेशव्यांनीं पाठविलें असतां, ओरछाच्या बुंदेल्यांनीं त्याचा खून करून शिवाय ह्या मल्हार कृष्णाचे दोन मुलगे, जांवई वगैरे सर्व कुटुंबच कपटानें ठार मारिलें. तेव्हां पेशव्यांनीं पुण्याहून **नारोशंकर** राजेबहादर ह्यांस तिकडे पाठविलें. त्यांनीं ओरछाच्या राजास कैद करून त्याचा राजवाडा जमीनदोस्त करून टाकिला व त्या राजधानीच्या जागेवर गाढवांचा नांगर फिरविला. इ० सन १७५६ पर्यंत राजेबहादर ह्यांनीं झांशी प्रांताचा बंदोबस्त ठेविला होता. नंतर ते पुण्यास आले. पुढें निरनिराळे सरदार ह्या झांशी सुभ्यावर जाऊं लागले. पुढें पुढें झांशी सुभ्याचें उत्पन्न नीट येईनासें झालें. एकदां एका गोसावी राजानें बंड करून मोठी धामधूम उडवून दिली. तेव्हां पेशव्यांनीं जुन्नर सुभ्याचे सुभेदार **रघुनाथ हरि नेवाळकर** ह्यांस इ०सन १७७०त झांशीच्या बंदोवस्तास पाठविलें. हे नेवाळकर मोठे शूर व दक्ष असल्यामुळें त्यांनीं

**महाराज गंगाधरराव**

सर्व बंडखोर लोकांचा पराभव करून मराठ्यांची सत्ता पुन्हा प्रस्थापित केली. तेव्हां पेशव्यांनीं रघुनाथ हरि नेवाळकर ह्यांसच झांशी प्रांताची सुभेदारी वंशपरंपरा करून दिली.

नेवाळकर ह्यांचे पूर्वज रत्नागिरी जिल्ह्यांत राजापुराजवळ **पावस** ह्या ठिकाणीं पूर्वीं राहात असत. पेशवाईच्या आरंभास हें घराणें खानदेशांत येऊन राहिलें. नंतर पेशवे व मल्हारराव होळकर ह्यांच्या सैन्यांत त्यांस सरदारीच्या जागा मिळाल्या. ह्या मंडळींपैकींच वर सांगितलेले रघुनाथ हरि नेवाळकर हे एक होत. हे इ० सन १७९६मध्यें वारले. नंतर त्यांचे बंधु **शिवरावभाऊ** ह्यांस झांशीची सुभेदारी मिळाली. ह्या वेळीं पुण्यास दुसऱ्या बाजीरावांची कारकीर्द चालू होती. ह्याच सुमारास बुंदेलखंडावर इंग्रजांनीं चाल केली. पण शिवरावभाऊच्या सल्लयानें सर्व बुंदेले राजे एक झाल्यामुळें इंग्रजांचा इलाज चालेना. इतकेंच नव्हे तर त्यांचा पराभवही झाला. त्यामुळें इंग्रज लोकांवर व बुंदेले लोकांवर शिवरावभाऊंचा वचक बसला. इ०सन १८०३त इंग्रजांनीं शिवरावभाऊशीं दोस्तीचा तह केला. इ०सन १८१४मध्यें संसाराचा त्याग करून शिवरावभाऊंनीं काशीस जाऊन जलसमाधि घेतली. नंतर त्यांचे नातू रामचंद्रराव गादीवर बसले. १८१७ मध्यें दुसरे बाजीराव पेशवे व इंग्रज ह्यांच्यामध्यें पुण्यास वेटावर एल्फिन्स्टनसाहेबांच्या बंगल्यांत तह झाला. त्या तहामुळें सर्व बुंदेलखंडाची मालकी इंग्रजांस मिळाली. त्यामुळें झांशी प्रान्तही इंग्रजांच्या मालकीचा झाला. तरी पण करार-मदार होऊन नेवाळकर घराण्याकडेच झांशी संस्थान वंशपरंपरा ठेवावयाचें असें इंग्रजांनीं कबूल केलें व तसा तहही झाला. शिवरावभाऊ वारल्यावर त्यांच्या मागून त्यांचे नातू रामचंद्रराव गादीवर बसले. ते निपुत्रिक होते. म्हणून त्यांनीं आपल्या घराण्यांतीलच रघुनाथराव नांवाच्या एका मुलास

दत्तक घेतलें होतें. हा रघुनाथराव दुर्व्यसनी निघाल्यामुळें संस्थानाला फार कर्ज झालें. तेव्हां इंग्रजांनीं संस्थानचा कारभार आपल्या हातीं घेतला.

हा रघुनाथराव इ० सन १८३८ त वारला. त्यास औरस पुत्र नसल्यामुळें शिवरावभाऊंचा धाकटा मुलगा **गंगाधरराव** ह्यास इंग्रजांनीं गादीचा मालक ठरविलें. गंगाधररावांशीं नवा तह करून झांशी संस्थानची मुखत्यारी इंग्रजांनीं त्यांस दिली. ह्या नव्या तहाच्या योगानें इंग्रजांची तैनाती फौज झांशी संस्थानाला पोसावी लागली व त्या फौजेच्या खर्चाकरितां झांशी संस्थानापैकीं सुमारें सव्वादोन लक्षांचा मुलूख इंग्रजांनीं तोडून घेतला. अशा तऱ्हेनें गंगाधरराव हे इ० सन १८४२ त झांशी संस्थानचे मालक झाले. त्यांच्याशींच आपल्या चरित्रनायिका ज्या **महाराणी लक्ष्मीबाईसाहेब** यांचा विवाह झाला होता.

**मोरोपंत तांबे**

सातार्‍याजवळ वांईस कृष्णराव तांबे ह्या नांवाचे एक गृहस्थ पेशवाईमध्यें मामलतीच्या जाग्यावर होते. त्यांचे नातू **मोरोपंत तांबे** हे दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दींत पुण्यास राहात असत. दुसऱ्या बाजीरावाचे धाकटे बंधु चिमाजीआप्पा ह्यांची व मोरोपंतांची फार मैत्री होती. इ० सन १८१८ मध्यें दुसरे बाजीराव जे पळाले ते ब्रह्मावर्त येथें जाऊन राहिले. त्यांस दरसाल ८ लक्ष रुपये इंग्रजांनीं पेन्शन दिलें. चिमाजीआप्पा यांस पुणें व पुण्याच्या भोंवतालचा सुमारें २० लक्षांचा मुलूख देण्यास इंग्रज तयार होते; पण चिमाजीआप्पा ह्यांनीं ती लुळीपांगळी पेशवाई नाकारली आणि ते काशीस जाऊन राहिले. ह्या चिमाजीआप्पांबरोबर कारभारी म्हणून मोरोपंत तांबेही काशीस गेले. बरोबर त्यांची बायको **भागीरथीबाई** होती. तेथें इ० सन १८३९मध्यें मोरोपंत

तांबे ह्यांस कन्यारत्न झालें. बारशाचा मोठा समारंभ होऊन मुलीचें नांव **मनूबाई** ठेविलें. वाचकहो ! ह्याच त्या मनुबाई आपल्या चरित्र-नायिका असून पुढें महाराणी झालेल्या दिसतील; आणि ह्याच त्या मनूबाई इंग्रजांशीं लढलेल्या दिसतील आणि ह्याच त्या मनूबाई हिंदु-पदपादशाहीकरितां लढतां लढतां धारातीर्थीं पतन पावलेल्या दिसतील.

**माझ्या नशिबीं दहा हत्ती !**

मनूबाईचा जन्म झाल्यावर ३–४ वर्षांनीं चिमाजीआप्पासाहेब वारल्यामुळें मोरोपंतांचा काशीवास सुटला व ते ब्रह्मावर्तास बाजी-राव साहेबांकडे येऊन राहिले. इतक्यांत बिचाऱ्या मनूबाईची आईच वारली. त्यामुळें मनूबाईचा सर्व भार मोरोपंतांवर येऊन पडला. मनूबाई दिसायला सुंदर, रंगानें गोरी, डोळे पाणीदार, बुद्धीची चलाख अशी असल्या-मुळें बापाचीच काय पण प्रत्येकाची आवडती झाली होती. मनु-बाईच्या अंगीं असलेल्या वरील गुणांमुळें तिला वाड्यांतील सर्व लोक **छबेली** असें म्हणत. बाजीराव पेशव्यांचे दत्तक मुलगे **नानासाहेब, रावसाहेब, बाळासाहेब** हे ह्या वेळीं लहानच होते. साहजिकच ह्या मुलांचा व मनूबाईचा भावाबहिणीचा स्नेह जडला. ह्या मुलांस लिहिणें, वाचणें, दांडपट्टा, बोथाटी, घोड्यावर बसणें, हत्तीवर बसणें, भाला-फेंक वगैरे सर्व प्रकारचें शिक्षण ज्या वेळीं मिळत असे त्या वेळीं मनूबाई तिथेंच असल्यामुळें तिलाही हें शिक्षण आयतेंच मिळत असे. मनूबाई लहान असतांच तिला पतंग उडविणें, कसरत करणें, मुलीं-मध्यें आपण राणी होणें, खेळांत मुलींस दंड करणें, अशा तऱ्हेचे खेळ आवडत असत. नानसाहेब घोड्यावर बसले, कीं हिनें घोड्या-वर बसावें, नानासाहेब हत्तीवर बसले कीं, हिनें हत्तीवर बसण्या-करितां हट्ट करावा–त्या अर्भकाला–त्या पांच सहा वर्षांच्या पोरीला दुजाभाव कोठून असणार ! एके दिवशीं नानासाहेब हत्तीवर बसले

तेव्हां मनूबाईही हत्तीवर बसण्याकरितां हट्ट करूं लागली. तिला बसण्याकरितां स्वतंत्र हत्ती हवा होता. ती कांहीं केल्या ऐकेना. मोरोपंत अगदीं त्रासून म्हणाले, " छबेले, तुझ्या नशिबीं हत्ती कोठून येणार ! " तेव्हां तिनें उत्तर दिलें कीं, " माझ्या नशीबीं एकच काय पण असे दहा हत्ती आहेत ! "

अशा तऱ्हेनें मनूबाईचें बालपण आई वारल्यानंतर मोठ्या सुस्थितींत व श्रीमंतींत गेल्यामुळें, ही सात-आठ वर्षांची मुलगी थोडी मोठी दिसूं लागली. त्यावेळच्या पद्धतीप्रमाणें मोरोपंतांना तिच्या लग्नाची मोठी काळजी पडली. जो तो मोरोपंतांना हंसावयास लागला. श्रीमंत बाजीरावसाहेबांच्या बायका व मुली आपआपसांत कुजबुजूं लागल्या, " अगबाई, केवढी ही मनू वाढली, आतां तिचें लग्न केलेंच पाहिजे. मुलगी वाढवावयाची वाढवावयाची म्हणजे तिला कांहीं मर्यादा आहे कीं नाहीं ? " अशा तऱ्हेचीं रिकामपणाचीं श्रीमंती बोलणीं, बायकाबायकांत सुरू झालीं.

**मनूबाईचें लग्न**

हळुहळू ही गोष्ट श्री० बाजीरावसाहेबांपर्यंत पोहोंचली. मोरोपंतांनीं मुलीला पुष्कळ स्थळें पाहिलीं, पण कोठेंच जमेना. जो जो ज्योतिषी भेटेल त्यास मनूबाईचें टिपण दाखवावें, व मुलीच्या नशिबीं राजयोग आहे, असें ज्योतिष्यांनींही सांगावें; पण कोठेंच जमूं नये इतक्यांत झांशीचे महाराज **गंगाधरराव** ह्यांची पहिली बायको **रमाबाई** वारल्यामुळें, ते दुसऱ्या लग्नाची खटपट करीतच होते; पण महाराज कडक स्वभावाचे असल्यामुळें त्यांस कोणी मुलगी देईना. मोरोपंत तांब्यांना ही बातमी समजतांच त्यांनीं श्री० बाजीरावसाहेबांच्या मार्फत गंगाधररावांकडे संधान बांधलें. वजनदार लोकांच्या मार्फत मुलीच्या एकंदर गुणांची तारीफ गंगाधरराव ह्यांस समजली. मुलीस पाहाण्याकरितां गंगाधररावांनीं झांशी दरबारची मंडळी ब्रह्मावर्तास पाठविली. त्यांनीं

ही मुलगी पाहून व टिपण जुळवून मुलगी पसंत केली. लवकरच लग्न ठरलें. मुलीकडची सर्व मंडळी झांशीसच गेली. इ० सन १८४२ च्या वैशाखांत मनूबाईचें मोठया थाटानें लग्न झालें, व ती ७–८ वर्षांची मनूबाई आतां सौ० **महाराणी लक्ष्मीबाईसाहेब** बनली. गंगाधररावांनीं वधूपक्षास मोठमोठ्या देणग्या दिल्या व मोरोपंतांस मुलीच्या आधाराशिवाय दुसरा आधार नसल्यामुळें त्यांस झांशीसच वाडा बांधून देऊन व दरमहा ३०० रुपये पगार देऊन, गंगाधररावांनीं त्यांस झांशी संस्थानचे सरदार बनविलें. अशा तऱ्हेनें जांवईबुवांनीं आपल्या ह्या सासऱ्यालाही आधार दिला. ह्या वेळीं मोरोपंतांचें वय ३०–३२ वर्षांचें होतें; म्हणून मोरोपंतांनीं दुसरें लग्न केलें. कारण त्यांची पहिली बायको भागीरथीबाई ही, मनूबाई अगदीं लहान असतांनाच वारली होती असें मागें सांगितलेंच आहे.

**सुखाचा संसार**

गंगाधरराव गादीवर बसण्याच्या अगोदर झांशीच्या दौलतीला फार कर्ज झालें होतें. ह्याचें कारण गंगाधररावांच्या अगोदर गादीवर बसलेले रघुनाथराव हे दुर्व्यसनी, चैनी असे होते. पण गंगाधररावांच्या हातीं कारभार येतांच त्यांनीं योग्य तो बंदोबस्त करून गेलेलें वैभव पुन्हा आणलें व आपली प्रजाही संतुष्ट ठेविली. राणी-लक्ष्मीबाईच्या पायगुणामुळेंच गेलेली संपत्ति पुन्हा परत आली असें लोकांस वाटूं लागलें. रत्नभांडार भरून गेलें. हत्ती-घोडे राजवाड्यासमोर झुलूं लागले. **मनूबाई** आतां दहांच्या ठिकाणीं **वीस-पंचवीस हत्तींची मालकीण** झाली. महाराज गंगाधररावांच्या खास स्वारीचें सामान—हौदे, अंबाऱ्या, रथ, हत्तींचे व घोड्यांचे अलंकार वगैरे सर्व सामान—सोन्यारुप्याचें होतें. महाराजांचें सैन्य सातआठ हजार होतें. त्यांत पांच हजार घोडेस्वार व दोन हजार पायदळ होतें. शिवाय चार तोफखाने होते.

बुंदेलखंडांतील इतर संस्थानिक गंगाधररावांस फार भिऊन वागत व मानही देत. त्यामुळें इंग्रज लोकही गंगाधररावांस वचकून असत. तहनाम्याप्रमाणें गंगाधररावांनीं इंग्रजांची तैनाती फौज ठेविली होती व तिच्या खर्चाकरितां सुमारें सव्वादोन लक्षांचा मुलूख इंग्रजांस तोडून दिला होता. एके वर्षीं दसरा रविवारीं आला. दसऱ्याच्या स्वारीला ही तैनाती फौज आलीच पाहिजे असा करार होता. तरी पण 'आज रविवार आहे, आम्ही येत नाहीं' असा इंग्रजांच्या लष्करी अधिकाऱ्यानें निरोप पाठविला; तेव्हां गंगाधररावांस हें सहन न होऊन त्यांनीं उलट हुकूम पाठविला कीं, "आमचा पगार खाऊन उलट येत नाहीं ह्याचा अर्थ काय? येत नसाल तर आजच दिलेल्या मुलुखावर जप्ती पाठवितों." असें म्हणून महाराज हत्तीवर बसले. इंग्रजी फौजेंत निरोप जातांच तावडतोब **इंग्रज अधिकारी** आपली फौज घेऊन दसऱ्याच्या समारंभांत सामील झाला. एकदां महाराज काशीयात्रेस गेले असतां तेथील युरोपियन अधिकारी महाराजांस सामोरा गेला नाहीं, ह्याचा राग मनांत धरून, कलकत्त्याच्या गव्हर्नरजनरलास कळवून त्यास माफी मागावयास लाविलें, व कामावरून दूर करविलें. अशा तऱ्हेनें गंगाधरराव कडक स्वभावाचे व शिस्तीनें वागणारे होते.

**आकाश कोसळलें!**

महाराज गंगाधरराव ह्यांनीं दानधर्म व यात्रा पुष्कळ केल्या. इ० सन १८५१ मध्यें राणीसाहेबांस मुलगा झाला. आनंद प्रदर्शित करण्याकरितां हत्तीवरून साखर वांटली; पण अवघ्या तीन महिन्यांतच तें पुत्ररत्न काळानें हरण केलें. पुत्रशोकामुळें गंगाधररावही आजारी पडले. एवढ्या मोठ्या झांशीच्या दौलतीला, गंगाधररावांसारख्या तेजस्वी पुरुषाला; आणि राणीसाहेबांसारख्या वीरमातेला

आपल्या **रक्ताचा** व आपल्याच **हाडामांसाचा** एक जरी मुलगा असता तरी बरें झालें असतें; पण होणारी गोष्ट होऊन गेली. पुत्रशोकामुळें गंगाधरराव जे आजारी पडले ते कायमचेच आजारी पडले. मोठमोठ्या वैद्यांचें औषध देऊन पाहिलें; पण कांहीं उपयोग झाला नाहीं. इंग्रजी औषधें दिलीं असतां तीं त्यांनीं मुळींच घेतलीं नाहींत. **महालक्ष्मी** ही त्यांची कुलस्वामिनी होती. तिच्यावर अनुष्ठानें चालू केलीं. विद्वान् ब्राह्मणांना दानधर्म केला. पण कांहीं उपयोग झाला नाहीं. राणीसाहेबांनीं अन्न वर्ज्य केलें, रात्रंदिवस पतिसन्निध राहून त्या त्यांची सेवा करीत होत्या. दयाघन परमेश्वराचा धांवा चालला होता; पण त्या समयीं परमेश्वरानें त्यांची हांक ऐकिली नाहीं.

महाराजांची प्रकृति फारच बिघडली! तेव्हां त्यांनीं सर्व दरबारी लोकांस व **मार्टिन** आणि **एलिस** ह्या युरोपियन अधिकाऱ्यांस बोलावून नेवाळकर घराण्यांतील एका मुलास दत्तक घेण्याचें ठरविलें. यथाशास्त्र दत्तविधान करून मुलाच्या तोंडांत साखर घातली आणि ह्या दत्तक मुलाचें नांव **दामोदरराव** असें ठेविलें; व पान-सुपारी, अत्तर-गुलाब वांटून समारंभ आटोपला. नंतर पोलिटिकल एजंट व गव्हर्नर जनरल ह्यांस दोन खलिते लिहून, आपल्या पश्चात् राज्याची व्यवस्था कशी करावयाची तें कळविलें. ह्यानंतर लवकरच महाराज गंगाधरराव ह्यांच्यावर काळानें आपली पूर्ण छाया पसरिली. राजवाड्यासमोर लोकांचे थवेच्या थवे जमून लोक आपल्या धन्याची चौकशी रोज करीत असत; पण आज लोकांची सगळीच निराशा झाली! सगळाच ग्रंथ आटोपला! राणीसाहेबांची ती पहिली किंकाळी, गरीब गाईचा तो हंबरडा आणि आश्रित जनांचा तो आक्रोश हीं ऐकून राजवाड्यासमोर पौरजनांची एकच गर्दी

उसळून गेली. त्या वेळचा तो भयानक देखावा वर्णन करणें शक्य नाहीं. महाराजांचा दहनविधि करून बडी बडी मंडळी राणीसाहेबांच्या समाचाराकरितां, त्यांच्या दुःखाचे वांटेकरी होण्याकरितां राजवाड्यांत जाऊं लागली; तेव्हां राणीसाहेबांची ती दीन मुद्रा काय वर्णन करावी ! किल्ल्यामध्यें खजिना होता त्याचा व इतर सर्व गोष्टींचा बंदोबस्त मार्टिन व एलिस यांनीं करून ठेविला.

मार्टिन व एलिस ह्यांनीं बुंदेलखंडाचा पोलिटिकल एजंट **मालकम** यास झांशींत घडलेली सर्व हकीगत कळविली. मालकम ह्यानें

**झांशी खालसा**

गंगाधररावांनीं घेतलेला दत्तक मुलगा कबूल करूं नये असें कलकत्त्याचा गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसी यास कळविलें. **डलहौसी** यांनीं सर्व बेवारशी संस्थानें खालसा करण्याचा सपाटाच चालविला होता. अर्थात् झांशी संस्थान खालसा करण्याची आयती चालून आलेली संधि हे इंग्रज बहादुर थोडीच गमावणार ! गंगाधररावांनीं पाठविलेल्या पूर्वीच्या खलित्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं; म्हणून राणीसाहेबांनीं नवीन दुसरा खलिता पाठवून आपल्या संस्थानचा दर्जा व वेळोवेळीं झालेले तह व त्यायोगें दत्तकाचा हक्क शाबित होणारा पुरावा गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसी ह्यांजकडे पाठविला. सर्व कांहीं केलें; परंतु नशिबानेंच जिथें कच खाल्ली तिथें राणीसाहेब तरी काय करणार ! डलहौसीसाहेबांनीं मुद्दाम दत्तक मान्य केला नाहीं. उलट झांशी संस्थान खालसा केलें आहे असा हुकूम पाठविला. तो खलिता झांशीचा पोलिटिकल एजंट **एलिस** ह्यांजकडे अंमलबजावणीकरितां आला. अर्थात् तो हुकूम—झांशीचें वैभव नष्ट करणारा तो हुकूम—राणीसाहेबांच्या दुःखावर डागण्या देणारा तो हुकूम—पोलिटिलक एजंट एलिस ह्यांनीं राजवाड्यांत जाऊन राणीसाहेबांस वाचून दाखविला.

राणीसाहेब नेहमीं चिकाच्या पडद्यांत बसून तेथूनच राज्यकारभारा-संबंधीं कामें पाहात असत. पोलिटिकल एजंटानें तो हुकूम वाचून दाखविल्याबरोबर त्यांच्या मनाची स्थिति काय झाली असेल ह्याची कल्पना वाचकांनींच करावी. आपला एक पैसा हरवला तर जिवाला चुटपूट लागते आणि हें तर **वीस लाखांचें संस्थान** व तें आज जप्त होणार ! जी काल वीस लाखांची मालकीण तिला आजपासून इंग्रजांच्या तोंडाकडे पाहाण्याची पाळी येणार ! इंग्रज ठरवितील तो तनखा मिळणार ! व आपल्या पूर्वजांची खूण जी झांशी ती आजपासून नामशेष होणार ! असे अनेक विचार त्या माउलीच्या डोक्यांत येऊन, तिचें देहभान अगदीं नाहींसें होऊन गेलें.

**मेरा झांशी देऊंगा नहीं**

मेजर एलिस ह्यांनीं तो खलिता राणीसाहेबांस वाचून दाखविला व झांशी संस्थान खालसा केलें असें सांगून, आपणांस हुकुमाप्रमाणें तनखा देण्यांत येईल, असेंही त्यानें सांगितलें. मेजर एलिससाहेब कामगिरी बजावून परत जाण्यास निघाले. त्या वेळीं राणीसाहेबाचा कंठ दाटून आला व त्यांच्या मुखांतून एकदम रागाच्या आवेशांत 'मेरा झांशी देऊंगा नहीं'. असे उद्गार निघाले. ते उद्गार ऐकून एलिससाहेबांनीं 'झांशी खालसा केली' असें पुन्हा बजावून, राणीसाहेवांचा निरोप घेतला. हुकुमाप्रमाणें शहरांतील राजवाडा राणीसाहेबांस राहाण्यास दिला व किल्ल्यांतील सर्व सामान राजवाड्यांत आणविलें. खजिन्यांत **सहा लक्ष** रुपये होते ते इंग्रजांनीं आपल्या ताब्यांत घेतले व दत्तक मुलगा वयांत आल्यावर त्यांस वरील रक्कम व्याजासुद्धां देऊं असें सांगितलें. राणीसाहेबांस दरमहा पांच हजार रुपये पेन्शन देण्याचा ठराव झाला. इतकी मजल आली तरी राणीसाहेबांचा इंग्रजांवर व इंग्रजी न्याय-देवतेवर अजून फार विश्वास होता. विलायतसरकाराकडे दाद

मागितली असतां आपलें राज्य आपणांस परत मिळेल असें त्यांस वाटत होतें. म्हणून एक बंगाली व एक युरोपियन अशा दोन वकिलांस त्यांनीं साठ हजार रुपये देऊन विलायतेस पाठविलें. परंतु ते वकील रुपये घेऊन जे गेले ते परत आलेच नाहींत व त्यांनीं कांहींच काम केलें नाहीं. विनाकारण रुपये मात्र फुकट गेले. लॉर्ड डलहौसी ह्यानें झांशी संस्थान खालसा केल्यावर विलायतसरकाराची मंजुरीही आणून ठेविली. त्यामुळें झांशी पुन्हा परत मिळण्याची आशाच राहिली नाहीं. हा सर्व प्रकार इ० सन १८५४त घडला.

दौलतीची अशी वाट लागल्यावर असल्या असाहाय्य स्थितींत राणीसाहेबांनीं आपला सर्व वेळ ईश्वरभजनांत घालविण्यास आरंभ केला.

**मुंज**

राणीसाहेब पहांटे चार वाजतां उठून, स्नान करून, सकाळीं आठ वाजेपर्यंत पार्थिवपूजा व तुळशीची पूजा करीत असत. तुळशीच्या पूजेची त्यांना फार आवड असे. त्यांनीं चांदीचें तुळशीवृंदावन केलेलें होतें. पूजेचा सर्व संचही सोन्यारुप्याचा होता. पूजा झाल्यावर पोषाख करून राजवाड्यांतील चौकांत राणीसाहेब घोडे फिरवीत असत. अकरा वाजतां पुन्हा स्नान करून नित्यदानें देत, व नंतर भोजन करीत असत. भोजन झाल्यावर तीन वाजेपर्यंत अकराशें रामनाम अष्टगंधानें कागदावर लिहून माशांस टाकीत, नंतर आठ वाजेपर्यंत पुराण श्रवण करीत. पुराण संपल्यावर पुन्हा आंघोळ करून देवाची पूजा करीत. नंतर फलाहार करून झोंपीं जात. तलावांतील लक्ष्मीच्या दर्शनास त्यांचा रोज संध्याकाळीं जाण्याचा क्रम होता. संस्थान खालसा झाल्यामुळें सर्व सैन्यास व दरबारी लोकांस रजा देण्यांत आली होती. राणीसाहेबांचे वडील मोरोपंत तांबे व आणखी तीनचार मंडळी, थोडेसे शिपाई-प्यादे व आचारी-पाणक्ये इतकीच मंडळी राणीसाहेबांनीं ठेवून घेतली होती.

**दामोदरराव** जरी दत्तक होते, तरी त्यांजवर पोटच्या मुलाप्रमाणें राणीसाहेबांचें प्रेम होतें, ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. दामोदररावांना आतां सातवें वर्ष लागलें होतें; म्हणून राणीसाहेबांनीं त्यांची **मुंज** करण्याचें ठरवून इंग्रजांजवळ असलेल्या सहा लाख रुपयांपैकीं एक लाख रुपये त्यांनीं मुंजीकरितां मागितले. राणीसाहेबांनीं केवळ रागानें शेवटपर्यंत पेन्शन मुळींच घेतलें नाहीं. मुंजीकरितां मागितलेल्या पैशांबद्दल डलहौसी यानें असें लिहून कळविलें कीं, मुलगा मोठा झाला म्हणजे, तो ती रक्कम आमच्याजवळ मागेल. ह्याकरितां लायक जामीन देऊन एक लाख रुपये घेऊन जावे. अशा तऱ्हेनें स्वतःच्या रकमेबद्दल जामीन देण्याची पाळी राणीसाहेबांवर आली; पण निरुपाय होऊन मोरोपंत तांबे, लक्ष्मीचंद जयपूरवाले व आणखी दोघे गृहस्थ असे चार जामीन देऊन त्यांनीं एक लाख रुपये आणविले व दामोदरपंतांची मुंज केली. अशा तऱ्हेनें राणीसाहेब कालक्रमणा करीत असतां त्यांचें नष्टचर्य हात धुऊन त्यांच्या पाठीस लागलेलें होतेंच. कधींही कोणाच्या ध्यानीं, मनीं व स्वप्नींही येणार नाहीं, असें महत् संकट घरबसल्या प्राप्त होऊन त्याच्या पायीं त्यांचा व त्यांच्याबरोबर हजारों कुटुंबांचा सत्यानाश झाला. वाचकहो, यापुढील हकीगत म्हणजे झांशीच्या **बंडाचीच** हकीगत होय; किंवा यापुढील हकीगत म्हणजे राणीसाहेबांच्या **शहाणपणाचीच** हकीगत होय किंवा यापुढील हकीगत म्हणजे राणीसाहेबांच्या **शौर्याचीच** हकीगत होय, असेंही म्हणतां येईल.

**नानासाहेब**

इ० सन १८१८ मध्यें इंग्रजांच्या हातांत सर्व पेशवाईचा अधिकार देऊन दुसरे बाजीराव ब्रह्मावर्तास राहावयास गेले. त्यांस इंग्रजसरकार दरसाल आठ लक्ष रुपये पेन्शन देत असे. शिवाय ह्या ब्रह्मावर्ताच्या सभोंवतालचा सुमारें सहा चौरस मैलांचा टापू बाजीरावांस जहागीर म्हणून इंग्रजसरकारनें

दिला होता. या जहागिरीचा कारभार बाजीरावच पाहात असत. म्हणजे ब्रह्मावर्त हें एक लहानसें संस्थानच बनलें होतें. बाजीरावांच्या दर्जाप्रमाणें थोडेंसें सैन्य व तोफखानाही ठेवण्याची परवानगी इंग्रजांनीं त्यांस दिली होती. कानपुरापासून आठ-दहा मैल अंतरावर **बिठूर** म्हणून एक गांव आहे. त्यासच ब्रह्मावर्त असें म्हणतात. ह्या बिठूरास ब्रह्मावर्त असें नांव पडण्याचें कारण असें कीं, ब्रह्मदेवानें सृष्टि उत्पन्न केल्यावर ह्या ठिकाणीं एक अश्वमेध यज्ञ केला. म्हणून या ठिकाणास **ब्रह्मावर्त** असें नांव पडलें.

दुसऱ्या बाजीरावांस लग्नाच्या सात आठ बायका होत्या; पण त्यांस एकच मुलगा आणि तीन मुली झाल्या. मुलगा लहानपणींच वारला. आतां मुलगा होण्याची आशा नाहीं असें वाटून, त्यांनीं **नानासाहेब, दादासाहेब** व **बाळासाहेब** असे तीन मुलगे दत्तक घेतले. तीन मुलगे दत्तक घेण्याचें कारण, तीन मुलांपैकीं एकाचा तरी वंश वाढून तो आपल्या पूर्वजांस पिंड देण्यास शिल्लक रहावा. बाजीरावांची मोठी मुलगी **बयाबाई** ही ९० वर्षें जगून इ० सन १९१७मध्यें वारली. दुसरे बाजीराव इ० सन १८५१ च्या जानेवारी महिन्यांत ब्रह्मावर्तास वारले. तेव्हां त्यांचें पेन्शन इंग्रज सरकारनें बंद केलेंच; पण वर सांगितलेली जहागीरही बंद केली. आतां नानासाहेब वगैरे मुलांस पेन्शन मुळींच मिळेनासें झालें. फक्त ब्रह्मावर्ताच्या आसपासचा थोडासा मुलूख व ५०० पायदळ, थोडे घोडेस्वार आणि तीन तोफा इतकें राहूं दिलें होतें. दुसऱ्या बाजीरावाचे कंपनी सरकारकडे असलेले तीस लक्ष रुपये मात्र नानासाहेब पेशव्यांस मिळाले.

दुसऱ्या बाजीरावानें ३३ वर्षें दरसाल आठ लक्ष रुपयांप्रमाणें पेन्शन भोगलें होतें, म्हणून दुसरे बाजीराव वारल्यावर नानासाहेबांच्या ताब्यांत बरीच खासगी शिल्लक आली होती. जडजवाहीरही

बरेंच होतें. ही संधि साधून व बाजीरावांस औरस संतति नाहीं हें कारण दाखवून नानासाहेब वगैरे दत्तक मुलांस जहागीर अगर पेन्शन देण्याचें कारण नाहीं असें इंग्रजांनीं ठरविलें. त्यामुळें नानासाहेबांस वाईट वाटणें अगदीं साहजिक होतें. नानासाहेब हे सरळ, सात्त्विक व मधुरभाषणी असे होते. त्यांस इंग्रजी भाषा चांगली येत होती. त्या वेळच्या युरोपीयन अधिकाऱ्यांशीं त्यांचा चांगला स्नेह होता. कलकत्त्यास व कानपुरास युरोपियन लोकांस मेजवान्या देण्याकरितां त्यांनीं वाडे बांधलेले होते.

नानासाहेबांस **मैनाबाई** या नांवाची मुलगी होती. तिला इंग्रजी चांगलें येत होतें. कानपुरास पलटणीच्या शिपायांनीं बंड केलें, तेव्हां तें मोडण्यास नानासाहेबांनीं इंग्रजांस पहिल्यानें मदतच केली. नानासाहेब पहिल्यानें ह्या बंडाविरुद्धच होते; परंतु बंडवाल्यांचा जोर विशेष दिसून आल्यामुळें व बंडवाल्यांनीं नानासाहेबांस गोळी घालून ठार मारण्याचा धाक दाखविल्यामुळें ते बंडांत सामील झाले. कानपुरास नानासाहेब वगैरे बंडवाल्यांनीं जय मिळविल्यावर चढून जाऊन ब्रह्मावर्तास येऊन नानासाहेबांनीं ता. १।७।१८५७ रोजीं आपणांस राज्याभिषेक करवून घेतला व प्रधानमंडळ नेमिलें. मुख्य कारभारी **बाळासाहेब**, मुख्य सेनापति दादासाहेबांचा मुलगा **रावसाहेब** व **तात्या टोपी**, न्यायाधीश **बाबाभट्ट**, परराष्ट्रमंत्री **ज्वालाप्रसाद** ह्याप्रमाणें प्रधानमंडळ नेमल्यावर वहिवाटीप्रमाणें ब्राह्मण-भोजनें सुरू झालीं. तारीख १९।७।१८५७ रोजीं ब्रह्मावर्त व कानपूर हीं शहरें इंग्रजांनीं पेशव्यांचा पराभव करून पुन्हा घेतलीं. तेव्हां नानासाहेब हे बायकामंडळी व जडजवाहीर बरोबर घेऊन होडींत बसून गंगापार निघून नेपाळाकडे गेले, ते पुन्हा आले नाहींत. ते तिकडेच वारले. रावसाहेब व तात्याटोपी हे काल्पी घेऊन बंडवाल्यांना मदत करीत होते.

नानासाहेब बंडवाले



दुसऱ्या बाजीरावाचे दत्तकपुत्र. हे बंडांतून नेपाळकडे पळून गेले.

भारत इतिहास-संशोधक मंडळ, पुणें.]

तात्या टोपी



तात्या टोपी हे बंडवाल्यांचे सेनापती होते
[हे साताऱ्याजवळील वांईचे राहाणारे.]

इंग्रज सैन्यानें ब्रह्मावर्त घेतल्यावर चार प्रहर शहरांतील लोकांची कत्तल केली. हजारों पुरुष, स्त्रिया व मुलें प्राणास मुकलीं. लूटही बरीच केली. लूट केल्यावर पेशव्यांचे वाडे पाडून जाळून टाकले. शहरांतील मंदिरें व मूर्ति फोडून टाकिल्या. पेशव्यांचा वाडा तोफा लावून पाडीत असतांना नानासाहेबांची मुलगी: मैनाबाई ही त्या वाड्यांत सांपडली होती. ती आपल्या बापाचा वाडा न पाडण्याबद्दल इंग्रज अधिकाऱ्यास विनवीत होती; पण तिचें कोण ऐकणार! जवळच त्या वाड्याला भुयार होतें त्यांत ती राहात असे. एके दिवशीं रात्रीं जळून खाक झालेल्या वाड्याच्या राखेवर येऊन बसून ती ओक्साबोक्सीं रडूं लागली. तें रडणें ऐकून इंग्रज पहारेकऱ्यांनीं तिला पकडलें व हातकड्या घालून कानपुरास नेलें. त्या ठिकाणीं तिला चितेंत घालून जाळण्यांत आली. ती जळत असतां पुतळीप्रमाणें उभी होती व तोंडावर हास्य चमकत होतें. शेवटीं सर्व चेहरा होरपळून ती पंचत्वाला पोंचली. ती जळून खाक झाल्यावर दहाच मिनिटांनीं तिला जिवंत ठेवण्याबद्दल विलायतेहून तार आली होती; पण आतां त्या तारेचा उपयोग नव्हता. नानासाहेब नेपाळांत पळून गेल्यावर रावसाहेब व तात्या टोपी हेच बंडवाल्यांचे पुढारी म्हणून प्रसिद्धीस आले.

राज्यलोभ हा फार वाईट आहे, इंग्रजसरकारालाही अशा तऱ्हेचा राज्यलोभ आवरतां आला नाहीं. लॉर्ड डलहौसी हा गव्हर्नर जनरल होऊन आल्यावर इंग्रजांच्या राज्यव्यवस्थेच्या सोई-

**झांशीची फौज बिथरली**

करितां त्यानें औरस वारस नसलेलीं संस्थानें खालसा करण्याचा सपाटाच सर्व हिंदुस्थानभर चालविला. सातारा, झांशी, कर्नाटक, नागपूर, तंजावर, सिकीम, अयोध्या व वऱ्हाड वगैरे राज्यें इंग्रजांनीं आपल्या राज्यांत सामील केलीं. ह्यामुळें पुष्कळ लोक इंग्रजांवर नाराज झाले होते. संस्थानें

खालसा केल्यामुळें संस्थानी फौजा बेकार झाल्या होत्या. संस्थानिकांचींही मनें इंग्रजांबद्दल साशंक झालीं होतीं. शिवाय आगगाडया, तारायंत्रें, नव्या नव्या सुधारणा व पाद्री लोकांचा उपदेश यांविषयीं हिंदु-मुसलमानांना विश्वास वाटत नव्हता. तशांत गाई-डुकरांची चरबी काडतुसांना लावल्याची अफवा हिंदी सैन्यांत पसरली. व इंग्रजांचें हिंदु-मुसलमान सैन्य बिथरून गेलें. हां हां म्हणतां कानपूर, मिरत, दिल्ली, हीं शहरें बंडवाल्यांनीं सर केलीं व दिल्लीस **मोगल बादशाहीची** पुन्हा स्थापना केली. बंडवाल्यांचा हा जय जरी तात्पुरता होता तरी, झांशीचा बळी घेण्यास तो कारणीभूत झाला. बंडवाल्यांच्या जयाच्या बातम्या झांशीच्या इंग्रजी फौजेंत पसरल्या. नानासाहेब बंडवाले व त्यांचा सेनापति तात्या टोपी हे कानपुराकडे लढत होते. त्यांच्या जयाच्या बातम्या झांशीच्या इंग्रजी फौजेंत पसरून इंग्रजांच्या एका **काळ्या पलटणीनें** बंडाचें निशाण उभारलें. दारूगोळा व खजिना शिपायांच्या हातीं लागला आणि पलटणीचा मुख्य अधिकारी **डनलॉप** ह्यास बंडवाल्यांनीं (ता. १ मार्च १८५७ रोजीं) ठार मारिलें.

तेव्हां इंग्रजांच्या झांशी येथील इतर काळ्या सैन्यास स्फुरण येऊन तें सैन्य झांशीच्या बंडांत सामील झालें. तेव्हां झांशींतील युरोपियन लोकांस फारच भीति उत्पन्न झाली. आतां आपली व आपल्या बायकामुलांची धडगत लागत नाहीं असें जाणून **गॉर्डन**साहेब आणि इतर युरोपियन अधिकारी राणीसाहेबांकडे आले व पदर पसरून "आम्हांस आपल्या राजवाडयांत आश्रय द्या; व आमच्या बायकामुलांचें रक्षण करा" असें विनवूं लागले. तेव्हां "होतांहोईतों आम्ही तुमचें रक्षण करूं, उघड उघड तुम्हांस मदत केली तर बंडवाले आमचा जीव घेतील; शिवाय आमच्याजवळ फौजफांटा वगैरे तुम्हीं

कांहींच ठेविला नाहीं, अशा स्थितींत आम्ही मदत तरी कशी करणार? तरीपण गुप्तरीतीनें जी मदत आम्हांस तुम्हांला करतां येणें शक्य आहे ती आम्ही करूं." असें राणीसाहेबांनीं त्यांस वचन दिलें.

तेव्हां साहेबलोकांनीं आपल्या **मडमा** व **मुलें** आणून राणीसाहेबांच्या राजवाड्यांत नेऊन ठेविलीं; पण किल्ल्यांत गेलें असतां आपल्याला जास्त बंदोबस्तानें राहातां येईल असें वाटून, साहेबलोक आपल्या मडमा व मुलें घेऊन किल्ल्यांत राहावयास गेले. ही मंडळी किल्ल्यांत राहावयास गेली असतां, ह्या साहेबलोकांस कणिक-रोट्या व लागेल तें सामान बंडवाल्यांस न समजूं देतां राणीसाहेब रोज पाठवीत असत. इंग्रजांस पळून जाण्याचाही सल्ला राणीनें दिला होता. आपल्या पदरचे विश्वासु शंभर **बरकंदाज** राणीनें त्यांच्या रक्षणा-करितां दिले होते; पण साहेबलोकच हट्टानें किल्ल्यांत जाऊन राहिले.

**कोण बंडखोर?**

यावरून झांशीच्या बंडवाल्यांशीं राणीसाहेबांचा कांहींच संबंध नव्हता असें कोणासही दिसून येईल. इंग्रज अधिकाऱ्यांनीं बंडाचा पेटलेला वणवा पाहून राणीसाहेबांस असें सांगितलें कीं, बंड मोडेपर्यंत आमच्या ह्यातून झांशीच्या मुलुखाचा बंदोबस्त होणें शक्य नाहीं, करितां ह्या प्रांताची व्यवस्था कांहीं दिवस तुम्हींच पाहा. राणीसाहेब म्हणाल्या कीं, **मजजवळ सैन्य नाहीं, जुने कारभारी लोकही मीं काढून टाकले, आतां मी काय करूं?** तेव्हां तेथील अधिकाऱ्यांनीं त्यांस तात्पुरतें नवीन सैन्य ठेवून बंदोबस्त करण्याची परवानगी दिली व इंग्रज लोक किल्ल्यांत राहावयास गेले.

इंग्रज लोक किल्ल्यांत राहावयास गेल्यावर बंडवाल्यांनीं आपला मोर्चा किल्ल्याकडे वळविला व किल्ला हस्तगत करण्याच्या उद्योगास ते लागले. किल्ल्यांतून इंग्रज लोक लढत होते; पण बंडवाल्यांपुढें इंग्रजांचा निभाव लागेना. तेव्हां इंग्रज लोक बंडवाल्यांस शरण

आले व किल्ला बंडवाल्यांच्या ताब्यांत आला. नंतर त्या शरण आलेल्या इंग्रज लोकांच्या मुसक्या बांधून त्यांची मिरवणूक काढून मग त्यांची कत्तल करण्यांत आली. ह्या कत्तलींत ७६ साहेब, १२ मडमा व २३ मुलें मारलीं गेलीं असें म्हणतात. ह्याशिवाय किल्ला लढवितांना सुमारें ६० साहेब मारले गेले. ह्याप्रमाणें झांशीच्या वेढ्यांत बंडवाल्यांनीं सुमारें १५० साहेबलोकांचे बळी घेतले. कांहीं जरी झालें तरी राणीसाहेबांचा ह्या प्रकरणाशीं–ह्या बंडाशीं–ह्या कत्तलीशीं कांहींच संबंध नव्हता. राणीसाहेब पूर्ण राजनिष्ठ होत्या, ह्याबद्दल मार्टिन ह्यानें दामोदरपंतास ता. २०।८।१८८९ रोजीं जें पत्र लिहिलें आहे त्यावरून खात्री होते.

ह्याप्रमाणें त्या **निर्दय बंडवाल्यांनीं** आपला पराक्रम गाजविला; आणि मग सर्व बंडवाले राणीसाहेबांच्या राजवाड्यासमोर गोळा झाले;

**तीन लाख रुपये**

व राणीसाहेबांजवळ खर्चाकरितां तीन लाख रुपये मागूं लागले. इतकेंच नव्हे, तर किल्ल्यांत इंग्रजांकडे आपला वकील कां गेला! आपण इंग्रजांस मिळून आहां असा आम्हांस संशय येतो, असा रोखठोक सवाल राणीसाहेबांस बंडवाल्यांनीं केला. अर्थात् राणीसाहेबांनीं इंग्रजांस जी मदत केली तिची बातमी बंडवाल्यांस लागली असलीच पाहिजे. बंडवाले राणीसाहेबांच्या राजवाड्यासमोर गोळा झाले तेव्हां, मोरोपंत तांबे बंडवाल्यांच्या पुढाऱ्यांस भेटण्यास गेले असतां, मोरोपंत तांब्यांना म्हणजे राणीसाहेबांच्या वडिलांनाच बंडवाल्यांनीं कैद केलें; आणि राणीसाहेबांस धाक दपटशा दाखवून तीन लाख रुपये न द्याल तर राजवाड्याचा फडशा पाडून तो जमीनदोस्त करून टाकूं व आपली दौलत तुमच्यापैकीं दुसऱ्या एखाद्या नातलगास देऊन, आम्ही झांशीचा बंदोबस्त करूं असेंही सांगितलें.

१९४२१

ह्या वेळीं राणीसाहेब काकुळतीला येऊन म्हणाल्या, "आमच्या वडिलांस कैद करून काय उपयोग ! आमचें सर्व राज्य इंग्रजांनीं खालसा केलें आहे. मी बाई माणूस, मजजवळ आपणांस देण्यास मुळींच पैसा नाहीं." पण हें बोलणें त्या बंडवाल्यांस न पटल्यामुळें, राणीसाहेबांचा निरुपाय होऊन त्यांनीं आपल्या खासगी दौलती-पैकीं **एक लाख** रुपयांचा ऐवज बंडवाल्यांस देऊन टाकला. तेव्हां बंडवाल्यांनीं राजवाड्याला दिलेला वेढा उठविला व 'खुल्क खुदाका, मुल्क बादशहाका, अंमल राणी लक्ष्मीबाईका' अशी दौंडी पिटवून ते दिल्लीकडे चालते झाले. ता. ७।६।१८५७ रोजीं ही हकीगत घडली. ( खुल्क = प्रजा.)

**आतां झांशींत कोण ?**

आतां झांशींत इंग्रजांचा अंमल मुळींच राहिला नव्हता. बंडवालेही निघून गेले होते. आतां ह्या प्रांताची कशी व्यवस्था लावावी असा प्रश्न राणीसाहेबांपुढें उभा राहिला. झांशीच्या कत्तलींतून दोन **साहेब** व एक **मडम** वांचलेली होती; राणीसाहेबांनीं मोठ्या बंदोवस्तानें त्यांचें रक्षण केलें व झांशींतील इंग्रज अधिकाऱ्यांच्या शिरस्तेदारांस बोलावून आणून, आतां पुढें काय व्यवस्था करावयाची असें विचारलें. तेव्हां झालेली सर्व हकीगत सरकारच्या युरोपियन अधिकाऱ्यांस कळवून त्यांच्याच सल्ल्यानें झांशीची जी काय व्यवस्था करावयाची ती करावी असें ठरलें. तेव्हां गोपाळराव शिरस्तेदार ह्यांनीं एक खलिता लिहून इंग्रज-सरकारच्या कमिशनरसाहेबांस झांशीच्या बंडाची सर्व हकीगत कळविली व दुसरे युरोपियन अधिकारी येईपर्यंत झांशीचा कारभार राणीसाहेबांनींच पाहावा असें ठरविलें असें म्हणतात. पण कांहीं असलें तरी सागरच्या अधिकाऱ्यांस राणीसाहेबांनीं बंडाची हकीगत कळविल्यामुळेंच सागरचे युरोपियन लोक सावध राहिले ही गोष्ट

खरी असावी असें वाटतें. व ह्यावरून राणीसाहेब इंग्रजांविरुद्ध अद्याप नव्हत्या असें सिद्ध होतें.

आतां झांशींत इंग्रजांचाही अंमल नव्हता व बंडवाल्यांचाही अंमल नव्हता; करितां राणीसाहेबांनीं सर्व स्थिरस्थावर होईपर्यंत इंग्रजांच्या वतीनें झांशी प्रांतावर आपला अधिकार चालविला असला व राज्य-व्यवस्था नीट सुरळीत केली असली; तर त्यांत राणीसाहेबांची मोठी चूक झाली असें मुळींच होत नाहीं. राणीसाहेब ह्या त्या प्रांताच्या मालकच होत्या. झांशीचा राज्यकारभार त्यांनीं आपल्या हातांत घेतला हें एकप्रकारें **सुव्यवस्थेच्या** दृष्टीनें त्यांनीं **शहाणपणाचेंच** काम केलें असें म्हणतां येईल.

आतां झांशीचा कारभार इंग्रजांच्या मुखत्यार ह्या नात्यानें **महाराणी** लक्ष्मीबाईसाहेब पाहूं लागल्या, झांशी संस्थानची सर्व व्यवस्था राणी-साहेब पाहूं लागल्यापासून झांशी संस्थानची शोभा पुन्हा पूर्ववत् दिसूं लागली. बंडवाले व इतर पुंड लोक ह्यांच्यापासून आपलें रक्षण व्हावें म्हणून, पूर्वीं बंद केलेले **अठरा** कारखाने राणीसाहेबांनीं पुन्हा चालू केले. पूर्वीं कमी केलेलें सैन्य पुन्हा चाकरीस ठेवून झांशी संस्थानचा बंदोबस्त केला.

**नथेखां**

इंग्रजांचा दरारा नष्ट झाल्यामुळें राणीसाहेबांचा एक लांबचा वारस **सदाशिवराव** व बुंदेलखंडाचा एक सरदार **नथेखां** असे झांशीवर चालून आले. सदाशिवरावास राणीसाहेबांनीं कैद करून झांशीच्या किल्ल्यांत ठेविलें. राहातां राहिला नथेखां.

नथेखां हा फार मोठा शत्रु होता. त्यानें २० हजार सैन्य जमवून झांशीवर स्वारी केली व राणीसाहेबांस असा निरोप पाठविला कीं, इंग्रजसरकार तुम्हांस जें पेन्शन देत आहे तें मी देतों; झांशी संस्थान आमच्या ताब्यांत द्या; नाहींतर दूरवर विचार करून युद्धास

तयार व्हा. राणीसाहेबांस नथेखांचा हा बेअकली निरोप थोडाच मान्य होणार ! राणीसाहेबांनीं आपल्या पक्षाचे सरदार व मानकरी ह्यांचा दरबार भरवून नथेखांस असा निरोप पाठविला कीं, **'मी शिवराव-भाऊंची सून आहे** आणि तुमच्यासारख्या बुंदेले लोकांस बायका करून सोडण्याचें सामर्थ्य माझ्या ठिकाणीं आहे, ह्याकरितां तुम्हींच दूरवर विचार करून युद्धास तयार व्हा. सोबत **पांच गोळ्या** व **दारू** पाठविली आहे. तुम्हीं चाल करून आलांत तर हें आमच्याजवळ आहे'. असा निरोप नथेखांस पोंचतांच त्याच्या अंगाचा तिळपापड झाला! अंगाची लाहीं होऊन गेली! राणीसाहेबांस 'खाऊं कीं गिळूं' असें त्यास होऊन गेलें. इकडे राणीसाहेबांची तयारी तर मुळींच नव्हती आणि नथेखां तर तीन कोसांवर येऊन थडकला होता. राणीसाहेबांनीं आपल्या सर्व जुन्या फौजेस बोलावून, कांहीं नवीन अरब व पठाण सैन्य तयार केलें. आतां राणीसाहेबांची फौज सुमारें पांच हजार झाली. दारूगोळ्याचा कारखाना मोठया प्रमाणावर सुरू केला. झांशीच्या किल्ल्यांत पुरलेल्या तीन तोफा होत्या व राजवाड्यांत चार तोफा गुप्त रीतीनें ठेविलेल्या होत्या, त्या रातोरात किल्ल्याच्या बुरुजांवर चढवून पेशव्यांचें **जुनें निशाण** व इंग्रजांनीं दिलेलें **यूनियन जॅक** हीं किल्ल्यावर फडकवीत ठेविलीं.

**कडक बिजली**

इकडे नथेखांनेंसुद्धां मोठी तयारी केली. आमच्यासारख्या शूर बुंदेल्यांशीं **ब्राह्मणाची विधवा राणी ती काय लढणार !** असें म्हणून त्यानें जरिपटक्याचे हत्ती झांशीच्या किल्ल्यावर सोडले. हां हां म्हणतां नथेखांचें सैन्य टोळधाडीप्रमाणें किल्ल्यावर चाल करून आलें. नथेखांचें सैन्य तोफांच्या माऱ्याच्या टप्प्यांत येतांच राणीसाहेबांचा गोलंदाज गुलाम गोषखां यानें तोफांचा भडिमार चालू केला. तेव्हां नथेखांच्या सैन्याची

तारांवळ उडून त्याच्या जरिपटक्याचे हत्ती पाडाव झाले. कांहीं केल्या राणीसाहेबांच्या प्रचंड तोफांच्या माऱ्यापुढें नथेखांचा इलाज चालेना. झांशीची एक विधवा राणी आपल्यासारख्या वीराला पळतां भुई थोडी करावयाला लावते, याची चीड येऊन रात्रीच्या वेळीं त्यानें चार तोफा आणून किल्ल्याच्या दरवाजावर मारा सुरू केला. त्यामुळें दरवाजा खिळखिळा होऊन शत्रु आंत शिरतो कीं काय अशी धास्ती वाटूं लागली. स्वतः राणीसाहेब **तामझाम** नांवाच्या मेण्यांत बसून दरवाजावरील सैन्याची पहाणी करीत होत्या व त्या सैन्यास धीर देऊन दरवाजा शत्रूच्या हातीं जाऊं देत नव्हत्या. ह्या वेळीं नथेखांच्या रणशूर बुंदेल्यांनीं बाण, तिरकमठे, बंदुका व तोफा यांची एकच गर्दी उडवून दिली. प्रसंग मोठा आणीबाणीचा आला. इतक्यांत राणीसाहेबांनीं सेनापति **लालाभाऊ बक्षी** यांस हुकूम करून प्रचंड तोफ **कडक बिजली** दरवाजावरील बुरुजावर आणविली व गोलंदाजांस सोन्याचीं कडीं बक्षीस देऊन जेव्हां ती तोफ चालू केली, तेव्हां नथेखांचें सैन्य सैरावैरा पळूं लागलें. त्याच्या त्या अवजड तोफा राणीसाहेबांच्या सैन्यानें हस्तगत केल्या आणि ह्या लढाईंत नथेखांचा पूर्ण पराभव झाला.

**झांशी १८५७**

झांशीचा किल्ला एका टेंकडीवर आहे. राणीसाहेब आतां या किल्ल्यांत राहावयास गेल्या होत्या. किल्ला फार मजबूत असून त्या वेळीं त्यामध्यें पुष्कळ भुयारें होतीं. किल्ल्याला मोठमोठे आणि उंच असे बुरूज असून त्या किल्ल्याच्या पायथ्याभोंवतीं खोल व रुंद असा खंदक पाण्यानें नेहमीं भरलेला असे. किल्ल्याचा तट चुनेगची बांधलेला असून तो २० फूट रुंद होता. किल्ल्यांत चार हजार मनुष्य राहील इतकी जागा होती. प्रत्येक बुरुजाखालीं तळघर होतें. त्या तळघरांत धान्य,

दारूगोळा, हत्यारें वगैरे युद्धाचें सामान ठेवीत असत. किल्ल्यांतील वाडा फारच मोठा, म्हणजे आठ चौकी असून, तो **सात मजले** उंच होता. या वाड्याच्या सर्व दालनांची माहिती होण्यास सुमारें एक महिना लागे. किल्ल्यांत ठिकठिकाणीं पाण्याचे हौद होते व निरनिराळ्या कामांकरितां बंगलेही बांधलेले होते. कवायतीकरितां भलें मोठें पटांगणही होतें. द्राक्षें, आंबे, पेरू, फुलझाडें वगैरे लावून तो किल्ला म्हणजे एक इंद्रभुवनच केलेला होता खुद्द झांशी शहराभोंवतींही ४॥ मैल घेराचा कोट होता. तोही उंच आणि रुंद असून मधून मधून त्यास बुरूज होते. त्या तटास हत्तींची अंबारी जाण्यासारख्या पांच मुख्य वेशी होत्या. शिवाय लहान लहान दरवाजेही बरेच होते. शहरांतील रस्ते अरुंद होते. **कोष्टीपुरा** व **हलवाईपुरा** या पेठा श्रीमंत लोकांच्या हवेल्यांनीं गजबजलेल्या असत. शहराच्या मध्यभागीं भिड्यांचा मोठा थोरला बाग होता शहरांतील सरकारी वाडा चार चौकी असून पाहाण्यासारखा होता. त्यांतच राणीसाहेब संस्थान खालसा झाल्यावर राहूं लागल्या. शहराबाहेर एक तलाव होता. त्यांत महालक्ष्मीचें मोठें थोरलें देऊळ होतें. हीच ती **महालक्ष्मी** राणीसाहेबांचें कुलदैवत होय.

ह्या वेळीं झांशींत महाराष्ट्रीय ब्राह्मणाचीं घरें सुमारें २०० होतीं. दक्षिणेंत पुणें व उत्तर हिंदुस्थानांत झांशी अशीं हीं दोनच पाहाण्यासारखीं ठिकाणें म्हणून त्या वेळीं गणलीं जात. आज झांशीची वस्ती सुमारें ५५ हजार आहे; पण त्या वेळीं ती १०।१५ हजार तरी खास असावी असें वाटतें. पूर्वी झांशींतील सुखी लोक सकाळीं आंघोळ करून आपल्या हातानें धोतरें धुऊन व दुसरीं धुतलेलीं गुलाबी धोतरें नेसून मग उद्योगास जात, व संध्याकाळीं **मोतिया, चमेली, जाई, जुई,** ह्यांचे गजरे हातांत घालून हिंडतांना दृष्टीस

पडत. बायका संध्याकाळीं हातांत तांदुळांनीं भरलेला रुप्याचा पेला घेऊन देवदर्शनास जात असत. अशा तऱ्हेनें वागण्याचा येथील लोकांचा रिवाज होता.

इंग्रजांच्या मुखत्यार ह्या नात्यानें राणीसाहेब आतां राज्यकारभार चालवूं लागल्या होत्या; म्हणून त्यांचा कार्यक्रम काय होता तें पाहूं.

**आतां राणीसाहेब**

राणीसाहेब पहांटे उठून कसरतशाळेंत जाऊन जोर-जोडी करीत. नंतर घोड्यावर बसून फिरावयास जात. घोडा कुंपणावरून उडविणें, खंदकाचे पार घालविणें वगैरे कसरती घोड्याकडूनही करून घेत. त्या हत्तीलाही शिकवीत असत. असा हा कार्यक्रम आठ वाजेपर्यंत चालून मग स्नान करीत. स्नानास १०।१९ हांडे ऊन पाणी लागे. स्नान झाल्यावर पांढरें चंदेरी पातळ नेसून भस्म लावून, पति मरणानंतर **सोंवळ्या न झाल्यामुळें** तीन दानें देत असत. नंतर चांदीच्या तुलसीवृंदावनांत लावलेल्या तुळशीची पूजा करून मग पार्थिव लिंगाची पूजा करीत. ही पूजा होत असतांना गवयांचें गाणें व पुराणिकांचें पुराणही चालू असे. नंतर सुमारें १५० लोकांचे मुजरे राणीसाहेबांपुढें रोज होत असत. नंतर त्यांचें जेवण झाल्यावर थोडी विश्रांति घेऊन सकाळीं आलेले नजराणे आपल्यापुढें आणवीत. रुप्याच्या ताटांत वर रेशमी वस्त्र घालून त्यांच्यापुढें ते नजराणे ठेविल्यावर त्या आपणास आवडतील ते पदार्थ घेऊन, बाकीचे पदार्थ आश्रित मंडळींस वांटून देत.

संध्याकाळीं तीन वाजतां राणीसाहेब कचेरीस जात. त्या वेळीं कधीं कधीं पुरुषवेष धारण करीत. पायांत पायजमा, अंगांत जांभळ्या मखमलीची किंवा साटिणीची बंडी, डोकीस टोपी व टोपीवरून बांधलेली पागोट्याची बत्ती, कमरेस जरीचा दुपेटा; आणि त्या



दरबारच्या पोषाखांत राणीसाहेब.

भारत इतिहास-संशोधक मंडळ, पुणें.]



हळदकुंकू

दुपेट्यास लटकलेली रत्नखचित तरवार, ह्याप्रमाणें ती गौरवर्ण उंच मूर्ति गौरीसारखी दिसत असे. त्या कधीं कधीं बायकांच्या पोषाखांत दरबारास जात असत. अशा वेळीं त्यांचा पोषाख म्हटला म्हणजे नेसावयास पांढरा शालू, अंगांत पांढरी चोळी, गळ्यांत मोत्यांचा हार, हातांत सोन्याच्या बांगड्या व गोठ, बोटांत हिऱ्याची आंगठी, केंसांचा बुचडा व **डोकीवरून पदर.** ह्याप्रमाणें कधीं पुरुषवेषानें तर कधीं स्त्रीवेषानें राणीसाहेब दरबारास येऊन एका खोलीमध्यें चिकाच्या पडद्यांत बसत. बाहेर भालदार चोपदार उभे राहात. कारभारी हातांत कामाच्या कागदांचें पुडकें घेऊन समोर उभे राहात. दिवाणखान्यांत हुजूरचे कारकून आपआपलीं कामें करीत असत. राणीसाहेब कधीं कधीं स्वतः हुकूम लिहीत व अपराधी लोकांस कडक शिक्षा ठोठावीत. दर मंगळवारीं व शुक्रवारीं महालक्ष्मीच्या दर्शनास जाण्याचा त्यांचा नेम होता. त्या दर्शनास मोठ्या थाटानें जात असत. तो थाट पाहाण्यासारखा होता.

**दर्शनाचा थाट**

महालक्ष्मीच्या दर्शनास जातांना राणीसाहेब कधीं मेण्यांत बसून जात असत, किंवा घोड्यावर बसूनही जात असत. ह्या मेण्याचें नांव **तामझाम** असें होतें. तामझाम हा अरबी शब्द असून त्याचा अर्थ मेणा असाच आहे. हा मेणा सोन्यारुप्याचा बनविलेला होता. स्वारी दर्शनास जाऊं लागली म्हणजे मागें पुढें २०० स्वार असत. मेण्याबरोबर मेण्याचे खूर धरून चालण्याकरितां ५–६ दासी असत. त्यांनीं जामदारखान्यांतून जरीचे पोषाख करून, अंगावर उंची दागिने आणि पायांत तोडे व जोडे घालून, हातांत चौऱ्या घेऊन मेण्याबरोबर चालावें असा नियम होता. अशा ह्या स्वारीबरोबर जरिपटका व रणवाद्येंही असत. ह्या स्वारीबरोबर कारभारी मंडळीही असे. स्वारी पुरुषवेषांत असली म्हणजे

पायांत पायजमा व जोडा, अंगांत बंडी, डोकीस टोपी व ह्या टोपीवर गुंडाळलेली पागोटयाची जरीची बत्ती, कमरेस जरीचा दुपेटा, व त्याला लटकावलेली तरवार व मागें पुढें २००-३०० स्वार अशा थाटानें स्वारी निघे. अशी स्वारी किल्लयावरून भरधांव निघाली म्हणजे, पाठीवर लोळत असलेल्या त्यांच्या पागोटयाच्या बत्तीचा जरीचा पदर वाऱ्यानें उडूं लागे. अशी स्वारी किल्लयांतून निघाली म्हणजे किल्लयांतील चौघडा व महालक्ष्मीच्या देवळांतील चौघडा सुरू होई; व असा चौघडा सुरू झाला म्हणजे गांवांतील लोकांस स्वारी निघाल्याची खबर लागे. अशी स्वारी घोड्यावरून भरधांव निघाली म्हणजे पाहाण्याकरितां लोकांचे थवेच्याथवे वाटेवर जमत. व अशा थाटानें राणीसाहेब देवदर्शनास जाऊन येत. त्या बरोबर दामोदरपंतांसही नेत असत. राणीसाहेब फार दयाळू व चतुरही होत्या. त्याबद्दलच्या कांहीं गोष्टी पुढें देतों.

एकदां राणीसाहेबांकडे काशींतील एक विद्वान् ब्राह्मण आला आणि म्हणूं लागला, मी गरीब असल्यामुळें माझें लग्न होत नाहीं.

**कांहीं गोष्टी**

मुलीचा बाप मुलीकरितां ४०० रुपये मागतो व लग्नास सुमारें १०० रुपये लागतील; म्हणून मी मोठ्या पंचायतींत पडलों आहें. हें ऐकून राणीसाहेबांनीं एक ताम्हनभर रुपये आणले व उदक सोडून त्या ब्राह्मणाच्या पदरांत घातले आणि सांगितलें कीं, 'लग्न ठरल्यावर आम्हांस **कुंकुमपत्रिका** पाठविण्यास विसरूं नका'. नंतर तो ब्राह्मण खुष होऊन काशीस गेला व लग्न ठरल्यावर त्यानें राणीसाहेबांस लग्नाचें आमंत्रण पाठविलें.

एके दिवशीं राणीसाहेब मोठ्या थाटानें महालक्ष्मीच्या दर्शनास जात असतां, राजवाडयापुढें भिकाऱ्यांची फारच मोठी गर्दी जमलेली त्यांस दिसली. विचारपूस करतां भिकाऱ्याचें राणीसाहेबांकडे एक

मागणें आहे असें समजलें. ते दिवस थंडीचे होते. भिकाऱ्यांस कांहींतरी पांघरावयास पाहिजे होतें, ही गोष्ट राणीसाहेबांस समजतांच त्यांनीं कारभाऱ्यांस असा हुकूम केला कीं, आजपासून चार दिवसांच्या आंत सर्व भिकारी राजवाड्यासमोर बोलावून, त्यांस एक एक उबदार बंडी, टोपी व कांबळें इतकें देऊन टाका. झालें ! राणीसाहेबांचा तो हुकूम ! शहरांतील सर्व शिंपी बोलावून आणून तीन दिवसांतच सर्व बंड्या, टोप्या शिवून टाकल्या व रमणा करून सुमारें २००० भिकाऱ्यांस ते कपडे देऊन टाकिले.

राणीसाहेबांना घोड्यांची परीक्षा फारच चांगली होती. एके दिवशीं एक सौदागर राणीसाहेबांची परीक्षा पाहाण्याकरितां दोन घोडे घेऊन आला. राणीसाहेबांनीं ते घोडे रंगणावर धरिले; दोनही घोडे दिसण्यांत फार नामी होते; तरीपण राणीसाहेबांनीं एकाची किंमत १००० रुपये केली, व दुसऱ्याची किंमत ५०० रुपये केली. व सांगितलें कीं, "एक घोडा चांगला असून, दुसरा घोडा जरी दिसण्यांत चांगला दिसला तरी तो छातींत फुटला आहे." तेव्हां सौदागर थक्क झाला व सौदागरानें आपली लबाडी कबूल केली. राणीसाहेबांनीं एक हजार रुपायांचा घोडा ठेवून घेतला.

मागें नथेखांचा जरी राणीसाहेबांनीं पराभव केला होता, तरी **नथेखांनें** राणीच्या नाशाचा एक निराळाच मार्ग स्वीकारला.

**दहा महिने**

इंग्रजांची मुखत्यार या नात्यानें राणीसाहेब झांशी संस्थानची व्यवस्था, झांशीच्या कत्तलीनंतर ता. १ जून सन १८५७ ते २० मार्च १८५८ पर्यंत म्हणजे सुमारें दहा महिने पाहात होत्या. त्या अवधींत इंग्रजांकडे राणीसाहेबांचे जे स्वार खलिते घेऊन जात असत त्यांस नथेखांनें मधल्यामधेंच मारून ते खलिते इंग्रजांस पोहोंचवूं दिले नाहींत, इतकेंच नव्हे, तर **राणी**

**लक्ष्मीबाई** ही बंडखोर लोकांस सामील असून मोठी फौज बाळगून झांशीचा कारभार आपण स्वतः पाहात आहे अशा तऱ्हेचा आगलावेपणा इंग्रजांकडे जाऊन करण्यासही त्यानें कमी केलें नाहीं. राणीसाहेब या पडदानशीन असल्यामुळें इंग्रजांस भेटून खरी हकीगत काय आहे ती त्यांस समजावून सांगतां आली नाहीं. कारभारीमंडळीस बाई हुकूम करीत व इंग्रजांस खलिते पाठवीत. हे दहा महिने बंडाच्या धामधुमीचे असल्यामुळें राणीसाहेब या बंडवाल्यांस सामील आहेत अशी खोटी समजूत इंग्रजांनींच करून घेतली. या दहा महिन्यांत झांशी संस्थानावर चाल करून येणाऱ्या नथेखांसारख्या बंडखोर लोकांना आळा बसावा म्हणून राणीसाहेबांनीं पुन्हा **अठरा कारखाने** सुरू केले, नवीन सैन्य ठेवून दारूगोळा तयार केला, किल्ल्याची दुरुस्ती करून बुरुजांवर तोफा ठेवून दिल्या. नथेखांच्या पराभवांत राणीसाहेबांस बऱ्याच तोफा मिळाल्या होत्या.

राणीसाहेबांजवळ आतां सुमारें ५१ तोफा होत्या त्यांत भवानीशंकर, कडक्क बिजली, नालदार, घनगर्ज ह्या नांवांच्या तोफा फारच मोठ्या असून, प्रबल शत्रूचा संहार करणाऱ्या होत्या. राणीसाहेबांनीं आपल्या दहा महिन्यांच्या कारकीर्दींत ही जी व्यवस्था केली; ती इंग्रजांच्या मुखत्यार ह्या नात्यानें केली होती. बंडाचा वणवा विझला म्हणजे इंग्रज आपण होऊनच झांशी संस्थान आपल्या ताब्यांत देतील अशी त्यांस फार आशा होती. कारण झांशीच्या कत्तलींत राणीसाहेबांनीं इंग्रज लोकांस शक्य तितकी मदतच केली होती. आणि इंग्रजांच्या वतीनेंच आपण झांशीचा राज्यकारभार पाहात आहों असा त्यांस अभिमान होता. पण दहा महिन्यांत राणीसाहेबांनीं ज्या सुधारणा केल्या त्यांचा विपरीत परिणाम होऊन **राणीसाहेब**

**बंडखोर आहेत** अशी समजूत इंग्रज लोकांची झाली. इंग्रज लोकांची समजूत घालण्याकरितां राणीसाहेबांनीं एक वकील **सागर-च्या** इंग्रजांकडे पाठविला होता; पण तो त्या इंग्रजांकडे न जातां त्यानें मध्येंच दडी मारली; व आपण सागरास इंग्रजांची गांठ घेतली; अशीं खोटींच पत्रें त्यानें राणीसाहेबांना लिहिलीं.

राणीसाहेबांनीं झांशी संस्थानावर स्वारी करणाऱ्या नथेखांचा पराभव केला व सदाशिवरावास कैद करून ठेविलें; आणि झांशीचा उत्तम बंदोबस्त करून ठेविला. हा बंदोबस्त इंग्रजांकरितां, इंग्रजांची मुखत्यार म्हणूनच त्यांनीं करून ठेविला होता; हें जरी खरें होतें तरी, राणीसाहेब बंडवाल्यां-पैकींच आहेत; व आपणांविरुद्ध लढण्याकरितांच त्यांनीं तयारी चालविली आहे असें इंग्रजांस वाटलें; त्यामुळें इंग्रज लोकही झांशी-वर चाल करून येण्याचा विचार करूं लागले. अर्थात् ही बातमी गुप्त राहाणें शक्य नव्हती. इंग्रज सैन्य झांशीवर चाल करून येत आहे अशा बातम्या दिल्लीहून व काशीहून येऊं लागल्या.

**चूक कोणाची ?**

जुने मुत्सद्दी **लालाभाऊबक्षी** व **नाना भोपटकर** ह्यांनीं राणी-साहेबांची भेट घेऊन इंग्रजांकडे आपला वकील पाठवावा व खरी हकीगत त्यांस अगोदरच कळवावी, आणि बंडाशीं आपला कांहींच संबंध नाहीं अशी इंग्रजांची खात्री करावी असें सांगितलें असतां, दरबारच्या लोकांनीं तिकडे लक्ष दिलें नाहीं; आणि चालढकल करून आपणांवर व निरपराधी आणि राजनिष्ठ अशा राणीसाहेबांवर संकट ओढवून घेतलें. उलटपक्षीं इंग्रज लोकांनींही राजनिष्ठ **राणीला बंडखोर** ठरविण्यांत फारच मोठी **चूक** केली असें म्हणतां येईल. झांशी हें बंडवाल्यांचें आगर अशी इंग्रजांची समजूत होऊन, इंग्रज सेनापति **सर ह्यू रोज** ह्यानें आपलें साठ हजार सैन्य झांशीच्या

आसपास आणून नाकेबंदी केली. इंग्रज फौज झांशीवर चाल करून येत आहे ही बातमी दरबारांत समजतांच नाना भोपटकर व जुने लोक ह्या मंडळींनीं असें सुचविलें कीं, इंग्रजांस कोणत्याही तऱ्हेनें अडथळा न करितां त्यांस शहरांत येऊं द्यावें व प्रमुख अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन, त्यांस हकीगत सांगावी. पण दरबारी मंडळी व झांशीच्या सैन्यांतील लोक **नथेखांच्या पराभवामुळें** चढेल झाले होते. इंग्रजांचें सैन्य पाहातांच झांशीच्या लोकांस स्फुरण चढलें, त्यांनीं इंग्रजांशीं लढाई देण्याचा बेत केला. कोणी असेंही सांगतात कीं, इंग्रजांनीं झांशीभोंवतीं वेढा दिल्यावर त्यांनीं राणीसाहेबांस निरोप पाठविला कीं, लक्ष्मणराव दिवाणजी, लालाभाऊबक्षी, मोरोपंत तांबे वगैरे आठ मंडळींसह आपण आम्हांस येऊन भेटावें, येतांना दुसरीं माणसें आणूं नयेत. आजपासून दोन दिवसांत भेटावें, पुढें भेटूं नये व येतांना कोणतेंही हत्यार आणूं नये.

अशा तऱ्हेनें राणीसाहेबांस अपमानकारक निरोप आल्यावर त्यांनीं पुढील जबाब पाठविला. "आपण भेटीस कशाकरितां बोलाविलें आहे? दगा होईल कीं काय? याचा पत्रांत कांहींच उल्लेख नाहीं. संस्थानचे चालीप्रमाणें **हत्यारबंद** लोक घेऊन दिवाणजी आपल्या भेटीस येतील. **मी बायको मनुष्य**, माझें येणें होणार नाहीं," अशा तऱ्हेचें पत्र स्वाराबरोबर इंग्रजांकडे पाठवून दिलें. राणीसाहेबांनीं इंग्रजांची मुखत्यार या नात्यानें जें १० महिने राज्य केलें तें इंग्रज अधिकाऱ्यांनीं मुळींच समजून घेतलें नाहीं. झांशींत गोवध होऊं लागला, महालक्ष्मीच्या पूजेकडील उत्पन्नही इंग्रजांनीं जप्त केलें, ह्यामुळें राणीसाहेबांचेंही मन इंग्रजांविरुद्ध झालें व नानासाहेब पेशव्यांशीं पत्रव्यवहार सुरू झाला असेंही कांहीं लोक म्हणतात. पण नानासाहेब ह्या वेळीं नेपाळांत पळून गेले होते हें नानासाहेबांच्या इतिहासावरून समजून येईल.

तरी पण एक विधवा राणी आपला नैसर्गिक गुण टाकून देऊन **सर ह्यू रोज**सारख्या कसलेल्या योद्ध्याबरोबर लढाईला तयार व्हावी हें घडलें तरी कसें? ह्याबद्दल अनेक लोकांचे अनेक तर्क आहेत. कांहीं लोकांचें असें म्हणणें आहे कीं, राणीसाहेबांस आणि तिच्या सरदारांस एकदम कैद करण्याचा इंग्रजांचा विचार होता. हें राणीस समजतांच इंग्रजांपुढें दीन होऊन न जातां आपल्या समशेरीचें पाणी दाखवून आपण धारातीर्थी पतन पावणें हें बरें, असें म्हणून त्यांनीं युद्धाची तयारी केली. कोणी असें म्हणतात कीं, अंगाला रंग लावून नथेखांचेंच हें सैन्य झांशीवर चाल करून येत आहे अशा समजुतीनें किल्ल्यांतून इंग्रजांच्या सैन्यावर तोफा डागण्यांत आल्या. कोणी म्हणतात कीं, राणीसाहेबांनीं सलोखा करण्याकरितां कांहीं स्वार इंग्रजांकडे पाठविले होते; पण त्यांस इंग्रजांनींच कैद केलें. एकंदरींत काय कीं, खरा प्रकार काय झाला, पहिल्यानें आगळीक कोणीं केली हें अद्याप नक्की असें कांहींच समजत नाहीं.

राणीसाहेब बंडखोर आहेत अशी समजूत इंग्रजांची झाली, आणि इंग्रजांची मुखत्यार या नात्यानें दहा महिने झांशीची व्यवस्था पाहिली, संकटसमयीं किल्ल्यांत इंग्रजांना कणिक, रोट वगैरे सामान पोहोंचवून करतां आली ती मदत केली, असें असतां आज इंग्रज माझ्याशीं लढाईला तयार झाला! अशी समजूत राणीसाहेबांची झाली. कांहीं झालें तरी दोन्ही पक्षांमध्यें समजुतीचा घोंटाळा कायमच राहिला व एकमेकांनीं एकमेकांस युद्धाचें आव्हानच केल्यासारखें होऊन उभय पक्षांनीं शेवटीं हातांत **रणकंकणें** बांधून युद्धाची तयारी केली.

चैत्र महिना अगदीं सरत आला होता, उन्हाळ्याची झांक मारूं लागली होती, राजवाड्यांत दरवर्षी चैत्र महिन्यांत **कुलस्वामिनी**

**महालक्ष्मीच्या** हळदीकुंकवाचा फार मोठा थाट होत असे. त्याप्रमाणें यंदांचें हळदीकुंकू उरकून घ्यावें, पुढें लढाई सुरू झाल्यावर हळदकुंकवाचा समारंभ करण्याची पाळी येईल कीं नाहीं कोण जाणे! असें म्हणून राणीसाहेबांनीं एका शुक्रवारीं हळदकुंकवाचा बेत केला. राजवाड्याच्या दिवाणखान्यांत एका मजल्याइतकी उंच गौर मांडून तिच्यापुढें उतरते उतरते असे नाना प्रकारचे फराळाचे पदार्थ, नाना तऱ्हेचीं मातीचीं चित्रें, नाना प्रकारचीं नक्षीचीं कामें, कुंड्यांतून लहान लहान झाडें वगैरे शेंकडों पदार्थ गौरीपुढें मांडले होते व हंड्या-झुंबरांचा तर लखलखाटच करून सोडला होता. किनखापाचे पडदे लावून वर जरीचें छत लाविलें होतें. चार खंडी हरभरे भिजत घातले होते.

हळदकुंकू

शहरांतील **ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र** वगैरे सर्व जातींच्या लोकांस भेदभाव न ठेवितां हळदीकुंकवाचें आमंत्रण दिलें होतें. लढाईच्या भीतीनें शहरची वस्ती कमी झाली होती म्हणून दरवर्षाप्रमाणें बायका-मुलांची गर्दी व्हावी तितकी झाली नाहीं. सर्व बायकांस हळदकुंकू, सुवासिक फुलें, खिरापत, ताह्मनभर हरभरे व अत्तर-गुलाब देऊन संतुष्ट केलें. अशा तऱ्हेनें महालक्ष्मीच्या हळदकुंकवाचा समारंभ मोठ्या थाटाचा झाला. सर्व जातींच्या स्त्रिया उत्तम प्रकारचीं वस्त्रें नेसून व अलंकार घालून दुपारीं दोन वाजल्यापासून रात्रौ नऊ वाजे-पर्यंत वाड्यांत हळदकुंकवास येत होत्या. श्रीमंतांच्या आणि सरकारी लोकांच्या बायका पालखींतून व मेण्यांतून येत होत्या. हळदकुंकू वांटण्याकरितां **शंभर बायका** उभी होतीं, लाखों फुलें व खंडो-गणती खिरापत त्या दिवशीं वांटली. अशा तऱ्हेनें महालक्ष्मीला आळविण्याकरितां व तिला झांशी संस्थानची दया येण्याकरितां हा समारंभ राणीसाहेबांनीं करून घेतला.

होणारी गोष्ट टळत नाहीं ह्या म्हणीप्रमाणें, सर ह्यू रोज साहेबांनीं व महाराणीसाहेबांनीं रणकंकणें बांधून, आपआपल्या पक्षाची मजबुती करण्याची तयारी चालविली. सर ह्यू रोजसाहेबांनीं आपल्या सैन्याचे ७।८ भाग करून, झांशी शहराकडे येणाऱ्या सर्व वाटा रोंखून धरल्या; कारण बंडवाले नानासाहेब व तात्याटोपी हे राणीच्या मदतीस येऊं नयेत. शहरासभोंवतीं सर्व उंच जागांवरून घोडेस्वार, पायदळ, तोफखाने, तारायंत्रें ह्यांची गर्दी इंग्रजांनीं उडवून दिली. एका टेंकडीवर वेधशाळेसारखी उंचच उंच जागा तयार करून, तेथें दुर्बीण लावून, किल्ल्यांत राणीसाहेबांची किती तयारी आहे; मारा कोठें केला पाहिजे; हें समजण्याची सोय केली. शहराभोंवतीं माऱ्याच्या उंच जागांवर तोफांचे मोर्चे तयार करून ठेविले.

**युद्धाची तयारी**

ह्याप्रमाणें सर ह्यू रोज ह्यानें कडेकोट तयारी चालविली; शिवाय त्याच्या मदतीला नवें नवें इंग्रजी सैन्य येतच होतें. राणीसाहेबांनीं हें पहातांच आपण इंग्रजांच्या कैदेंत खास जाणार व मग आपल्या देहाचें पुढें काय होईल त्याचा नेम नाहीं असें म्हणून, रातोरात काल्पी मुक्कामीं **रावसाहेब व तात्या टोपी** ह्यांस निरोप पाठविला कीं, इंग्रजांनीं झांशीस वेढा दिला आहे; आतां लढाई करण्याशिवाय गत्यंतर नाहीं. आम्ही किल्ल्यांतून मारा करतों व आपण बाहेरून इंग्रजांच्या सैन्यावर हल्ला करावा. रावसाहेबांनीं उलट निरोप पाठविला कीं, ठीक आहे, आम्ही आपल्या मदतीस येतों. असा उलट निरोप आल्यावर राणीसाहेबांनींही किल्ल्यामध्यें अन्नाची भरपूर तयारी करून ठेविली. तटाची व बुरजांची दुरुस्ती करून ठिकठिकाणीं तोफा चढविल्या, दारूगोळ्याचें सामान जारीनें सुरू केलें, खंडोगणती चुरमुरे व फुटाणे भाजून ठेविले. तूप, साखर, कणीक, तांदूळ वगैरे पदार्थांचा भरपूर सांठा करून ठेविला. खजिन्यांत पुरेसे पैसे

नव्हते; म्हणून राजवाड्यांत जितकीं मोठमोठीं **चांदीचीं** पातेलीं, हांडे, घागरी, घंगाळें वगैरे भांडीं होतीं तीं टांकसाळेंत पाठवून, त्यांचे **रुपये** पाडले. लढाईंत आपणास जय मिळावा म्हणून महालक्ष्मीवर अनुष्ठानेंही सुरू केलीं.

अशा तऱ्हेनें दोन्ही सैन्यांची तयारी झाली व तारीख २४ मार्च इ० सन १८५८ रोजीं उघड रीतीनें लढाईला तोंड लागलें, शहराच्या

**पहिली सलामी**

तटाबाहेरून इंग्रज सैन्यानें झांशी शहरावर तोफा डागल्या व त्या तोफांच्या आश्रयानें इंग्रज घोडेस्वार शहराकडे येऊं लागले. तेव्हां राणीसाहेबांनीं किल्ल्यांतील गोलंदाजांस हुकूम करून आपल्या तोफा डागण्यास सांगितलें. त्या तोफांच्या माऱ्यामुळें इंग्रज घोडेस्वारांची तारांबळ उडाली. इंग्रजांचा बेत शहराच्या लगत जाऊन शहराच्या तटावर चढून मग शहरांत घुसावें असा होता. म्हणूनच इंग्रजी फौज शहराच्या समोंवार तोफांचे मोर्चे बांधण्याचा प्रयत्न करीत होती. कांहीं केल्या इंग्रजांच्या तोफांचा मारा तटावर चालेना, इंग्रजांनीं शिकस्त केली; पण किल्ल्यांतील राणीच्या गोलंदाजांनीं तोफांच्या गोळ्यांचा पाऊस पाडून इंग्रजांचें कांहींच चालूं दिलें नाहीं. जिकडे तिकडे **रणशिंगें, रणढोल** व **धुराचे लोट** ह्यांच्या योगानें आकाश दुमदुमून गेलें.

दोन दिवस तोफांची एकसारखी सरबत्ती चालली होती. दुसऱ्या दिवशीं रात्रीच्या वेळीं इंग्रजांनीं आपल्या तोफा तटापासून एका

**दुसरी सलामी**

हांकेवर आणल्या. इतक्या जवळ तोफा आणल्यामुळें व माऱ्याची चांगली उंच जागा मिळाल्यामुळें तिसऱ्या दिवशीं इंग्रजांच्या तोफांचे गोळे शहरांत येऊन पडूं लागले व किल्ल्यांतून सुटलेले गोळे इंग्रजांच्या डोकीवरून पुढें जाऊं लागले. यामुळें इंग्रजांचा जोर जास्त होऊन शहरांत जिकडे तिकडे आगी

लागून हाहाकार उडून गेला. रस्त्यांतून कोणी फिरेनासें झालें. आगीमुळें व तोफांच्या गोळ्यांमुळें झांशी शहरांत माणसें मरूं लागलीं. जो तो माणूस प्राणरक्षणाकरितां कानाकोंपऱ्यांत दडून बसूं लागला. पण किल्ल्यांतील हुषार गोलंदाज **गुलाम गोषखां** ह्यानें महाकाळी **घनगर्ज** नांवाची तोफ चालू केली. ह्या तोफेचा चमत्कार असा होता कीं, तिच्यांतील धुराचा लोट अगोदर दिसत नसे, त्यामुळें गोळा आला केव्हां हें इंग्रजांस समजत नसे. त्यामुळें इंग्रज फौजेची दाणादाण उडून जाऊं लागली.

**तिसरी सलामी**

कांहीं केल्या इंग्रजांचा इलाज चालेना. तोफांचा मोर्चा कोठें लावावा म्हणजे किल्ल्यांतील तोफांवर गोळे पडून राणीसरकारच्या तोफा बंद पडतील, हा एकच विचार इंग्रज सैन्यापुढें होता. शहरांतील अगर शहराबाहेरील अगदीं थोड्या लोकांसच किल्ल्याच्या माऱ्याची जागा माहीत होती. ते **फितूर** होऊन म्हणा, किंवा इंग्रजांच्या सुदैवानें म्हणा, त्यांस ती जागा सांपडली. त्या जागेवर इंग्रजांनीं आपल्या तोफांचे मोर्चे बांधिले व आपल्या तोफांस बत्ती देऊन शहरावर व किल्ल्यावर एकदम मारा चालू केला. अशा तऱ्हेनें इंग्रजांनीं चार गरनाळी तोफा चालू केल्यामुळें सबंध शहर हादरून जाऊं लागलें. किल्ल्यांतील गोलंदाज भराभर मरूं लागले. त्यामुळें राणीसाहेबांच्या तोफा बंद पडल्या व तटावरचे कांहीं शिपाई मरून पडले. अर्थात् राणीसाहेबांस अतिशय वाईट वाटूं लागलें; पण राणीसाहेब **कच्च्या दिलाच्या नसल्यामुळें** त्या पुढच्या उद्योगास लागल्या. इंग्रजांच्या ह्या गरनाळी तोफांचा असा चमत्कार असे कीं, गोळा उडून किल्ल्याच्या गच्चीवर येऊन पडावा; त्या ठिकाणीं भोंक पडून खालच्या दालनांत तो फुटावा; पुन्हा त्या ठिकाणीं भोंक पडून त्याच्या खालच्या

दालनांत फुटावा व आंतील खिळे, पातीं जिकडे तिकडे उडून राणी-साहेबांच्या लोकांचा नाश व्हावा. हा प्रत्येक गोळा पक्के ६०-६५शेर वजनाचा असे.

ह्या तोफांमधून जे गोळे सुटत असत; ते आकाशांतून जातांना विजेप्रमाणें दिसत असत. हे गोळे शहरांतील रस्त्यांवर पडले म्हणजे २०-२५ माणसें जखमी होत व ४-५ माणसें मरून जात. हे गोळे घरांवर पडले म्हणजे कांहीं घरें कोसळून पडत व कांहीं घरांना आगी लागत; आणि त्यांच्या ज्वाला रात्रीच्या वेळीं मेघमंडळाला लागलेल्या दिसत, यामुळें शहरांतील रस्त्यांत एकही माणूस फिरेनासें झालें होतें. लोकांचा कामधंदा बंद पडला आणि जो तो फारच काळजींत पडला. श्रीमंत लोक भावी स्थिति लक्षांत आणून व आपल्या संपत्तीचा शक्य तितका बंदोबस्त करून घराच्या वळचणींत अगर भुयारांत जिवाच्या आशेनें जिकडे जागा सांपडेल तिकडे लपून बसूं लागले.

अशा तऱ्हेनें राणीसाहेबांना निराशेची पहिली पायरी लागली. तरी पण न डगमगतां ठिकठिकाणीं नव्या दमाचे लोक ठेवून त्यांनीं चांगला बंदोबस्त केला. जिकडे तिकडे आगच आग होऊन गेली होती. अग्निनारायणाच्या प्रसादानें सर्व लोक दीन होऊन गेले. गरीब लोकांना उपाशीं मरण्याची पाळी आली; पण किल्ल्यांतून त्यांना अन्न व डाळे-फुटाणे वांटण्याची व्यवस्था करण्यांत आली. इंग्रजांकडील सर ह्यू रोज ह्यांच्या मदतीला कवायती सैन्य असल्यामुळें त्यांनीं निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळे मोर्चे बांधावे, तोफा डागाव्या, पण त्यांवर किल्ल्यांतून तोफा व बंदुका ह्यांचा असह्य मारा व्हावा. अशा झटापटीमुळें उभय पक्षांतील लोक फार घायाळ होऊं लागले.

**पुन्हा कडक बिजली**

इतक्यांत किल्ल्यांतील दक्षिण बाजूची राणीची तोफ इंग्रजांच्या गोलंदाजांनीं बंद पाडली. त्या तोफेवर इंग्रजांचा मारा फारच होऊं लागला. राणीसाहेबांचे गोलंदाज मरूं लागले. तेव्हां पुन्हा **कडक-बिजली** तोफ लावून तिसऱ्या गोळ्याला इंग्रजांचा गोलंदाज ठार झाला; व इंग्रजांची तोफ बंद पाडली. तेव्हां राणीसाहेबांनीं संतुष्ट होऊन आपल्या गोलंदाजास **चांदीचा तोडा** बक्षिस दिला. अशा तऱ्हेनें एकदां राणीसाहेबांचा जय व्हावा तर दुसऱ्या वेळीं इंग्रजांचा जय होऊन राणीसाहेबांनीं निराशेचे सुस्कारे टाकावे, असे सहा दिवस लोटले. सातव्या दिवशीं संध्याकाळीं किल्ल्यावरची पश्चिम बाजूची तोफ बंद पडली व तेथील मोर्चा इंग्रजांनीं जमीनदोस्त करून टाकिला. तेव्हां रातोरात राणीसाहेबांनीं गवंड्यांकडून तो मोर्चा भुईसरपटत जाऊन दुरुस्त करविला व तोफा डागून इंग्रजांची फार नासाडी केली.

आठवे दिवशीं उजाडतांच **शंकर बुरुजावर** इंग्रजांनीं तोफांचा भडिमार चालू केला. इंग्रजांजवळ चांगल्या दुर्बिणी असल्यामुळें, किल्ल्यांत कोणता माणूस कोठें उभा आहे हें त्यांस फार चांगलें समजे. किल्ल्यांत पाण्याची जी जागा होती तिकडून सहा-सात कावडे लोक पाणी आणीत होते; त्यांच्या-वर इंग्रजांनीं तोफ डागून चार-पांच कावडे यमसदनीं पाठविले. बाकी राहिलेले कावडे पळत सुटले; त्यामुळें किल्ल्यांत पाण्याची मोठी पंचाईत पडली. तेव्हां राणीसाहेबांनीं किल्ल्याच्या पश्चिमेकडील व दक्षिणेकडील तोफांचा मारा इंग्रजांच्या तोफखान्यांवर चालू करून इंग्रजांच्या तोफा बंद पाडल्या, तेव्हां किल्ल्यांत पाण्याची सोय झाली.

**आगीचा डोंब**

इतक्यांत इंग्रजांकडचा एक भयंकर गोळा किल्ल्यांत येऊन पडला. त्या ठिकाणीं दारूचा कारखाना होता; तो पेटून, तीस पुरुष आणि

आठ बायका मरण पावल्या व सुमारें चाळीस-पन्नास माणसें जखमी झालीं. किल्ल्यांत जिकडे तिकडे धूर आणि धूळ उसळून किल्ल्यांतील सर्व वातावरण धुंद होऊन गेलें, कोणास कोणी दिसेनासें झालें. सर्वांच्या पोटांत धस्स होऊन, हा काय प्रकार घडला तें बराच वेळ कोणास समजलेंही नाहीं. ह्या आठव्या दिवशीं इंग्रजी फौजेनें फार शिकस्त केली. ह्या रात्रीं तोफांमधून सुटणाऱ्या लालभडक गोळ्यांची शहरावर एकसारखी वृष्टीच होत होती. त्यामुळें जिकडे तिकडे **आगीचा डोंब** झाला होता. किल्ल्याच्या तटावरचे शिपाई व गोलंदाज पुष्कळच मेले. राणीसाहेब तामझाममध्यें बसून आपल्या सर्व योद्ध्यांस धीर देत होत्या आणि दमलेल्या लोकांच्या ठिकाणीं नवे लोक आणून ठेवीत होत्या. राणीसाहेबांना आजच्या दिवशीं फारच मेहनत पडून त्या अगदीं दमून गेल्या होत्या.

**भयंकर स्वप्न**

तात्या टोपी व नानासाहेब ह्यांची मदत अद्याप आपणांस कां येत नाहीं; ह्या विचारांत त्या अगदीं गुंग झाल्या होत्या व दिवसभर दमल्यामुळें दिवाणखान्यांत त्यांस बसल्याबसल्याच थोडी झोंपेची गुंगीही आली होती. इतक्यांत त्यांस एक भयंकर **स्वप्न** पडलें, तें असें—कोणी एक सुवासिनी मध्यम वयाची, गौर वर्णाची, नाक सरळ, कपाळ मोठें, डोळे काळे, अशी एक रूपवान् **स्त्री** अंगावर मोत्यांचे दागिने घालून, तांबडें लुगडें नेसून व अंगांत पांढरी रेशीमकांठी चोळी घालून, पदर बांधून, आणि ओचांची कांस मारून, किल्ल्याच्या बुरुजावर उभी आहे व इंग्रजांच्या तोफांचे गोळे झेलीत आहे; आणि गोळे झेलतांना **काळे ठिक्कर** झालेले हात राणीसाहेबांस दाखवून म्हणत आहे कीं, "**बाई-साहेब !** मी म्हणूनच हे गोळे झेलीत आहें." अशा तऱ्हेचें हें भयसूचक स्वप्न एका निमिषमात्रांत बाईसाहेबांस पडल्यामुळें त्या

दचकून जाग्या झाल्या व त्यांनीं आश्रित मंडळींस हें स्वप्न सांगितलें; आणि तीही मंडळी हें स्वप्न ऐकून गुंग होऊन गेली. हल्लींच्या काळीं स्वप्नावर फारसा कोणी विश्वास ठेवणार नाहीं हें सांगावयास नकोच.

ठरल्याप्रमाणें तात्या टोपी १५,००० फौज घेऊन काल्पीहून निघाला, तो मजल दरमजल करीत झांशीजवळ येऊन पोहोंचला.

**तात्या टोपी**

तात्या टोपी येत आहे ही बातमी इंग्रजांस समजली-च होती. म्हणून इंग्रजांची फौज तात्या टोपी ह्यांची वाट पहात बसलीच होती. आज लढाईला दहावा दिवस होता. राणीसाहेबांच्या मदतीस तात्या टोपी आल्यामुळें आज लढाई-चा काय परिणाम होतो हें पाहण्याकरितां झांशींतील लोक बेभान होऊन जिवापाड मेहनत करीत होते. पायदळावरोबर पायदळ, स्वारांवरोबर स्वार, तोफांवरोबर तोफा ह्यांची एकच गर्दी उडून गेली होती. किल्ल्याच्या तटावरून राणीसाहेब दुर्बिण लावून या लढाई-चा काय परिणाम होतो तें पहात होत्या. बिगुल, रणशिंगें, रणढोल, तोफा व बंदुका ह्यांच्या आवाजानें दशदिशा धुंद होऊन गेल्या होत्या. एकीकडून तात्या टोपीचें सैन्य व दुसरीकडून किल्ल्यां-तील राणीचें सैन्य ह्या दोहोंच्या माऱ्यांत इंग्रजांची फौज सांपडली होती; पण इंग्रजांचें दैव मोठें, तात्या टोपी ह्यांची फौज इंग्रजांच्या माऱ्यापुढें टिकाव धरीना. तात्या टोपीच्या फौजेंत असावी तितकी **शिस्त नव्हती**. कांहीं तास लढाई होऊन तात्या टोपी निराश झाले. किल्ल्यांतून राणीसाहेबांच्या तोफांचा मारा इंग्रजांच्या फौजेवर व्हावया-स पाहिजे होता तो फितुरीमुळें झाला नाहीं असें कांहीं लोकांचें म्हणणें आहे.

कदाचित् ह्या मारा किल्ल्यांतून इंग्रजांच्या फौजेपर्यंत ह्या वेळीं

पोहोंचणेंही शक्य नव्हतें. राणीसाहेबांचें सैन्य इतकें थोडें होतें कीं, ह्या वेळीं शहराबाहेर येऊन इंग्रजांवर छापा घालणें वेडेपणाचें ठरलें असतें. राणीसाहेबांच्या कमनशिबामुळें तात्या टोपी ह्यांची फौज इंग्रजांच्या माऱ्यापुढें टिकाव धरीना. त्यांची सर्व फौज उधळून सैरावैरा पळ काढूं लागली. ह्या पळणाऱ्या फौजेच्या पाठीवर इंग्रजांच्या घोडदळानें एकदम हल्ला चढविला, तेव्हां तात्या टोप्यांच्या तोफखान्यावरील लोकांनीं २४ इंची व ३६ इंची तोफा टाकून पोबारा केला. अशा तऱ्हेनें तात्या टोपी ह्यांचा पराभव होऊन त्यांच्या तोफा व अन्नसामुग्री आयतीच इंग्रजांच्या हातीं लागली. तात्या टोपी आल्यामुळें इंग्रजांचें बल मात्र कमी होण्याऐवजीं दुप्पट वाढलें व राणीसाहेब निराशेच्या दुसऱ्या पायरीवर चढल्या.

**अकरावा दिवस उजाडला**

अगदीं मरत पडलेल्या माणसाला सुद्धां जगावेंसें वाटतें; त्याचप्रमाणें तात्याटोपीच्या पराभवानें जरी राणीसाहेब व त्यांचें सैन्य हताश होऊन गेलें होतें, तरी राणीसाहेबांनीं आपले सरदार लोक जमवून त्यांस सांगितलें कीं, झांशी जी आजपर्यंत इंग्रजांशीं लढविली, ती तात्याटोपी अगर पेशवे ह्यांच्या जोरावर मुळींच लढविली नाहीं व ह्यापुढें झांशीस पेशव्यांच्या मदतीची जरूर नाहीं. आपणच आपल्या पराक्रमानें व प्रयत्नानें जें काय होईल तें आपण करूं, असें सांगून राणीसाहेब व त्यांचे सरदार लोक तटाच्या बंदोबस्तास लागले. ह्या रात्रीं इंग्रज लोकांनीं मोठी शिकस्त केली. शहरावर व किल्ल्यावर इंग्रजांच्या तोफांची मारगिरी एकसारखी चालूच होती. त्यामुळें किल्ल्यांतील लोक रात्रभर जागेच होते, **उजाडतां अकरावा दिवस होता.**

आज सकाळीं राणीसाहेबांनीं कमरेला समशेर लटकावून, गोलंदाज लोकांत आवेश उत्पन्न करून ज्या तोफा बंद पडल्या होत्या त्या

पुन्हा चालू केल्या. इंग्रजांनींही आपल्या सर्व गरनाळी तोफा चालू केल्या व किल्ल्यांतील **गणपतिमहाल** पाडून टाकला. हा गणपतिमहाल म्हणजे एक आरसेमहालच होता. जिकडे तिकडे आरसे, हंड्या, झुंबरें, ह्यांनीं भरगच्च अशा त्या दिवाणखान्याच्या डोक्यावर तोफेचा एक गोळा येऊन पडला. तो भयंकर गोळा पटई फोडून जेव्हां त्या आरसेमहालांत आला व फुटला; तेव्हां आंतील खिळे व छरें ह्यांच्या योगानें व गोळयाच्या दणक्यानें आंतील सर्व मालाचा चक्काचूर झाला. आणि त्या ठिकाणीं असलेलीं ४।५ माणसेंही मरण पावलीं व कांहीं जखमीही झालीं. त्या दिवशीं तोफांचे गोळे किल्ल्यांत पुष्कळच येऊन पडत होते. वर पडलेला गोळा तिन्हीं मजल्यांच्या पटयांना भोकें पाडून खालीं यावा व त्या ठिकाणीं फुटून लोकांस इजा व्हावी, अशा तऱ्हेनें इंग्रजांच्या तोफांच्या गोळ्यांच्या योगानें, किल्ल्यांतील घरांस चाळणीसारखीं भोंकें पडलीं होतीं; तरीपण राजवाडा मुळींच खिळखिळा झालेला नव्हता, इतकें राजवाड्याचें काम मजबूत होतें. या दिवशीं दुपारीं इंग्रजांनीं शिकस्त केली. इंग्रजांच्या तोफांचे गोळे खुद्द राजवाड्यावर येऊन पडूं लागले. किल्ल्यांतील राजवाड्यासही चाळणीसारखीं भोकें पडलीं. राजवाड्याच्या प्रत्येक दालनांत गोळे पडूं लागले. तीन तीन छतें तोडून ते लोकांच्या अंगावर पडावे व लोक जखमी व्हावे, असा प्रकार होऊं लागला. लढाई म्हटली म्हणजे असा प्रकार व्हावयाचाच. असल्या गोष्टींनीं लढवय्ये लोक भीत नसतात, राणीसाहेब तर मुळींच भीत नव्हत्या; पण राणीसाहेबांच्या खासगीकडील सर्व लोक भयभीत झाले व ते पांच मजली इमारतीच्या तळमजल्यांत जाऊन बसले, हळुहळू त्या दालनांत ६४ माणसें जमा झालीं. अशा तऱ्हेनें इंग्रजांची मारगिरी सुरू असतां राणीसाहेबांच्या गोलंदाजांनीं भवानी शंकर

घनगर्ज, कडक बिजली, महाकाली अशा तोफांची सरबत्ती उडवून दिली व इंग्रजांच्या तोफांवर एकही गोलंदाज ठरूं दिला नाहीं.

अशा तऱ्हेनें राणीसाहेबांची सरशी होत असतांना एका बातमीदारानें बातमी सांगितली कीं, इंग्रजांचा दारूगोळा व अन्नसामुग्री पार संपली आहे. तेव्हां उद्यां इंग्रज लोक वेढा उठवून जाणार आहेत. अर्थात् ही बातमी ऐकून राणीसाहेबांच्या तोंडावर आनंदाची छटा झळकूं लागली. संध्याकाळ झाली, सहस्ररश्मी सूर्यनारायण राणीसाहेबांचा आणि तिच्या गोलंदाजांचा पराक्रम आपल्या सहस्र डोळ्यांनीं पाहून अस्ताला गेला; आणि फितुरी, चोर, दगलबाज, अशा लोकांना आपलीं कारस्थानें करण्याला योग्य असा रात्रीचा समय प्राप्त झाला. दमलेल्या राणीसाहेबांना वरील बातमी ऐकून थोडीशी झोंपही आली. वाचकहो, वरील बातमी आनंदाची नसून त्यांच्या पोटीं भयंकर फितुरी होती—राणीसाहेबांनीं व त्यांच्या गोलंदाजांनीं बेसावध राहून इंग्रज घरांत घेण्याची ही एक युक्ति होती, असें तुम्हांस पुढें समजून येईल

**पुन्हा फितुर**

वरील खोट्या बातमीनें राणीसाहेबांना थोडीशी झोंप आली असेल अगर नसेल, तों इतक्यांत पहांट झाली. त्या पहांटेच्या सुमारास दुसऱ्या एका बातमीदारानें राणीसाहेबांस एक भयंकर बातमी सांगितली, ती अशी—'बाईसाहेब शहराच्या दक्षिण बाजूच्या तटावरची तोफ बंद पडली आहे व शेंकडों लोक गवताचे भारे डोक्यावर घेऊन किल्ल्याकडे येत आहेत; व त्यांच्या आश्रयानें गोरे लोक चाल करून शहराच्या तटाकडे येण्याचा प्रयत्न करीत आहेत.' ही बातमी सांगून होते न होते तों शेंकडों गवताचे भारे तटाखालीं येऊन पडले. ते भारे इंग्रजांनीं एकावर एक रचून उतरता जिना तयार केला व शिड्याही लाविल्या; आणि

**तटावर इंग्रज**

हजारों इंग्रज भराभर शहराच्या तटापाशीं येऊन धडकले. अर्थात् राणीचे तटावरचे कांहीं लोक पळाले, व कांहीं लोक इंग्रजांनीं कापून काढले. अशा तऱ्हेनें हजारो गोरे लोक तटावर चढून शहरांत उतरले. राणीसाहेबांनीं हें सर्व किल्ल्यांतून पाहिल्यावर त्यांची स्थिति काय झाली असेल ह्याची कल्पना वाचकांनींच करावी. राणीसाहेबांचें वय अवघें २२ वर्षांचें होतें, तरी त्या कच्च्या दिलाच्या नव्हत्या. सर्वसाधारण बायकांचा स्वभाव **मानी तर असतोच;** पण वेळ पडली असतां व सर्व साधनांची अनुकूलता असतां त्यांचा स्वभाव **धाडसी अगर साहसीही** होऊं शकतो. राणीसाहेब तर जात्या शूरच होत्या. त्यांच्याजवळ साधनांचीही अनुकूलता होतीच. अर्थात् राणीसाहेबांनीं क्षणभर विचार करून आलेलें निराशेचें पटल दूर सारून, जिवाला जीव देणारे असे १०००शिपाई बरोबर घेऊन त्या किल्ल्यावरून शहराच्या तटाकडे गेल्या. मग काय विचारतां, गोऱ्या लोकांची व ह्यांची गांठ पडतांच अगोदरच म्यानांतून बाहेर पडलेल्या तरवारींचा खणखणाट सुरू झाला. एकजात **कापाकापी** सुरू झाली. दोन्ही पक्षांतील लोक एकमेकांत मिसळून गेले. राणीसाहेब हातांत नंगी समशेर घेऊन आपल्या लोकांच्या मध्यभागीं लढत होत्या. उभय पक्षांनीं एकमेकांचे पुष्कळ लोक कापून काढले. पण इंग्रजांचें सैन्य शहरांत अतोनात घुसत होतें. शिवाय तरवारींच्या ऐवजीं हे गोरे लोक आडून बंदुकांचाही उपयोग करूं लागले. अर्थात् राणीसाहेबांस इंग्रजांशीं लढाई देणें शक्य नव्हतें. तेव्हां आपल्या सर्व लोकांसह राणीसाहेब पुन्हा किल्ल्यांत गेल्या व किल्ल्याचे दरवाजे त्यांनीं बंद करून घेतले.

आतां चिडलेले इंग्रज लोक शहरांत घुसून विजन म्हणजे **कत्तल** करीत सुटले. पांच वर्षांवर व ऐशीं वर्षांच्या आंत जो पुरुष सांपडेल

त्यास गोळीनें अगर तरवारीनें ते ठार मारीत चालले. एकीकडून शहरास आग लागली होतीच. हलवाईपुरा आणि कोष्टीपुरा बहुतेक जळून खाक झाला होता. त्यांच्या ज्वाला रात्रींच्या वेळीं वर जाऊं लागल्या म्हणजे त्या आकाशाला जाऊन भिडत व सर्व शहरभर उजेड पडे. गोरे लोक घरांत शिरून सोन्यानाण्याची लूट करूं लागले. आपला पैसा चट्दिशीं गोऱ्याला सादर केला नाहीं तर, त्या घरांतील पुरुषाला तो गोरा छाटीत असे. इतक्यांत त्या पुरुषाची बायको नवऱ्याच्या कमरेला मिठी मारी; व नवऱ्याकरितां उपसलेली तरवार चुकून बायकोला लागे, आणि ती पतिव्रता स्त्री स्वर्गाची वाट धरी; पण नवरा मेला नाहीं म्हणून तो गोरा पुन्हा नवऱ्यावर गोळी घाली. गोरा शिपाई आळींत किंवा घरांत घुसला म्हणजे आपण भ्रष्ट होऊं ह्या भीतीनें पुष्कळ कुलीन लोकांच्या बायकांनीं विहिरींत उड्या टाकून प्राणही दिले. अशा तऱ्हेनें अनेक कुटुंबांचा फडशा उडाला. गोऱ्या शिपायांनीं द्रव्याच्या आशेनें जमिनी व भिंतीही खणून पाहिल्या.

**विजन**

शहराच्या मध्यभागीं भिड्यांचा बाग होता. त्या ठिकाणीं जिवाच्या आशेनें पुष्कळ लोक जमले, तेथें गोरे लोक येतांच त्यांस साष्टांग नमस्कार घालून आम्ही बंडवाले नाहीं, आम्ही गरीब रयत आहों असें म्हणून, ह्या जमलेल्या लोकांनीं जीवदान मागितलें. तेव्हां गोऱ्या अधिकाऱ्यांस दया येऊन त्यांचा योग्य बंदोबस्त केला. गोऱ्या लोकांनीं स्त्रियांस बुद्धिपुरस्सर असें मुळींच मारिलें नाहीं, असें कांहींचें म्हणणें आहे. एका गोऱ्याबरोबर दोन काळे शिपाई दिले होते; व स्त्रियांचा अपमान, विटंबना किंवा प्राणनाश न होण्याबद्दल फार खबरदारी घेतली होती; आणि तसें करणें शिपाईगिरीला शोभण्यासारखें होतें ह्यांत मुळींच शंका नाहीं.

अशा तऱ्हेनें झांशी शहर गोऱ्या लोकांच्या हातांत गेल्यावर, आतां किल्ला सर करणें हें इंग्रजांस फारसें कठिण नव्हतें. राणीसाहेब पुन्हा किल्ल्यांत गेल्यावर **गुलाम गोषखां** व **कुवर बकस** हे हुषार गोलंदाज इंग्रजी तोफांस बळी पडले, ही

जोहार


बातमी त्यांस समजतांच, त्या तेजस्वी राणीसाहेबांची काय स्थिति झाली असेल हें शब्दांनीं सांगणें कठीण आहे. आश्रित मंडळी विचारमग्न होऊन थिजून गेली. कोणास कांहीं सुचेना आणि राणीसाहेबांजवळ जाण्याची कोणासच छाती होईना. एक प्रहर राणीसाहेब दिवाणखान्यांत विचारशून्य होऊन पडल्या होत्या, नंतर शहराची काय हालहवाल आहे हें पाहाण्याकरितां गच्चीवर आल्या, तेव्हां त्या दीन शहराचें जें दु:ख त्यांच्या दृष्टीस पडलें त्यामुळें त्यांच्या डोळ्यांतून खळखळां पाणी आलें. हलवाईपुरा व कोष्टीपुरा पेटून ज्वाळांचे लोळ वर जातांना दिसूं लागले. जिकडे तिकडे रडारड झालेली त्यांनीं ऐकली. बंदुकांचे आवाज, माणसांची रडारड, गाई-म्हशींच्या दीन मुद्रा, रस्त्यानें उपाशीं भटकणाऱ्या जनावरांचें ओरडणें, हें सर्व पाहून राणीसाहेबांस **दे माय धरणी ठाय** असें होऊन गेलें.

हे आपले सर्व शूर लोक माझ्याकरितां मेले ! हलवाईपुऱ्याची राखरांगोळी माझ्यामुळें झाली ! गरीब गाईंच्या विलापांना मीच कारण झालें ! हजारों निरपराधी लोकांची बिजन माझ्यामुळेंच झाली ! आणि शेवटीं अपयश घेऊन इंग्रजांच्या स्वाधीन होण्याची पाळी मजवर येऊन ठेपली ! असे एक का दोन, अनेक विचारतरंग राणीसाहेबांच्या मनांत येऊन, आपल्या शिल्लक राहिलेल्या लोकांस त्यांनीं असें सांगितलें कीं, आजपर्यंत आपण झांशी लढविली; पण ह्यापुढें आपला निभाव लागणार नाहीं, करितां आपल्या जीवरक्षणाचा ज्यास जो उपाय सुचेल तो त्यानें करावा. मी मात्र वाड्यांत दारू-

गोळा भरून तो पेटवून जोहार करून घेणार आहें. हे शब्द एका वृद्ध सरदारानें ऐकून त्यानें राणीसाहेबांस असा उपदेश केला कीं, बाईसाहेब, आत्महत्या करणें हें पाप आहे; **शूर लोक का कुठें आत्महत्या करून घेतात?** आपण आज रात्रीं शत्रूची फळी फोडून निघून जाऊं व पेशव्यांच्या सैन्यास मिळूं. शत्रूची फळी फोडतांना धारातीर्थीं मरण आलें तर वरेंच; पण आम्ही जोंपर्यंत जिवंत आहोंत तोंपर्यंत तुमचें शरीर इंग्रजांच्या हातीं मुळींच लागूं देणार नाहीं.

**हरहर महादेव**

राणीसाहेबांस हें बोलणें पटून त्यांनीं सायंकाळ झाल्यावर आपली सरदार मंडळी बोलावून त्यांची अखेरची भेट घेतली व त्यांना त्यांच्या त्यांच्या कामगिरीबद्दल बक्षिसें देऊन व शेवटचा निरोप देऊन, किल्ल्याच्या गुप्त दरवाजानें त्यांस शहरांत पाठवून दिलें राणीसाहेबांचे फार दिवसांचे जुने आश्रित लोक, शागीर्द, दासी व हुजरे ह्यांसही बाईसाहेब आजपासून आपणांस अंतरणार हें पाहून रडूं कोसळलें; पण बिचारे करतात काय? राणीसरकारच्या–आपल्या मालकिणीच्या–आपल्या अन्नदात्या बाईसाहेबांच्या–पायां पडून त्या लोकांनीं आपला मार्ग धरिला. कांहीं स्वामिनिष्ठ लोक राणीसाहेबांबरोबर जाण्यास तयार झाले. रात्रीं बाराच्या सुमारास सर्व तयारी करून किल्ल्याच्या बाहेर पडण्याचा राणीसाहेबांनीं विचार केला. मोरोपंत तांबे वगैरे जी मंडळी होती ती हत्यारबंद होऊन घोड्यावर बसून तयार झाली. त्यांनीं वाटखर्चाकरितां घेववेल तितकें द्रव्य घेऊन. विश्वासू शिलेदार मंडळींजवळ कमरेस बांधण्यास दिलें व संस्थानचें सर्व जडजवाहीर हत्तीवर हौद्यांत भरून तो हत्ती घोडेस्वारांच्या मध्यें घेतला. शिवाय सुमारें दोनशें जिवाला जीव देणारे निवडक स्वार व कांहीं अरब लोक बरोबर




ग्वालेरचा किल्ला.




पाठीशीं मुलाला बांधून राणीसाहेब इंग्रजांच्या वेढ्यांतून झांशीहून पळून गेल्या.

घेऊन राणीसाहेब निघण्याकरितां तयार झाल्या. स्वतः बाईसाहेबांनीं पुरुषवेष धारण केला होता, अंगांत तारेचें चिलखत घातलें होतें, कमरेस जंबिया व पिस्तुलें तर होतींच; पण आपली आवडती समशेर-ही लटकावून दिली होती; आणि अशा तयारीनें राणीसाहेब आपल्या कुलस्वामिनीला, आपल्या किल्ल्याला व आपल्या वडिलांना नमस्कार करून आपल्या **राजरत्न** नांवाच्या घोड्यावर बसल्या.

स्वतः राणीसाहेबांनीं आपल्याबरोबर कांहींच द्रव्य घेतलें नव्हतें. फक्त एक रुप्याचा पेला पदराशीं बांधून घेतला होता आणि पाठीशीं आठ नऊ वर्षांचा दत्तक मुलगा दामोदरराव यासही रेशीमकांठी धोतरानें बांधून घेतलें होतें. याप्रमाणें सर्व तयारी झाल्यावर रात्रीं बारा वाजतां **हरहर महादेव** अशी गर्जना करून सर्व मंडळी किल्ल्याखालीं उतरली व भरशहरांतून जाण्याचा निश्चय करून राणी-साहेबांनीं आपला घोडा भरधांव पुढें काढला. ह्या वेळीं त्या शूर शिपायांनीं व पौरजनांनीं बाईसाहेबांस शेवटचा नमस्कार केला; व राणीसाहेबांनींही सर्वांचा सप्रेम निरोप घेतला. नंतर राणीसाहेबांनीं घोड्याला जी टांच मारली त्या टांचेसरशीं राणीसाहेब शहराच्या बाहेर पार निघून गेल्या.

**हातावर तुरी**

शहराच्या बाहेर पडतांना राणीसाहेबांबरोबर फक्त घोड्यावर बसलेली **सुंदर** ह्या नांवाची एक दासी, **दामोदरराव** व पंधरा-वीस जिवाला जीव देणारे स्वार इतकेच होते व बाकी-चे दोनशें स्वार मागाहून येत होते. ज्या दरवाजा-नें राणीसाहेब निघून गेल्या त्या दरवाजावर इंग्रजांचें सैन्य होतें. अर्थात् त्या सैन्यानें राणीसाहेबांना अटकाव केला; परंतु तेहेरी संस्थानचें हें सैन्य आहे; व तें सर ह्यू रोज ह्यांच्या मदतीला जात आहे असें सांगून त्या पार निघूनही गेल्या. सर ह्यू रोज ह्यास हें

समजतांच इंग्रज स्वार पाठीमागें लागले; पण रात्रीचा समय असल्या-मुळें राणीसाहेबांनीं जो घोडा एकदां भरधांव फेकला, तो इंग्रज स्वारांस दिसेनासा झाला, तेव्हां इंग्रज स्वार मागें परतले. राणी-साहेबांनीं आपला घोडा काल्पीकडे वळवून, पाठीशीं मुलगा बांधून, अवघ्या **वीस** तासांत एकशेंदोन मैलांचा प्रवास करून, काल्पीस रावसाहेब पेशवे होते त्यांस जाऊन त्या मिळाल्या, रावसाहेब पेशवे हे नानासाहेब पेशव्यांचे दत्तक पुतणे होत. नानासाहेब पेशवे ह्या वेळीं नेपाळच्या बाजूला पळून गेले होते.

वाचकहो, ज्या अवघ्या बावीस वर्षांच्या बाईनें पाठीशीं मूल बांधून भर उन्हाचा एकशेंदोन मैलांचा प्रवास अवघ्या **वीस बावीस** तासांत केला व सर ह्यू रोजसारख्या कसलेल्या योद्धयाच्या हातावर तुरी देऊन काल्पी गांठली; त्या बाईच्या–त्या राणीसाहेबांच्या–पराक्रमाची जितकी तारीफ करावी तितकी थोडीच होईल. राणीसाहेबांच्या मागून येणाऱ्या २०० स्वारांबरोबर मोरोपंत तांब्यांचा जडजवाहिरानें लादलेला हत्ती होता. हें सर्व लटांबर इंग्रजांच्या तावडींतून सुटणें फारच कठीण होतें, अर्थात् ह्या स्वारांची व इंग्रजांची गांठ पडतांच लढाई जुंपली. ह्या वेळीं राणीच्या स्वारांनीं आपलें शौर्य इंग्रजांस दाखविण्यास कमी केलें नाहीं. पण इंग्रज सैन्य फार असल्यामुळें कांहीं स्वार लढतां लढतां मरण पावले; आणि बाकीचे स्वार व सेनापति **लालाभाऊ** आणि **मोरोपंत** तांबे हे वाट सांपडेल तिकडे पळत सुटले. मोरोपंत तांब्यांना मांडीवर वार लागला होता, सर्व कपडे रक्तबंबाळ झाले होते; तरी पण ते तसेच हत्तीवर बसून दतिया संस्थानच्या हद्दींत गेले. दतियाच्या राजानें त्यांस पकडून त्यांचें जवाहीर जप्त करून, त्यांना झांशींत इंग्रजांकडे पाठवून दिलें; आणि सेनापति लालाभाऊ बक्षी हेही पकडले गेले. नंतर ह्या दोघांस

[stamp]

इंग्रजांनीं झांशीस फांशीं दिलें. अशा तऱ्हेनें राणीसाहेबांच्या वडिलांचा व सेनापति लालभाऊ बक्षी यांचा शेवट झाला.

राणीसाहेब अकरा दिवस किल्ल्याच्या आश्रयानें लढून रात्रीच्या वेळीं इंग्रजांच्या हातावर तुरी देऊन काल्पींत गेल्यावर इंग्रज सैन्यानें झांशीच्या किल्ल्यावर आपलें निशाण लाविलें.

**यमाचा दरबार**

किल्ल्यांत त्यांस एकही मनुष्य दिसलें नाहीं, त्यामुळें त्यांस कोणत्याही तऱ्हेचा अडथळा झाला नाहीं. राणीसाहेब झांशी सोडून गेल्यावर त्या शहरास भयाण स्वरूप प्राप्त झालें. इंग्रज लोकांनीं शहरांत शिरून कत्तल सुरू केली. जिवाच्या भीतीनें लोक अन्नपाण्याशिवाय भुयारांत लपून बसले. हलवाईपुऱ्याला आग लागल्यामुळें इतर घरेंही वाऱ्यानें पेटत होतीं. रस्तोरस्तीं प्रेतांचे ढीग पडलेले होतेच. रस्त्यांतून रक्ताचे पाट वाहिलेले दिसत होते. कोल्हे, कुत्रीं व गिधाडें ह्यांची एकच गर्दी होऊन गेली होती. तीन दिवस झांशी शहरांत कत्तल चालू होती. सुमारें पांच हजार लोकांची कत्तल झाली असावी. गरीब लोक अन्नाकरितां तडफडत होते, बायको आपल्या नवऱ्याकरितां रडत होती; आणि आपल्या बायकोनें गोऱ्याच्या भीतीनें विहिरींत उडी टाकली म्हणून नवरा आपल्या बायकोकरितां शोक करीत होता. लहान लहान मुलें अन्नाकरितां व आपल्या आयांकरितां रडत होतीं. अशा तऱ्हेनें झांशी शहर म्हणजे खाटीकखाना किंवा यमाचा दरबार होऊन राहिला होता. लढाई म्हटली म्हणजे अशा गोष्टी व्हावयाच्याच त्याबद्दल वाईट वाटण्याचें मुळींच कारण नाहीं.

विजयी इंग्रजांनीं झांशी हस्तगत केल्यावर तीन दिवस भयंकर कत्तल केली. ही कत्तल संपल्यावर इंग्रज सैन्यास झांशी शहराची लूट करण्याची परवानगी मिळाली. सोनें, रुपें, हिरे, मोत्यें, पाच,

जितकें म्हणून सांपडेल तितकें गोऱ्या लोकांनीं नेलें. लोकांच्या घरांतील सोन्याचांदीचे देव सुद्धां नेले. नंतर इंग्रज सैन्य राजवाड्यांत शिरलें. तेथें सर्व प्रकारची लूट केली.

**झांशींत लूट**

राजे लोकांकडून नजराणे म्हणून मिळालेलें जडजवाहीर, हिरे, वगैरे रत्नें राजवाड्यांत फार पूर्वीपासून होतीं; तीं व सोनें वगैरे लुटून इंग्रजांनीं आपल्या गोटांत नेलें. शिवाय राजवाड्यांतील मौल्यवान जिन्नस जे नेतां आले तेही नेले व बाकीच्या जिनसांची मोडतोड करून टाकिली. विलोरी कांच सामान, मश्रूचे पडदे, गाद्या, लोड, रुप्याचे पलंग, खुर्च्या, सोन्यारुप्याच्या मुठीच्या तलवारी, रुप्याच्या काठ्या, हस्तिदंती सामान, पागोटीं, पैठण्या, शालजोड्या, नकशीदार जुनें सिंहासन इत्यादि हजारों जिनसांची त्यांनीं लूट केली.

झांशीस फार मोठा **ग्रंथसंग्रह** होता. चारी वेदांवरील सर्व पुस्तकें अगर पोथ्या, धर्मविषयक ग्रंथ, ज्योतिष, वैद्यक, नाटक, काव्य, वगैरे विषयांवरचे ग्रंथ ह्या ग्रंथसंग्रहालयांत होते कोठेंही कोणीं नवा ग्रंथ लिहिला म्हणजे, त्याची हस्तलिखित प्रत करून आणून ठेवावी असा ह्या संस्थानचा रिवाज होता. म्हणून हजारो ग्रंथ ह्या ग्रंथसंग्रहांत लोकांस पाहाण्यास मिळत असत. अशा ह्या मूल्यवान ग्रंथांचीं वरचीं वेष्टणें काढून ते ग्रंथ रस्त्यांत फेंकून दिले. **महालक्ष्मीच्या** अंगावरील दागिनेही लुटून नेले. राजवाड्यांतील फरासखान्यांत व अजबखान्यांत जे जिन्नस त्यांस सांपडले, ते सर्व त्यांनीं नेले. ह्याप्रमाणें त्या इतिहासप्रसिद्ध राजवाड्याचा एका दिवसांत सर्वस्वीं नाश झाला. राणीसाहेबांचे हत्ती, घोडे व चाळीस तोफा इंग्रजांस मिळाल्या. ह्याशिवाय बंदुका व तोफा किती मिळाल्या ह्याची गणतीच नाहीं. हे लुटीचे दिवस निरनिराळ्या पलटणींना निरनिराळे वांटून दिले होते. गोऱ्या लोकांनीं लूट केल्यावर काळ्या पलटणींना लूट करण्याची

पाळी आली. ह्या पलटणीनें तांब्यापितळेच्या भांडयांची लूट केली. भीतीनें लोकांनीं आपलीं भांडीं विहिरींत टाकलीं होतीं, तीं त्यांनीं गळानें काढून नेलीं. लोकांच्या घरांत शिरून उंची उंची वस्त्रें, पितांबर, फाटकीं धोतरें, पांघरुणें, संतरंज्या, जाजमें वगैरे जमवून तीं हत्तीवर लादून ते घेऊन गेले. नंतर धान्याची लूट करण्यास आरंभ केला. बैलांच्या पाठीवर गोण्या घालून सांपडेल तितकें धान्य शिपाई घेऊन गेले.

**झांशींत शांतता**

ह्याप्रमाणें चार दिवस लूट झाल्यावर इंग्रजांनीं **खुल्क खुदाका मुल्क बादशहाका, अंमल इंग्रज सरकारका,** अशी दवंडी सर्व शहरांत पिटविली व माफीचा जाहीरनामा लावून उरलेल्या लोकांस निर्भय केलें. अशा तऱ्हेनें **इंग्रजांच्या शिस्तीच्या कारभारास झांशीस सुरवात झाली.** इंग्रजांचा शिस्तीचा कारभार म्हटला म्हणजे शिस्तच दिसावयाची, ह्यांत मुळींच शंका नाहीं. इंग्रजांनीं कोष्टीपुरा, हलवाईपुरा जळत होता, तो बंब आणून विझविला. हजारों लोकांचीं प्रेतें रस्त्यांत कुजत होतीं त्यांपैकीं कांहीं प्रेतें लोकांच्या घरांतील लांकडें काढून, त्यांची भली मोठी चिता करून, त्यांत जाळून टाकलीं. ह्याप्रमाणें दर चव्हाटयावर प्रेतांचे ढीग जळूं लागले. ज्या लोकांस आपल्या धर्माप्रमाणें प्रेत-संस्कार करावयाचा होता, त्यांच्या स्वाधीन त्यांच्या आप्तांचीं प्रेतें करण्यांत आलीं. बाकी राहिलेलीं प्रेतें सार्वजनिक चितेंत टाकण्यांत आलीं. ह्याशिवाय हत्ती, घोडे, बैल, उंट वगैरे हजारों जनावरें जागजागीं मरून पडलीं होतीं, तीं सर्व उचलून भला मोठा खंदक खणून, त्यांत तीं गाडून टाकलीं. पलटणीच्या लोकांकडून रस्ते साफ करविले. याप्रमाणें सर्व शहर इंग्रज सरकारनें स्वच्छ करून टाकलें.

नंतर राजवाड्यापुढें अनेक दुकानें मांडलीं, त्यांत लुटीचा माल

विक्रीकरितां ठेविला. तेव्हां शहरांतील लोक आपल्या संसाराचीं भांडींकुंडीं, धान्य, कपडे, वगैरे जिन्नस विकत घेऊं लागले. लोकांजवळ पैसा शिल्लक नव्हताच, तरीपण लपवून ठेविलेला जो थोडासा पैसा शिल्लक ठेविला होता तो घेऊन, ते लोक वरील दुकानांत गेले. इंग्रजांच्या छावणीमध्यें राजवाड्याच्या लुटींत मिळविलेल्या अनेक मूल्यवान् वस्तूंचा लिलांव सुरू झाला. हत्ती, घोडे, उंट, जवाहीर, तामझाम, वगैरे सर्व वस्तु लिलांवानें विकून ब्रिटिश सरकारास पुष्कळ नफा झाला. झांशीच्या लढाईंत इंग्रजांचे ३६ अंमलदार व ४०६ सैनिक मारले गेले. असो. आतां राणीसाहेबांचें काय झालें तें पाहूं.

**झांशी ते काल्पी**

राणीसाहेब इंग्रज सैन्याच्या माऱ्यांतून ज्या निसटल्या त्या थेट काल्पीस येऊन पोहोंचल्या. त्यांच्याबरोबर **काशी** व **सुंदर** ह्या दोन दासी होत्याच, त्याही घोड्यावर बसण्यांत मोठ्या पटाईत होत्या. **दामोदरराव** हेही बरोबर होतेच. काल्पी हें शहर टुमदार असून यमुनेच्या कांठीं वसलेलें आहे. इ० सन १८५७ च्या जूनमध्यें कानपूर येथील बंडवाले नानासाहेब, रावसाहेब, तात्या टोपी, हे ह्या ठिकाणीं आले व इंग्रजांचा कलेक्टर मुनशी शिवप्रसाद ह्यांस हुसकावून देऊन, त्यांनीं तें शहर व किल्ला आपल्या ताब्यांत घेतला व हे बंडवाले मोठ्या बंदोबस्तानें तेथें राहिले व हळुहळू इतर बंडवालेही जमा होऊं लागून दारूगोळा व युद्धाची सामुग्रीही बंडवाल्यांनीं तयार केली. अर्थात् राणीसाहेबांना आश्रयाची अशी ह्या वेळीं ही एकच जागा होती. पाठलाग करणाऱ्या इंग्रजी फौजेला झुकांडी देऊन झांशीपासून काल्पीपर्यंत १०२ मैलांचा प्रवास पाठीशीं मूल बांधून अवघ्या बावीस तासांत ज्या बाईनें केला, **त्या बाईचें धाडस–त्या बाईचें चातुर्य–त्या बाईचा काटक-पणा**–हे सर्व गुण स्त्रीजातीला मार्गदर्शक असून प्रयत्नानें स्त्रियांचा

दर्जा काय असूं शकेल ह्याचें राणीसाहेब हें मूर्तिमंत उदाहरणच आहे यांत मुळींच शंका नाहीं.

राणीसाहेब काल्पीस रात्रीं बारा वाजतां पोंचल्यावर, उजाडतां सकाळीं पेशव्यांस भेटावें असा त्यांचा बेत होता. राणीसाहेबांजवळ व दासींजवळ एकही वस्त्र नव्हतें. सर्वांचा पोषाख मर्दानी होता, त्यामुळें जवळ लुगडें वगैरे कांहीं नव्हतें व त्या छावणींतही बायकांचीं वस्त्रें असणें शक्य नव्हतें. बरें, नवीन वस्त्र विकत आणावें तर जवळ पैसाही नव्हता. छावणींत पेशव्यांकडे लुगड्यांची मागणी करावी तर त्या मानी राणीला जिवावरची गोष्ट येऊन पडली; पण राणीसाहेबांच्या आगमनाचें वर्तमान रावसाहेब पेशव्यांस समजतांच त्यांनीं, तात्या टोपी ह्यांस त्यांच्या बंदोबस्तास पाठवून दिलें. नंतर भांडीं-कुंडीं, शिपाई-प्यादे वगैरे सर्व व्यवस्था त्यांच्या दर्जाप्रमाणें करून दिली. नंतर शांतपणें श्रीमंत रावसाहेब पेशवे व राणीसाहेब ह्यांच्या भेटी होऊन पुढील बोलणीं झालीं. राणीसाहेबांनीं आपली समशेर पुढें ठेवून म्हटलें, "आम्ही पूर्वापार श्रीमंत पेशव्यांचे सुभेदार. ही समशेर तुमच्या पूर्वजांनीं आम्हांस दिली. आजपर्यंत तिचा उपयोग आम्हीं केला; पण आतां आपली मदत आम्हांस राहिली नाहीं, करितां ही परत घ्यावी." त्या माउलीचें हें भाषण ऐकून रावसाहेबांचा कंठ दाटून आला व ते म्हणाले, "आपण म्हणतां तसा प्रकार झाला खरा; पण आपण जो पराक्रम केलांत त्यावरून सर्व सैन्याचें आधिपत्य आपण स्वीकारून आम्हांस मदत कराल तरच सर्व हेतु तडीस जातील. ह्याकरितां ही समशेर परत घेऊन आम्हांस मदत करावी." असें श्रीमंतांचें भाषण ऐकून राणीसाहेबांनीं आपली समशेर परत घेतली व झांशीच्या पराभवामुळें जरी त्या निरुत्साही झाल्या होत्या तरी इंग्रजांशीं शेवटचे दोन हात करून मग मरून जाण्याचा त्यांनीं निश्चय केला.

समजतांच इंग्रज स्वार पाठीमागें लागले; पण रात्रीचा समय असल्यामुळें राणीसाहेबांनीं जो घोडा एकदां भरधांव फेकला, तो इंग्रज स्वारांस दिसेनासा झाला, तेव्हां इंग्रज स्वार मागें परतले. राणीसाहेबांनीं आपला घोडा काल्पीकडे वळवून, पाठीशीं मुलगा बांधून, अवघ्या **वीस** तासांत एकशेंदोन मैलांचा प्रवास करून, काल्पीस रावसाहेब पेशवे होते त्यांस जाऊन त्या मिळाल्या, रावसाहेब पेशवे हे नानासाहेब पेशव्यांचे दत्तक पुतणे होत. नानासाहेब पेशवे ह्या वेळीं नेपाळच्या बाजूला पळून गेले होते.

वाचकहो, ज्या अवघ्या बावीस वर्षांच्या बाईनें पाठीशीं मूल बांधून भर उन्हाचा एकशेंदोन मैलांचा प्रवास अवघ्या **वीस बावीस** तासांत केला व सर ह्यू रोजसारख्या कसलेल्या योद्ध्याच्या हातावर तुरी देऊन काल्पी गांठली; त्या बाईच्या–त्या राणीसाहेबांच्या–पराक्रमाची जितकी तारीफ करावी तितकी थोडीच होईल. राणीसाहेबांच्या मागून येणाऱ्या २०० स्वारांबरोबर मोरोपंत तांब्यांचा जडजवाहिरानें लादलेला हत्ती होता. हें सर्व लटांबर इंग्रजांच्या तावडींतून सुटणें फारच कठीण होतें, अर्थात् ह्या स्वारांची व इंग्रजांची गांठ पडतांच लढाई जुंपली. ह्या वेळीं राणीच्या स्वारांनीं आपलें शौर्य इंग्रजांस दाखविण्यास कमी केलें नाहीं. पण इंग्रज सैन्य फार असल्यामुळें कांहीं स्वार लढतां लढतां मरण पावले; आणि बाकीचे स्वार व सेनापति **लालाभाऊ** आणि **मोरोपंत** तांबे हे वाट सांपडेल तिकडे पळत सुटले. मोरोपंत तांब्यांना मांडीवर वार लागला होता, सर्व कपडे रक्तबंबाळ झाले होते; तरी पण ते तसेच हत्तीवर बसून दतिया संस्थानच्या हद्दींत गेले. दतियाच्या राजानें त्यांस पकडून त्यांचें जवाहीर जप्त करून, त्यांना झांशींत इंग्रजांकडे पाठवून दिलें; आणि सेनापति लालाभाऊ बक्षी हेही पकडले गेले. नंतर ह्या दोघांस

८१७५

इंग्रजांनीं झांशीस फांशीं दिलें. अशा तऱ्हेनें राणीसाहेबांच्या वडिलांचा व सेनापति लालाभाऊ बक्षी यांचा शेवट झाला.

राणीसाहेब अकरा दिवस किल्ल्याच्या आश्रयानें लढून रात्रीच्या वेळीं इंग्रजांच्या हातावर तुरी देऊन काल्पींत गेल्यावर इंग्रज सैन्यानें झांशीच्या किल्ल्यावर आपलें निशाण लाविलें. किल्ल्यांत त्यांस एकही मनुष्य दिसलें नाहीं, त्यामुळें त्यांस कोणत्याही तऱ्हेचा अडथळा झाला नाहीं. राणीसाहेब झांशी सोडून गेल्यावर त्या शहरास भयाण स्वरूप प्राप्त झालें. इंग्रज लोकांनीं शहरांत शिरून कत्तल सुरू केली. जिवाच्या भीतीनें लोक अन्नपाण्याशिवाय भुयारांत लपून बसले. हलवाईपुऱ्याला आग लागल्यामुळें इतर घरेंही वाऱ्यानें पेटत होतीं. रस्तोरस्तीं प्रेतांचे ढीग पडलेले होतेच. रस्त्यांतून रक्ताचे पाट वाहिलेले दिसत होते. कोल्हे, कुत्रीं व गिधाडें ह्यांची एकच गर्दी होऊन गेली होती. तीन दिवस झांशी शहरांत कत्तल चालू होती. सुमारें पांच हजार लोकांची कत्तल झाली असावी. गरीब लोक अन्नाकरितां तडफडत होते, बायको आपल्या नवऱ्याकरितां रडत होती; आणि आपल्या बायकोनें गोऱ्याच्या भीतीनें विहिरींत उडी टाकली म्हणून नवरा आपल्या बायकोकरितां शोक करीत होता. लहान लहान मुलें अन्नाकरितां व आपल्या आयांकरितां रडत होतीं. अशा तऱ्हेनें झांशी शहर म्हणजे खाटीकखाना किंवा यमाचा दरबार होऊन राहिला होता. **लढाई म्हटली म्हणजे अशा गोष्टी व्हावयाच्याच** त्याबद्दल वाईट वाटण्याचें मुळींच कारण नाहीं.

विजयी इंग्रजांनीं झांशी हस्तगत केल्यावर तीन दिवस भयंकर कत्तल केली. ही कत्तल संपल्यावर इंग्रज सैन्यास झांशी शहराची लूट करण्याची परवानगी मिळाली. सोनें, रुपें, हिरे, मोत्यें, पाच,

इकडे इंग्रजांनीं झांशीची व्यवस्था लावून व राणीच्या पक्षाच्या लोकांस हुडकून काढून, त्यांस फांशीं देऊन, अगर गोळ्या घालून झांशींतील लोकांचा बंदोबस्त केला व मग त्यांचा मोर्चा काल्पीकडे वळला. कारण, काल्पीच्या किल्ल्याचा आश्रय करून बंडवाले इंग्रजांवर छापे घालीत होते.

**कुंचची लढाई**

काल्पीकडे इंग्रजी सैन्य येत आहे असें बंडवाल्यांस समजतांच, इंग्रजांशीं लढाई देण्याकरितां बंडवाल्यांनीं काल्पीपासून सुमारें चाळीस मैलांवर झांशीच्या रस्त्यावर कुंच शहरापाशीं आपला तळ दिला व युद्धाची तयारी केली. इतर बंडवालेही कुंचकडे येऊं लागले. राणीसाहेबांचें स्वतःचें असें सैन्य आतां शिल्लक नसल्यामुळें रावसाहेबांनीं २००—३०० स्वार त्यांच्या ताब्यांत दिले होते. राणीसाहेब रावसाहेब पेशव्यांस सांगत असत कीं, आपल्या **सैन्यांत शिस्त नाहीं**, ती अगोदर लावा व मग लढाई द्या. पण हें न ऐकतांच त्यांनीं इंग्रजांवर तोफांचा मारा चालू केला. पहिल्यानें बंडवाल्यांचा जय झाला खरा; तरी पण मुख्य सैन्याच्या दोन्ही बगलांना सैन्य ठेवावें लागतें तें न ठेवितां रावसाहेब पेशव्यांनीं इंग्रजांशीं लढाई सुरू केली. इंग्रज सेनापति **सर ह्यू रोज** ह्यानें आपल्या सैन्याच्या चार पांच टोळ्या करून बंडवाल्यांच्या पिछाडीस दोन तीन मैलांच्या अंतरानें आपलें सैन्य ठेवून दिलें होतें; त्यामुळें बंडवाल्यांचें वीस हजार सैन्य असूनही एका अव्यवस्थेमुळें पेशव्यांस पराभव पावून पळ काढावा लागला व पुन्हा ते सर्व बंडवाले काल्पीस गेले.

इंग्रज फौजेनेंही आपला मोर्चा काल्पीकडेच वळविला. रावसाहेब स्वतः चढेल, उतावळे आणि **दैववादी** असल्यामुळें त्यांनीं राणीसाहेबांच्या मताप्रमाणें सैन्याची मुळींच व्यवस्था केली नाहीं. राणीसाहेबांनींही ह्या लढाईंत फारसा भाग घेतला नाहीं. पुन्हा सर्व

मंडळी कालपीस गेल्यावर रावसाहेबांची पुष्कळ कानउघाडणी करून सैन्याचा बंदोबस्त कच्चा ठेवाल तर आपला जय कधींही होणार नाहीं, उलट आपल्या सैन्याची नीट मजबुती करून, जागजागीं मोर्चे बांधून लढाई दिली तर इंग्रजांचा आपल्यापुढें टिकाव लागणें शक्य नाहीं, असें राणीसाहेबांनीं सणसणीत सांगितलें. तेव्हां रावसाहेबांनीं कालपीच्या रक्षणाकरितां कांहीं स्वार ठेवून ठिकठिकाणीं नाकेबंदी केली आणि मोर्चे बांधून आपण स्वतः सर्व सैन्याचें आधिपत्य स्वीकारलें. राणीसाहेब आपल्यापेक्षां शूर आहेत हें जरी त्यांस माहीत होतें, तरी त्यांच्या हातांत एवढ्या मोठ्या सैन्याचें आधिपत्य दिलें असतां आपली इज्जत कमी होईल असें वाटून एवढ्या अफाट सैन्यापैकीं त्यांनीं फक्त २००–३०० घोडेस्वार राणीसाहेबांच्या ताब्यांत दिले व यमुनेच्या बाजूनें कालपीचें रक्षण करण्याचें काम राणीसाहेबांस सांगितलें.

**कालपीचा पाडाव**

इकडे इंग्रजी सैन्य कुंच गांवावरून मजल दरमजल करीत कालपीच्या अलीकडे सहा मैलांवर येऊन थडकलें; पण बंडवाल्यांचा जोर विशेष असल्यामुळें इंग्रजांनीं त्याच ठिकाणीं तळ दिला व बंडवाल्यांस आंत ठेवून बाहेरून वेढा दिला आणि आपल्या सैन्याची मजबुती करून इंग्रज स्वस्थ राहिले. बंडवाल्यांच्या मुख्य सैन्यावर हल्ला करणें कठीण वाटल्यामुळें बंडवाल्यांची कमकुवत बाजू कोणती हें इंग्रज पाहात होते; पण इतक्यांत बंडवाल्यांच्या आघाडीचें सैन्य, आपली सुरक्षित जागा सोडून इंग्रजांवर छापा घालण्याच्या उद्देशानें पुढें आलें व इंग्रजांच्या तोफांच्या माऱ्यांत सांपडलें. अशा तऱ्हेनें पहिल्याच दणक्याला बंडवाले कच खाऊं लागले. पेशवे, समशेरबहाद्दराचे वंशज बांदेवाले नबाब पळून जाण्याचा विचार करूं लागले; पण राणीसाहेबांनीं त्यांस धीर

देऊन आपण घोड्यावर बसल्या; व आपले २००-३०० स्वार घेऊन त्यांनीं झंजावाताप्रमाणें इंग्रजांच्या तोफखान्यावर आडवाटेनें चाल केली. राणीसाहेब तोफखान्यावर चालून गेल्यावरोबर पेशव्यांचें सैन्यही इंग्रजांवर चाल करून गेलें व मोठी भयंकर लढाई सुरू झाली. इंग्रजांच्या तोफखान्यावरचे गोलंदाज पळून गेले व घोड्यावरचा तोफखानाही उधळून गेला. बंडवाल्यांस जय खास मिळणार असें वाटूं लागलें; पण इंग्रज सेनापति स्टूअर्टसाहेब हा तेथें आला व त्यानें पुन्हा तोफखाना चालू केला आणि सर ह्यू रोज ह्यानें आपलें **उंटावरचें** सैन्यही तेथें आणिलें व त्यानें निव्वळ बाणांची वृष्टि पाडिली. तेव्हां बंडवाले जेरीस येऊन पळूं लागले. राणीसाहेब पुढें सरसावून इंग्रज सैन्याचा हा मारा बंद पाडण्याचा विचार करीत होत्या; पण पाठीमागून पेशव्यांचें जें सैन्य राणीसाहेबांच्या मदतीला येत होतें, तें सर ह्यू रोज ह्यानें हल्ला करून पळवून लाविलें. अर्थात् राणीसाहेबांस मदत न मिळाल्यामुळें व पेशव्यांच्या सैन्याच्या अव्यवस्थेमुळें त्यांस पेशव्यांच्या छावणींत परत जावें लागलें. असो.

ह्याप्रमाणें बंडवाले चुकीचा डाव खेळल्यामुळें त्यांस काल्पीसही हार खावी लागून, तें शहर इंग्रजांच्या हातीं आलें. काल्पींत इंग्रजांस अटकाव करण्याकरितां पेशव्यांचें सैन्य व तोफखाना होता पण तो पाडाव होऊन हजारो बंडवाले इंग्रजांच्या तरवारीला बळी पडले; व इंग्रजांस हत्ती, घोडे, उंट, तोफा, दारूगोळा, वगैरे युद्धाची सामुग्री मिळाली. साठ हजार पौंड नुसती बंदुकीची दारू सांपडली. त्या मानानें तरवारी, बंदुका, तोफा, निशाणें, वगैरे युद्धसामुग्रीची कल्पना वाचकांनींच करावी. तो दिवस **व्हिक्टोरिया राणीचा** जन्मदिवस असल्यामुळें काल्पीच्या मैदानांत तोफांची सलामी होऊन, काल्पीच्या किल्ल्यावर इंग्रजांचें **युनियन जॅक** फडकूं लागलें व इंग्रजांकडे जिकडे

तिकडे आनंदीआनंद झाला. इकडे पेशव्यांच्या सैन्याची राखरांगोळी उडाल्यामुळें पेशवे वगैरे बंडवाल्यांचे पुढारी जीव घेऊन पळत सुटले.

**राणीचें राजकारण**

काल्पींत पराभव पावल्यावर रावसाहेब पेशवे, बांदेवाले नबाब, राणीसाहेब, वगैरे मंडळी आपल्या सैन्यानिशीं ग्वाल्हेरच्या रस्त्यावर काल्पीपासून ४० मैल अंतरावर गोपाळपूर येथें छावणी देऊन राहिली. तात्या टोपी हे आपल्या वडिलांस भेटावयास गेले होते, म्हणून ह्या काल्पीच्या लढाईच्या वेळीं ते हजर राहूं शकले नाहींत. काल्पीच्या पराभवाची बातमी ऐकून, ते गोपाळपूर येथें पेशव्यांस येऊन मिळाले. आतां पुढें काय करावें ह्याबद्दल अहोरात्र खलबतें चालत. बंडवाल्यांची सर्व शक्ति व सर्व युद्धसामुग्री नाहींशी झाली होती. आतां हे इंग्रज आमचा नायनाट केल्याशिवाय खास राहात नाहींत, कांहींतरी असामान्य अशी युक्ति काढून, इंग्रजांस तोंड देऊन, आपला बचाव तरी केला पाहिजे; नाहींतर नामोहरम होऊन, डोंगर-कपारींत दडून तरी बसलें पाहिजे असें रावसाहेबांस वाटूं लागलें. ह्या दोन गोष्टीशिवाय बंडवाल्यांस तिसरा मार्गच शिल्लक नव्हता. अहोरात्र खलबतें करून कायमचा निश्चय असा कांहींच न लागल्यामुळें रावसाहेब पेशवे उदास होऊन गेले.

ही हकीगत राणीसाहेबांच्या डेऱ्यांत त्यांस समजतांच **राणीसाहेब** स्वतः रावसाहेब पेशव्यांच्या भेटीस गेल्या, आणि त्यांनीं **मुत्सद्देगिरीला शोभण्यासारखें आणि आवेशयुक्त** असें भाषण केलें. त्या म्हणाल्या, “ मी बायको माणूस, आपणांस उपदेश करावा अगर सल्ला द्यावा, अशी माझी योग्यता नाहीं; तरी पण आपल्या पूर्वजांची सेवा करून आजपर्यंत आम्ही आपली भाकरी खात आलों आहों; म्हणून मी म्हणतें, आपल्या पूर्वजांनीं जी मर्दुमकी केली,

दिल्लीचें सिंहासन खिळखिळें करून टाकिलें, आणि अटकेपार आपले घोडे घातले व हिंदुपदपातशाही स्थापन केली; तीस दुर्भेद्य अशा सिंहगड, रायगड, तोरणा, पुरंदर अशा जबरदस्त किल्ल्यांचा आश्रयच कारण झाला, तेव्हां जुन्या अनुभवांवरून व हल्लींच्या विकट परिस्थितीवरून विचार करितां आपणांसही प्रचंड अशा एखाद्या किल्ल्याचा आश्रय केल्याशिवाय इंग्रजांस तोंड देणें शक्य नाहीं. आपल्या ताब्यांत झांशी, काल्पी यांसारखे अजस्र किल्ले होते, म्हणून आपणांस इंग्रज सैन्याबरोबर आजपर्यंत टिकाव धरतां आला, पण आतां ते किल्ले दुर्दैवानें आपल्या हातांत राहिले नाहींत; म्हणून एखादा प्रचंड किल्ला हस्तगत केला पाहिजे. झांशी अगर काल्पी आज हातीं येणें शक्य नाहीं; म्हणून **ग्वाल्हेरीवर** चाल करून **शिंद्यांचा** सर्व **सरंजाम** आपल्या ताब्यांत घ्यावा, कारण शिंदे सरकार व आम्ही समबल आहों; व मग तेथील पहाडी किल्ल्याचा आश्रय करून पुढच्या मसलती सिद्धीस न्याव्या असें मला वाटतें. राणीसाहेबांच्या ह्या मसलतीवरून राणीसाहेब शूर असून राजकारणी-ही होत्या हें सिद्धच होत आहे.

**पेशव्यांचें पत्र**

राणीसाहेबांनीं वर जी मसलत सांगितली ती तात्या टोपी व रावसाहेब पेशवे ह्यांस पटून ग्वाल्हेरीवर हल्ला करण्याचें ठरलें. तात्या टोपी यानें गुप्त रीतीनें पांच-सहा महिन्यांपूर्वींच ग्वाल्हेरीस जाऊन तेथील शिंदे सरकारची फौज व अधिकारी अगोदरच बिघडवून ठेविले होते. इतकेंच नव्हे तर, दिल्ली आणि मिरत ह्या ठिकाणीं बंडवाल्यांचा जय होत आहे असें ऐकून, ग्वाल्हेरच्या तैनाती फौजेनें उघड उघड बंड केलें होतें व युरोपियन अधिकारी मारून टाकले होते. तेव्हां ग्वाल्हेरचे युरोपियन लोक बायकांपोरांसुद्धां आग्र्याच्या किल्ल्यांत राहावयास गेले होते. बंड-

वाल्यांनीं फितूर केलेल्या फौजेच्या मनांत जयाजीराव शिंद्यांस वश करून घेऊन, आपल्या बंडांत सामील करावें असें होतें आणि जयाजीरावांच्या आधिपत्याखालीं आग्र्यावर चाल करून जावें असेंही होतें. आणि जर कां जयाजीराव शिंदे आपल्या तोफखान्यानिशीं ह्या बंडांत सामील झाले असते, तर ह्या बंडाचा वणवा उत्तरेपासून दक्षिणेंत येऊन काय काय परिणाम घडला असता त्याचा नेमच नव्हता. इंग्रजांचें राज्य हिंदुस्थानांत राहिलें असतें कीं नसतें, ह्याची शंकाच होती. पण जयाजीराव शिंदे ह्यांस मुलगा न झाला तर त्यांस दत्तक घेण्याची परवानगी इंग्रज-सरकारनें दिल्यामुळें जयाजीराव शिंदे हे इंग्रजांचे पक्के स्नेही बनले होते. अर्थात् इंग्रजांविरुद्ध शस्त्र उचलून मित्रद्रोहाचें पातक करणें त्यांच्या हातून कसें होईल? जयाजीराव राजद्रोही बनले नाहींत म्हणूनच बंडवाल्यांचा डाव फसला.

ह्या गोष्टीला पांचसहा महिने झाले होते व बंडवाले काल्पीसही पराभव पावले होते. तेव्हां रावसाहेब पेशवे व तात्या टोपी ह्यांस असें वाटलें कीं, आपण ग्वाल्हेरीस गेल्यावर जयाजीराव शिंद्यांचें मन वळवूं व सर्व सरंजामानिशीं शिंद्यांची फौज आपणांस मिळाली म्हणजे आपण आपला कार्यभाग साधून घेऊं, असा विचार करून रावसाहेब पेशव्यांनीं **जयाजीराव** व त्यांची आई **बायजाबाई** शिंदे ह्यांस अगोदरच पत्र पाठविलें कीं, तुमचा आमचा पूर्वापार संबंध लक्षांत आणून आम्हांस मदत करावी, म्हणजे आम्हांस दक्षिणेंत जाण्यास सोईचें होईल. पेशव्यांचें सैन्य हळुहळू ग्वाल्हेरीकडे कूच करीतच होतें. पेशव्यांचें सैन्य ग्वाल्हेरच्या हद्दींत शिरतांच तेथील सुभेदारानें ४०० पायदळ व १५० घोडेस्वारांनिशीं पेशव्यांस ग्वाल्हेरीकडे जाण्यास प्रतिबंध केला. तेव्हां पेशव्यांस राग येऊन ते म्हणाले, तुम्ही आम्हांस प्रतिबंध काय म्हणून करतां? शिंदेसरकार खिस्ती

आहेत कीं काय ? **स्वराज्यासाठीं** व **स्वधर्मासाठीं** आम्ही युद्ध करीत आहोंत. शिंदेसरकार हे पिढीजात स्वराज्याचे नोकर आहेत. त्यांचें सर्व सैन्य आम्हांस मदत करणार आहे; म्हणून आम्ही ग्वाल्हेरीवर जात आहों. असें पेशव्यांनीं त्यास सांगितल्याबरोबर तो सुभेदार भ्याला व त्यानें मोठी चूक करून बंडवाल्यांस मुकाट्यानें ग्वाल्हेरीकडे जाऊं दिलें.

**शिंदेसरकारचा हल्ला**

पेशव्यांचें पत्र ग्वाल्हेर दरबारांत पोंचतांच ह्या पत्राची काय व्यवस्था करावयाची याची वाटाघाट झाली. जयाजीराव आणि त्यांचे दिवाण सर दिनकरराव राजवाडे मुळापासून बंडवाल्यांच्या विरुद्ध होते. बाकीचे सरदार, मानकरी कमीअधिक प्रमाणानें बंडवाल्यांस अनुकूल होतेच. बुंदेलखंडांतील लोक, भोपाळ, माळवा येथील फौजा, होळकरांची फौज ह्या सर्व बंडवाल्यांस अनुकूल होण्याचा रंग होता; फक्त जयाजीराव शिंदे ह्यांनीं स्वदेश, स्वबांधव, स्वधर्म ह्यांना जागून थोडीशी चूक केली असती व बंडवाल्यांच्या हांकेला ओ दिली असती, तर आगींत तेल घातल्याप्रमाणें काशीपासून रामेश्वरापर्यंत बंडाचा वणवा पेटून राहिला असता व हा वणवा विझविणें इंग्रजांस अशक्य झालें असतें. आणि 'बंडवाल्यांचें बंड' हें नांव जाऊन **क्रांतिकारक** लोकांची **स्वातंत्र्याची लढाई** हेंही नांव या बंडास कदाचित् मिळालें असतें. पण शिंदे सरकार व दिवाण दिनकरराव ह्यांनीं आपली इमानदारी राखून, बंडवाल्यांस मदत करण्याचें साफ नाकारिलें. इतकेंच नव्हे तर इंग्रजांची फौज मदतीला आली म्हणजे, ती घेऊन बंडवाल्यांवर चाल करून जावयाचें असेंही त्यांनीं ठरविलें. पण बंडवाल्यांनीं इंग्रज सैन्य येण्याच्या अगोदरच ग्वाल्हेरीजवळ मुरारपाशीं येऊन तळ दिला. इंग्रजांचें सैन्य येण्यास बराच अवकाश

होता. इंग्रजांची मदत येण्याच्या अगोदरच बंडवाल्यांचें सैन्य ग्वाल्हेरी-वर चाल करून येईल; व ग्वाल्हेर सर करील, ह्या भीतीनें जयाजी-राव शिंद्यांनीं आपली ८००० फौज आणि बालेघाटी १२०० स्वारांची मांड आणि तोफखाना अगदीं ग्वाल्हेरीच्या जवळ मुरारच्या छावणींत रातोरात नेऊन ता. १ जून १८५८ रोजीं सूर्योदयाबरोबर लढाईला सुरवात केली. तोफांचे व बंदुकांचे आवाज सुरू झाले; तरी पण पेशव्यांचें सैन्य गाफीलच होतें. शिंदेसरकार हे आपले धर्म-बांधव आहेत, हे आमच्या स्वराज्याचे पिढीजात नोकर आहेत, म्हणून ते आपणावर चाल करून येणें शक्य नाहीं; व ज्याअर्थीं ते तोफांचे वार काढीत आले आहेत, त्याअर्थीं ते आपणांस मदतच करण्यास येत आहेत, अशी खुळी समजूत पेशव्यांनीं करून घेतली होती. पण अंधकाराचा नाश होण्याकरितां जसा सूर्योदय व्हावा, त्याप्रमाणें पेशव्यांच्या डोळ्यांवरची झांपड नाहींशी होण्याकरितां व मी इंग्रजांचा खरा मित्र आहें, हें दाखविण्याकरितां शिंद्यांनीं अगदीं सूर्योदया-बरोबर पेशव्यांच्या छावणींत एकदम तोफांचे गोळे टाकण्यास आरंभ केला.

**राणीसाहेबांचा पराक्रम**

अर्थात् शिंद्यांच्या बेदम माऱ्यापुढें पेशव्यांच्या बेसावध सैन्याची तारांबळ उडून गेली. जो तो आश्चर्यचकित झाला. राणीसाहेबांनीं पेशव्यांस वेळोवेळीं सैन्याची शिस्त नीट ठेवण्यास सांगितलें असतां, त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं. बंडवाल्यांची जिकडे तिकडे धांवपळ सुरू झाली. तात्या टोपीनें आपलें सैन्य तोफांच्या माऱ्यांतून काढून घेतलें. पण इरेस पेटलेल्या व वाघिणीप्रमाणें खवळलेल्या त्या राणीसाहेबांनीं जिवाची पर्वा न करितां आपल्या २००-३०० घोडेस्वारांनिशीं शिंद्यांच्या तोफखान्यावर तुटून पडून, त्यांचा तोफखाना बंद पाडला.

राणीच्या या हल्ल्यामुळें शिंद्यांचे गोलंदाज तोफा टाकून पळून गेले व बाकीची फौज अगोदरच तात्या टोपी ह्यानें फितूर केल्यामुळें ती लढेनाशी झाली. तरी पण जयाजीराव शिंदे हे, आपली ऐटदार पोशाखाची आणि रोज खुराक खाणारी १२०० स्वारांची खास बालेघाटी पलटण घेऊन लढतच होते. शिंदेसरकार स्वदेश, स्वबांधव ह्यांस सोडून, इमान राखण्याकरितां लढत होते; तर इकडे राणीसाहेब स्वाभिमान राखण्याकरितां इंग्रजांचें वैर साधून लढत होत्या. एक तासभर दोन्ही पक्षांच्या समशेरी झडत होत्या. पण शेवटीं शिंद्यांच्या बालेघाटी पलटणीस चीत करून, राणीसाहेबांच्या स्वारांनीं ती पलटण उधळून लाविली; तेव्हां शिंदेसरकार आपल्या लोकांसह आग्र्यास पळून गेले. ह्याप्रमाणें राणीसाहेबांनीं व त्यांच्या शूर सैनिकांनीं शिंद्यासारख्या मातबर सरदारास, त्याच्या तोफखान्यास व त्याच्या बालेघाटी पलटणीस 'पळतां भुई थोडी' केली. ह्यावरून महाराणीसाहेब किती शूर होत्या, ह्याची कल्पना वाचकांस सहज होईल. शिंदेसरकारांनींही ह्या वेळीं आपल्या दौलतीची आशा सोडून केवळ इमान जागविण्याकरितां जें व्रत अंगिकारिलें; तें इंग्रजाचे **मांडलिक** ह्या नात्यानें त्यांस योग्यच होतें, असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं.

**औट घटकेची पेशवाई**

जयाजीराव शिंदे पळून गेल्यावर रावसाहेब पेशव्यांचें सैन्य ग्वाल्हेरींत शिरून त्यानें ग्वाल्हेरचा किल्ला हस्तगत केला व त्यावर आपलें निशाण लावलें. तात्या टोपीच्या आगाऊ कारस्थानामुळें बंडवाल्यांच्या सैन्यास कोणींच अडथळा केला नाहीं. उलट रावसाहेबांस पेशवेपदावर बसविण्याचा तात्या टोपी वगैरे मंडळींनीं घाट घातला. शिंदेसरकारची सर्व फौज, शिंदेसरकारचा तोफखाना वगैरे सर्व सरंजाम बंड-

वाल्यांस मिळाला असतां व तोही केवळ राणीसाहेबांच्या पराक्रमानेंच मिळाला असतां, राणीसाहेबांस न विचारतां एका सुमुहूर्तावर रावसाहेबांनीं पेशवेपद धारण करून, फुल-बागेमध्यें मोठा दरबार भरविला.

श्रीमंतांस अनुकूल असे सर्व सुभेदार, मानकरी, शिलेदार वगैरे मंडळी आपआपल्या हुद्द्यांप्रमाणें त्या त्या ठिकाणीं बसली. बंडांत सामील असलेले पठाण, रजपूत, पुरभय्ये व आरब, आपआपल्या तरवारी कमरेस लटकावून दरबारास येऊन दाखल झाले. पेशवाई थाटाचा तमामी पोषाख करून, मस्तकीं शिरपेंच, कलगी-तुरा, कानांत मोत्यांचा चौकडा, गळ्यांत मोत्यांचे व रत्नांचे हार, अशा थाटानें डोक्यावर मोर्चेलें उडवीत, भालदार-चोपदारांच्या ललकाऱ्यांत श्रीमंत रावसाहेब पेशवे दरबारांत दाखल झाले व सर्व दरबारी लोकांचे मुजरे होऊन सिंहासनावर बसले. नंतर सर्व लोकांचें त्यांनीं अभिनंदन करून कित्येक सरदारांस देणग्या आणि अलंकारही दिले. सर्व बंडवाल्यांस सुमारें २० लाख रुपये वांटले. तात्या टोपी ह्यास एक रत्नखचित तरवार बक्षिस देऊन त्यांस आपले सेनापति कायम केलें. ह्याप्रमाणें हा दरबार थाटाचा होऊन तोफांच्या सरबत्त्या सुरू झाल्या व हा समारंभ आटोपला. ह्या समारंभाची सांगता करण्य करितां पूर्वापार पद्धतीप्रमाणें ब्राह्मणभोजनें होऊं लागलीं. सुवर्णदक्षिणा देऊन ब्राह्मणांचे आशीर्वाद मिळावयास लागले. हा दरबार व **भोजनभाऊपणा** राणीसाहेबांस मुळींच पसंत नव्हता. **जणुं काय बुंदीच्या लाडवांनीं व ब्राह्मणांच्या आशीर्वादांनींच मिळविलेली औट घटकेची पेशवाई रक्षण होणार होती!** फक्त राणीसाहेबांच्या युक्तीमुळें व राणीसाहेबांच्या पराक्रमामुळें रावसाहेबांस ग्वाल्हेर मिळाली होती, असें असतां राणीसाहेबांची परवानगी न घेतांच रावसाहेबांनीं हे समारंभ चालविले होते.

ह्या समारंभाची व रावसाहेबांच्या या अशा वेडेपणाची बातमी राणीसाहेबांस लागतांच राणीसाहेबांनीं त्यांस निरोप पाठविला कीं, " आपण ब्राह्मणभोजनें बंद करून अगोदर आपल्या सैन्याची नीट व्यवस्था ठेवा. आपल्या पाठीवर इंग्रज आहेत. ते फार शूर आहेत, फार चतुर आहेत. ते आपणांस केव्हां पेंचांत आणतील त्याचा नेम नाहीं. तुम्हांस शिंद्यांचा खजिना व शिंद्यांची फौज मिळाली आहे. करितां पलटणी लोकांचे अगोदर पगार देऊन सैन्याची शिस्त चांगली ठेवा. ठिकठिकाणीं तोफांचे मोर्चे बांधून आपल्या जागेची मजबुती करा. आपणांस शिंद्यांची जी युद्धसामुग्री मिळाली आहे, तिचा योग्य उपयोग करून जर आपण वागलां नाहीं, तर आपला नाश होण्यास फारसा वेळ लागणार नाहीं. श्रीमंत बाजीरावसाहेबांनीं ब्राह्मणभोजनें घालून जशी पेशवाई बुडविली, तशी तुम्हीं ब्राह्मणभोजनें घालून आलेली संधि दवडूं नका." अशा तऱ्हेनें राणीसाहेबांनीं रावसाहेब पेशव्यांस पुष्कळ उपदेश केला; परंतु त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं. तात्या टोपी वगैरे मंडळी आपल्याच आनंदाच्या भरांत गर्क होऊन गेली होती.

**तोडीस तोड**

इंग्रज लोक झांशी व काल्पी ह्यांचा बंदोबस्त करून त्या त्या प्रांतांची नीट व्यवस्था लावीत आहेत, तोंच बंडवाल्यांनीं शिंद्यांचा पराभव करून ग्वाल्हेर सर केली. जयाजीराव शिंदे आग्ऱ्यास धूम ठोकून पळून गेले, ही भयंकर बातमी इंग्रजांस समजली. तेव्हां सर ह्यू रोज ह्यांस फार मोठी पंचाईत पडली; पण छातीचा **निधडा**, बुद्धीचा **चतुर**, मनगटाचा **जोरदार** असा तो सर ह्यू रोज मुळींच डगमगला नाहीं. पेशव्यांच्या अगडबंब सैन्यांत नेहमीं अव्यवस्था असे, हें ब्रिग त्यास माहीत होतें; म्हणून त्यानें आपल्या सैन्याचे सातआठ भाग करून मोठमोठे रणधुरंधर

सेनापति नेमून ज्या ठिकाणीं शिंद्यांचा पराभव झाला होता, ती **मुरारची छावणी** सर करण्याचा त्यानें बेत केला.

सर ह्यू रोजनें मजल दरमजल करीत आपलें सैन्य काल्पीहून ग्वाल्हेरीजवळ मुरारच्या छावणीच्या थोडें अलीकडे आणून त्या ठिकाणीं तळ दिला. मुरारची छावणी व ग्वाल्हेरीचा प्रदेश बंडवाल्यांनीं व्यापून टाकला आहे; व मुरारच्या छावणींत बंडवाल्यांचा बराच बंदोबस्त आहे असें सर ह्यू रोज ह्यांस दिसून आलें. तरी पण माऱ्याच्या जागा अगोदरच इंग्रजांनीं पटकावल्या होत्या. काय होईल तें होवो, मुरारची छावणी हस्तगत करून त्या ठिकाणीं आपला तळ देऊन मग ग्वाल्हेरीवर चढाई करावयाची असा निश्चय करून, इंग्रजांनीं मुरारच्या छावणीवरच हल्ला चढविला. इकडे श्री० रावसाहेब पेशवे व तात्या टोपी आनंदाच्या भरांत गर्क झाले होते. मुरारच्या छावणीवर इंग्रज चाल करून आले तरी, **पेशवे** आणि **तात्या टोपी** ह्यांचा पत्ताच नव्हता! वास्तविक पाहातां राणीसाहेबांच्या सल्ल्या प्रमाणें गाफिल न राहातां सर्व माऱ्याच्या जागांवर मोर्चेबंदी करून इंग्रज सैन्यावर टेहेळणी करीत रहावयास पाहिजे होतें; पण पेशवे हे दैववादी असल्यामुळें धर्मभोळेपणानें ब्राह्मणभोजनें घालून पुण्यसंचय करण्यांत गुंतले होते. उलट पक्षीं इंग्रज लोकांचें दैव त्यांच्या हातांत होतें. ते म्हणतील ती करामत करून इंग्रज दाखवीत होते. आग्र्याहून जयाजीराव शिंद्यांस आणून, 'आम्ही शिंदेसरकारच्या वतीनें बंडवाल्यांशीं लढत आहों' अशा अर्थाचा इंग्रजांनीं एक **जाहीरनामा** काढला.

तेव्हां शिंद्यांची जी फौज बंडवाल्यांनीं फितूर केली होती, ती आपल्या शिंदेसरकाराविरुद्ध लढेनाशी झाली. ग्वाल्हेर घेण्याकरितां राणीसाहेबांनीं जो डाव टाकला, तशाच तऱ्हेचा डाव ग्वाल्हेर घेण्या-

करितां इंग्रजांनींही करून, मुरारच्या छावणीवर एकदम हल्ला चढविला. व तोडीस तोड केली. आतां तात्या टोपी जागा होऊन धांवपळ करीत लष्करी पोशाख चढवून, ठिकठिकाणीं मोर्चे बांधण्यास सुरवात करूं लागला; आणि मुरारच्या छावणीचा बचाव करण्याकरितां गेला. शिंदेसरकारचें कितुरी सैन्य, तोफखाने, बांदेवाले नबाबाचें सैन्य, अयोध्याप्रांतांतून आलेले रोहिले व पठाण ह्यांचें सैन्य, एवढा बंडवाल्यांचा सरंजाम असतां, एका **अव्यवस्थेमुळें** हीं सर्व फौज कुचकामाची झाली होती. मुरारच्या छावणीवर दोन तास लढाई होऊन, बंडवाल्यांनीं आपला पराक्रम दाखवून इंग्रजांस थक्क करून सोडलें. तरी पण इंग्रजांच्या अतिरथी-महारथी योद्धयापुढें आणि इंग्रजांच्या शिस्तवार लढण्याच्या पद्धतीपुढें बंडवाल्यांस हार खावी लागली व मुरारची छावणी इंग्रजांनीं सर केली; आणि बंडवाले ग्वाल्हेरींत पळून गेले. ह्या लढाईंत राणीसाहेबांनीं भाग घेतलेला नव्हता.

**लढाईची तयारी**

आतां तात्या टोपी, रावसाहेब पेशवे, बांद्याचे नबाब, वगैरे बंडवाल्यांचे पुढारी ग्वाल्हेरच्या बंदोबस्तास लागले. त्यांनीं ठिकठिकाणीं तोफांचे मोर्चे बांधून ठेविले, रिसाले व पायदळ पलटणी जागोजाग ठेवून दिल्या. व लढाईची कडेकोट तयारी केली. फुलबागेंत एका डेऱ्यांत राणीसाहेब राहात असत. त्यांच्याकडे तात्या टोपी गेले व राणीसाहेबांस नम्रपणें विनंति करून म्हणाले कीं, “ आतां सैन्याची कशी काय व्यवस्था करावयाची ती सांगून, ह्या आणीबाणीच्या प्रसंगीं आम्हांस आपलें साहाय्य मिळेल अशी आशा आहे.”

तेव्हां राणीसाहेबांचा कंठ दाटून येऊन, तात्या टोपीस त्या म्हणाल्या, “ आजपर्यंत आटोकाट परिश्रम करून, जो एवढा व्यूह रचिला व जे जिवापाड परिश्रम केले, ते सर्व रावसाहेब पेशव्यांच्या दुराग्रहामुळें

आणि हलगर्जीपणामुळें सर्वस्वीं फसले. इंग्रज सैन्य दाराशीं येऊन भिडलें आहे, तरी आपल्या सैन्याची व्यवस्था नहीं; तेव्हां आतां इंग्रजांशीं सामना करून कांहीं उपयोग होईल असें मला वाटत नाहीं. तथापि **प्रसंगास तोंड न देणें भ्याडपणाचें होईल**, म्हणून मी आपलें कर्तव्य करण्यास एका पायावर तयार आहें. तुमचें कर्तव्य तुम्ही करा." असें वीरश्रीचें उत्तर तात्या टोपींनीं ऐकून ते परत आपल्या गोटांत गेले; व सैन्याची व्यवस्था करूं लागले. राणीसाहेबांनींही हें शेवटचेंच युद्ध असें समजून, जिवाची पर्वा न करतां मोठ्या उत्साहानें हाताखालच्या सैन्याचीताबडतोब तयारी चालविली. त्यांनीं आपला नेहमींचा लष्करी पोषाक चढविला. अंगावर चिलखत घातलें व त्या आपल्या उमद्या घोड्यावर बसल्या; आणि आपली आवडती **समशेर** कमरेला लटकावून, रणधुरंधर अशा सेनानायकाप्रमाणें आपल्या सैन्याची कवाईत घेऊं लागल्या. त्या वेळचें त्यांचें तें **जाज्वल्य स्वरूप**, त्यांची ती वीरश्री, त्यांचा तो गंभीर स्वर, हीं पाहून त्यांच्या सैनिकांमध्यें एक प्रकारचा आवेश उत्पन्न झाला. इंग्रजांचेही एकापेक्षां एक असे रणधुरंधर सेनानायक ग्वाल्हेर शहराला शह देऊन लढाईची वाट पाहात बसलेलेच होते. राणीसाहेबांनीं आपल्या तोफांचे मोर्चे बांधून उंचसखल प्रदेशांत आपलें सैन्य नीट ठेवून दिलें होतें. आघाडीला हिंमतवान् लोकांचा छबिना ठेवून, दोन्ही बगलांना लाल रिसाल्याचे घोडेस्वार व पायदळ यांची उत्तम फळी बांधली होती. शिवाय मार्‍याच्या जागा रोखून उंच ठिकाणीं आपल्या [illegible]ंचे मोर्चेही बांधिले होते. याप्रमाणें राणीकडची उत्तम व्यवस्था असल्यामुळें, इंग्रजांस ही जागा सर करणें फारच कठीण होतें. **कोटाकीसराईपासून फुलबाग** हा टापू राणीसाहेबांनीं रोखून धरला होता; व मुरारच्या छावणीपासून ग्वाल्हेर शहर, हा टापू रावसाहेब पेशवे

व तात्या टोपी यांनीं सांभाळला होता. मुरारच्या छावणींत इंग्रज सैन्य होतें. इंग्रज सैन्याला ग्वाल्हेरीभोंवतालचा सर्व प्रदेश मोकळाच होता.

रावसाहेब पेशवे व तात्या टोपी ह्यांच्या आघाडीवर अतिरथी, महारथी असे इंग्रज सेनापति सर ह्यू रोज व नेपियर हे होते. राणीसाहेबांच्या आघाडीवर कर्नल स्मिथ, रेन्स, पेली, डिक्स, हेनेज यांसारखे रणधुरंधर सेनानायक आपल्या फौजेसह येऊन थडकले होते. अशा तऱ्हेनें दोन्ही पक्षांनीं आपआपली कडेकोट तयारी केली होती. ता. १७ जून १८५८ रोजीं कर्नल स्मिथ यांनीं रणशिंग वाजवून लढाईला आरंभ केला. बंडवाल्यांच्या दोन्ही बाजूंवर इंग्रजांनीं एकदम हल्ला चढविला. इंग्रज सैन्य पुढें सरसावतांच राणीसाहेबांनीं आपल्या गोलंदाजांस हुकूम करून तोफांचा भडिमार चालू केला. तेव्हां इंग्रज सैन्याची एकच:तारांबळ उडून गेली, लागलीच राणीसाहेबांचे अरब स्वार एकदम पुढें धांवले; व त्यांनीं इंग्रजांवर चढाई केली. तेव्हां स्मिथ ह्यानें आपलें सैन्य मागें घेतलें व तोफखाना पुढें आणला; पण त्या तोफखान्यावर राणीसाहेबांचे कर्दनकाळ असे **मकराणी स्वार** तुटून पडले व भयंकर लढाई सुरू झाली. उभय पक्षांनीं पराकाष्ठा केली. राणीसाहेबांचे धाडसी व शूर स्वार आतां खास यश मिळविणार असें वाटूं लागलें.

**शेवटची लढाई**

इंग्रज सेनापति कर्नल रेन्स ह्यानें राणीच्या सैन्याच्या पिछाडीवर हल्ला चढवून तोफा बंद पाडण्याचा प्रयत्न केला; पण त्याचा उपयोग झाला नाहीं. आजच्या दिवशीं राणीसाहेबांचीच सरशी होत., पण आज राणीसाहेबांचा झांशीचा उमदा घोडा राजरत्न फारच थकून गेला होता. म्हणून हा घोडा पागेंत ठेवून त्याच्या ऐवजीं शिंदेसरकारच्या पागेंतला एक नवा देखणा घोडा आणविला. जूनची तारीख १८ वी उजाडली. हा युद्धाचा दुसरा दिवस होता.

आदल्या दिवशींचें राणीसाहेबांचें शौर्य अवलोकन करून थक्क झालेल्या इंग्रज योद्धयांनीं घोडेस्वारांच्या व पायदळ पलटणींच्या निरनिराळ्या तुकडया करून राणीसाहेबांच्या सैन्याच्या आघाडीवर व पिछाडीवर एकदम मारा चालू केला. राणीसाहेबांनींही आपला लष्करी पोषाख धारण करून डोक्यास भरजरीची बत्ती, अंगांत तमामी अंगरखा व चिलखत, पायांत पायजमा आणि गळ्यांत मोत्यांचा कंठा घालून व कमरेला तरवार लटकावून मागें सांगितलेल्या शिंदेसरकारच्या पागेंतल्या एका देखण्या घोड्यावर त्या बसल्या आणि लढाईला तयार झाल्या. ग्वाल्हेर सर करण्याच्या इराद्यानें सर ह्यू रोज ह्यानें तात्या टोपी व रावसाहेब ह्यांच्यावर हल्ला चढविला आणि कर्नल स्मिथ यानें राणीसाहेबांच्या बाजूकडे निरनिराळ्या दिशांनीं आघाडीस व पिछाडीस हल्ले चढविले. राणीसाहेब आपले जवान मर्द घोडेस्वार व तीन चार विश्वासू सेवक घेऊन इंग्रजांच्या सैन्यावर चाल करून गेल्या. घनचक्कर लढाई चालू झाली. राणीसाहेब घोड्यावर बसून आपल्या सैन्यामध्यें **विजेप्रमाणें** चमकत होत्या. त्यांच्या धैर्यानें व शौर्यानें राणीसाहेबांचे घोडेस्वार खवळून इंग्रजांवर तुटून पडले. इंग्रजांनींही आपल्या शौर्याची पराकाष्ठा केली. इंग्रज शिपाई राणीच्या सैन्यावर तुटून पडत व आपल्या तरवारींनीं त्यांस यमपुरी दाखवीत. पुन्हा राणीकडील घोडेस्वार इंग्रजांवर मात करून आपलें क्षात्रतेज दाखवीत व पुन्हा राणीसाहेबांचाच वरपगडा होई.

अशा तऱ्हेनें ही रणधुमाळी चालली असतां, हूजार्स पलटणीच्या स्वारांनीं राणीसाहेबांच्या पिछाडीच्या पायदळ पलटणीवर हल्ला चढविला. ही पिछाडीची पायदळ पलटण शिंद्यांच्या फितुरी फौजेंतील होती. या पायदळ पलटणीनें इंग्रजांचे स्वार आलेले पाहातांच रणांगण सोडून पळ काढला व शिंद्यांची कांहीं फौज नीट लढेनाशी

झाली. त्यामुळें हूजार्स पलटणीच्या घोडेस्वारांना दारूगोळा, तोफा वगैरे युद्धाची सामुग्री आयती सांपडून शिवाय पिछाडीची चांगली माऱ्याची जागाही सांपडली. अशा तऱ्हेनें शिंद्यांच्या अवसानघातकी फौजेनें आयत्या वेळीं दगा दिल्यामुळें राणीसाहेब कोंडल्या गेल्या. अर्थात् इंग्रज सैन्याची फळी फोडून तात्या टोपी ह्यांस मिळण्याचा त्या प्रयत्न करूं लागल्या; पण इंग्रज सैन्याच्या माऱ्यापुढें त्यांस तसें करतां आलें नाहीं. राणीसाहेबांनीं निसटून जाण्याची शिकस्त केली, ह्या लढाईंत त्यांनीं अद्वितीय पराक्रम करून दाखविला, अनेक इंग्रज योद्धयांना आपल्या तरवारीनें यमसदनीं पाठविलें. इंग्रज योद्धयांनींही बंडवाल्यांचा पुष्कळ संहार केला. राणीसाहेबांच्या हाताखालचें शिंद्यांच्या फौजेंतलें अवसानघातकी सैन्य बहुतेक पळून गेलें. जयाजीराव शिंद्यांना आणून इंग्रजांनीं जो जाहीरनामा काढला असें मागें सांगितलें तो इंग्रजांच्या फारच पथ्यावर पडला. अशा तऱ्हेनें राणीसाहेबांचें भाडोत्री सैन्य निरुपयोगी झाल्यामुळें, इंग्रजांची फळी फोडून वाट सांपडेल तिकडे जाण्याशिवाय राणीस गत्यंतर नव्हतें. राणीसाहेब नेहेमीं मर्दानी पोषाखांत असल्यामुळें 'ही राणी आहे' असें इंग्रजांस मुळींच समजलें नाहीं. राणीसाहेब ह्या वेळीं, इंग्रजांच्या बेदम माऱ्यांत सांपडल्या होत्या; पण आपल्या समशेरीच्या जोरावर व आपल्या कांहीं स्वारांच्या मदतीनें त्या लढत होत्या.

**राणीसाहेबांचा शेवट**

आतां आपला ह्या ठिकाणीं निभाव लागत नाहीं असें पाहून निर्वाणीनें आपला घोडा भरधांव फेंकून आणि इंग्रज सैन्याची फळी फोडून, त्या पार निघून गेल्या. त्यांच्या मागोमाग घोड्यावर सुंदर व काशी ह्या दोन दासी आणि **रामचंद्रराव** देशमुख व **रघुनाथसिंग** हे दोन विश्वासू सरदारही होते. रामचंद्रराव देशमुख ह्यानें नऊदहा वर्षांच्या

**दामोदररावास** आपल्या घोड्यावर मोठ्या बंदोबस्तानें घेतलें होतें. ही सर्व मंडळी इंग्रजांची फळी फोडून पार निघून गेली खरी; तरी पण इतक्यांत कर्नल स्मिथ ह्यानें हूजार्स पलटणीचे निवडक स्वार त्यांच्या पाठीमागें चित्त्याप्रमाणें सोडले; पण झंझावाताप्रमाणें जाणाऱ्या राणीसाहेब त्या स्वारांस थोडयाच सांपडणार! पण त्यांची विश्वासू दासी सुंदर, 'बाईसाहेब मेलें मेलें' असें ओरडली, तेव्हां राणीसाहेब मागें परतल्या व त्या दीन दासीला मारणाऱ्या स्वाराचा त्यांनीं सूड घेतला. व पुन्हा घोडा भरधांव सोडून पाठीमागील इंग्रज स्वारांस त्या दिसेनाशा झाल्या. पण एका विघ्नांतून पार पडतात तों दुसरें विघ्न तयारच. राणीसाहेबांनीं घोडा भरधांव फेंकला खरा; पण इतक्यांत एक लहानसा **ओढा** वाटेंत आडवा लागला. राणीसाहेबांनीं घोडयास टांच मारून त्या ओढ्यावरून तो घोडा उडविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण कांहीं केल्या तो घोडा त्या लहानशा जलप्रवाहावरून उडी मारीना; राणीसाहेबांनीं पुष्कळ प्रयत्न करून पाहिला. पण तो घोडा अडला तो अडलाच.

झालें! काळानेंच राणीसाहेबांवर झडप घातली. राणीसाहेबांचा नेहमींचा घोडा दोन दिवस लढाई करून अगदीं दमला होता; म्हणून शिंद्यांच्या पागेंतून हा घोडा आणवून त्यावर बसून, त्या लढत होत्या. असो. अशा तऱ्हेनें राणीसाहेब ओढा ओलांडण्याचा भगीरथ प्रयत्न करीत असतां हूजार्स पलटणीचे स्वार येऊन थडकले. ह्या वेळीं राणीसाहेबांजवळ त्यांच्या स्वारांपैकीं एकही स्वार शिल्लक राहिलेला नव्हता. फक्त चारपांच स्वामिनिष्ठ सेवक काय ते बरोबर होते. ह्यामुळें हूजार्स पलटणीच्या चवताळलेल्या स्वारांनीं लगट करून, आपल्या समशेरी चालविण्याचा प्रयत्न केला. परंतु राणीसाहेबही कांहीं कमी धाडसी नव्हत्या; त्यांनींही आपली समशेर काढून, झंझावाताप्रमाणें त्या

स्वारांवर एकदम त्या तुटून पडल्या व त्यांचा संहार करूं लागल्या; परंतु संख्येनें पुष्कळ असलेल्या स्वारांपुढें त्यांचा निभाव लागेना. राणीसाहेब त्या गोऱ्या स्वारांच्या तरवारींचे वार चुकवीत असतां, एका स्वारानें राणीसाहेबांचा वार चुकवून; आणि संधि साधून त्यांच्या मस्तकावर पाठीमागून वार केला. त्यामुळें राणीसाहेबांच्या डोक्याची डावी बाजू कापली गेली व डावा डोळा बाहेर आला. इतक्यांत दुसऱ्या एका गोऱ्या स्वारानें त्यांच्या छातींत संगीन मारली, त्यामुळें त्या अगदीं बेशुद्ध होऊं लागल्या. **वाचकहो, अशा वेळीं पुन्हा शत्रूचा सूड घेण्याचें धाडस कोणाच्या तरी हातून होईल काय ?** परंतु, राणीसाहेब इरेस पेटल्यामुळें त्यांनीं आपला वध करणाऱ्या त्या इंग्रज योद्धयास अगोदर कंठस्नान घालून मग त्यांनीं, आतां आपला खास अंत होणार हें लक्षांत आणून, आपला देह आतां इंग्रजांच्या ताब्यांत जाईल अशा समजुतीनें, रामचंद्रराव देशमुख ह्यांना खूण केली. नंतर शेजारींच एक झोंपडी होती; त्या झोंपडींत रामचंद्रराव देशमुख ह्यांनीं राणीसाहेबांस नेऊन, पिण्यास पाणी आणून दिलें. त्या वेळीं त्यांच्या अंगावर जिकडे तिकडे इंग्रजांच्या तरवारीचे वार लागल्यामुळें सर्व अंग रक्तबंबाळ होऊन गेलें होतें. जखमांच्या भयंकर वेदनांनीं त्यांना मूर्छा येऊं लागली होती. तरी तशा स्थितीमध्येंही राणीसाहेबांनीं आपल्या **दामोदररावास** डोळ्यांनीं **पोटभर पाहून घेतलें.** त्यांनीं बरोबरच्या विश्वासू सरदारांस दामोदरपंताचें शक्य तितकें रक्षण करण्यास सांगितलें. आणि शेवटीं झांशी संस्थानच्या महाराणीसाहेबांनीं आपल्या देशबांधवांना व अखिल स्त्रीजातीला आपली अजब करामत शिल्लक ठेवून स्वर्गाची वाट धरिली. ही गोष्ट ग्वाल्हेरपासून ४–५ मैलांवर घडली.

वाचकहो, अशा तऱ्हेनें आपल्या राणीसाहेबांनीं आपल्या

# राणीच्या छत्रीवरील पोवाडा



रे हिंदबालका थांब ।
या स्थळीं अश्रु दोन ढाळीं–ध्रु०
तांबे-कुल-वीर श्री ती
नेवाळकरांची कीर्ती
हिंदभू-ध्वजा जणुं जळती
मर्दानी राणी लक्ष्मीबाई,
मूर्त महाकाली ॥

कडकडा कडाडे बिजली
शत्रुचीं लष्करें थिजलीं
मग कीर्तीरूपें उरलीं
ती पराक्रमाची ज्योत, मालवे इथें झांशीवाली ।

गातील इथें शाहीर
लववितील माना वीर
तरु, झरे ढाळितिल नीर
या दगडा फुटतिल जिभा,
कथाया कथा, सर्वकाळीं ॥





झांशीच्या राणीसाहेबांची छत्री. शेवटच्या लढाईनंतर राणीसाहेबांस जेथें जाळलें त्या ठिकाणीं ही छत्री बांधिली आहे.

चारित्र्याला आरंभ करून, शेवटही करून घेतला. आतां त्यांनीं जें जें केलें, तें तें योग्य केलें कीं अयोग्य केलें, हें ठरविण्याची बुद्धि माझ्यासारख्या पामराला परमेश्वरानें दिलेली नाहीं. ज्यांस ती बुद्धि दिलेली असेल, ते त्यांच्या कृत्यांची योग्य ती तपासणी करतील. राणीसाहेबांस ज्या ठिकाणीं जाळलें त्या ठिकाणीं हल्लीं ग्वाल्हेर सरकारनें एक छत्री बांधली आहे तिचा फोटो व त्या छत्रीवरील कविता दिली आहे ती पहा.

**दामोदरराव**

आतां ह्यांचे दत्तक पुत्र **दामोदरराव** हे ह्या वेळीं ९।१० वर्षांचे होते. ह्यांची स्थिति पुढें काय झाली, हें जाणण्याची इच्छा स्त्री-वाचकांना तरी झाल्याशिवाय खास राहाणार नाहीं. करितां त्यांची थोडीशी माहिती देतों. राणीसाहेब लढाईंत पतन पावल्या तेव्हां, पाठलाग करणारे सर्व इंग्रज स्वार मरून गेले होते; व कांहीं अगोदरच पळून गेले होते. म्हणूनच रामचंद्रराव देशमुख ह्यांनीं शेजारच्या गंजींतून गवत आणून चिता केली व राणीसाहेबांच्या शवास अग्नि दिला. नंतर राणीसाहेबांच्या अस्थि घेऊन रामचंद्रराव देशमुख व इतर दोन-तीन सेवक दामोदररावांसमवेत त्याच दिवशीं पेशव्यांच्या सैन्यांत दाखल झाले.

राणीसाहेबांच्या मृत्यूची हकीगत रावसाहेब पेशवे व तात्या टोपी ह्यांस समजतांच, ते गलितवीर्य होऊन त्यांचें सैन्य पळ काढूं लागलें आणि ग्वाल्हेर इंग्रजांनीं घेतली. रावसाहेब **पेशवे** व तात्या **टोपी** पळून गेले. नंतर इंग्रजांच्या भीतीनें दामोदरपंतांचे सर्व विश्वासू सरदार दामोदरपंतांस आणि बरोबरच्या नोकरांस रानावनांत सुमारें अडीच वर्षें लपवीत होते. राणीसाहेबांच्या मृत्यूनंतर दामोदररावांस सुरक्षित ठेवण्याचें काम **रामचंद्रराव, रघुनाथसिंग, बाळ गोडबोले, काशी कुणबीण** या अत्यंत विश्वासू लोकांनीं केलें. दामोदरराव

ग्वाल्हेरींतून निघाले तेव्हां त्यांच्याजवळ रोख रुपये आणि दागिने मिळून सत्तर हजार रुपयांचा विषय होता. पण हे सर्व पैसे दोन अडीच वर्षांत खलास झाले. इंग्रजांच्या भीतीनें दोन अडीच वर्षांचा हा अज्ञातवास दामोदररावांस फारच दुःखकारक गेला. भयंकर थंडीच्या दिवसांत डोंगर-कपारींत, नदीच्या कांठीं किंवा दाट जंगलांत दिवस काढावे लागल्यामुळें, दामोदरराव भयंकर आजारी पडले. पहाडांत किंवा जंगलांत धान्य मिळणें कठीण. जवळचे रोख रुपये संपून गेले; तेव्हां जवळचे दागदागिने तराजूनें तोलून देऊन जीवरक्षणाकरितां सामान आणावें लागे. यामुळें ७० हजार रुपयांची थोड्याच दिवसांत चटणी झाली. आतां दामोदररावांच्या हातांत फक्त एक कडें होतें. **कोठरा, सिप्री, पाटण, वडोद** गांवावरून भटकत भटकत ही मंडळी पाटणच्या जवळ आगर येथें इंग्रजांची एक छावणी होती त्या ठिकाणीं आली. त्याच ठिकाणीं प्लीक ह्या नांवाचा पोलिटिकल एजंट राहात होता. त्याच्या स्वाधीन ही सर्व मंडळी झाली. प्लीक ह्याला राणीसाहेबांबद्दल फार आदर होता. प्लीक याची सरबराई करण्याकरितां, हातांतील कडें खर्च करण्यांत आलें.

आतां रावांजवळ एक पैसुद्धां उरली नाहीं. प्लीक ह्यानें पत्र व आश्वासन देऊन ५ मे इ० सन १८६० रोजीं इंदूरच्या पोलिटिकल एजंटाकडे दामोदररावांची रवानगी केली. **शेक्सपीयर** हा त्या वेळीं इंदूरचा पोलिटिकल एजंट होता. त्यानें दामोदररावांची नीट व्यवस्था लावून दिली. कलकत्याच्या गव्हर्नर जनरलनें दरमहा १५० रुपये पेन्शन देण्याचें ठरवून त्या पोरक्या पोरास-राणीसाहेबांच्या मुलास-इंग्रजांनीं निर्भय केलें. शेक्सपीयरनें मुनशी धर्मनारायण यांच्या देखरेखीखालीं दामोदररावांस ठेवून इंग्रजी, फारसी, उर्दू व मराठी या भाषांचा अभ्यास करविला. दामोदरपंत सज्ञान झाल्यावर दत्तक

मुलाची खासगी मिळकत म्हणून जी होती ती त्यांनीं इंग्रजसरकारा-
जवळ मागितली; परंतु इंग्रजसरकारानें दामोदररावांचें कांहीं एक
ऐकिलें नाहीं. *अर्थात् दामोदररावांस त्यांच्या खासगी मिळकतीपैकीं*
किंवा पूर्वीच्या सहा लाख रुपयांपैकीं एक पैसुद्धां मिळाली नाहीं.
राणीसाहेबांचे हे दत्तकपुत्र जरी होते, तरी त्या वेळचे सर्व लोक
राणीसाहेबांप्रमाणेंच त्यांच्यावर प्रेम करीत असत. दामोदररावांचेंही
आपल्या स्वर्गवासी आईवर—राणीसाहेबांवर—अतिशय प्रेम असे. झांशी
संस्थान हा सुमारें २०–२५ लक्षांचा मुलूख असून व तो हक्कानें
दामोदररावांचा असून, शिवाय ठिकठिकाणीं त्यांच्या मालकीचे टोले-
जंग वाडे, व बाग असून त्यांस राहाण्यास एकही सत्तेचें घर मिळालें
नाहीं; ह्यावरून काळ फिरला म्हणजे एखादा मनुष्य रावाचा रंक कसा
होतो ह्याचें **दामोदरराव झांशीवाले** हें एक नमुनेदार उदाहरणच आहे.

कालाच्या ओघांत सांपडल्यामुळें **राणीसाहेब** इंग्रजांच्या शत्रु
बनल्या हें अगदीं उघडच आहे; पण दहा अकरा वर्षांच्या पोराकडे
कितपत दोष येतो हें ठरविणें राजनीतीचें काम असल्यामुळें आम्ही
त्याबद्दल कांहींच लिहूं शकत नाहीं. दामोदररावांचें लग्न त्यांच्या
चुलतीनें अंगावरचे दागदागिने विकून केलें. रावांच्या लग्नाकरितां
इंग्रजसरकाराकडे पैशांची मागणी केली होती; पण ती त्यांनीं
धुडकावून लाविली. रावांची पहिली बायको भाटवडेकर घराण्यांतील
असून ती इ० सन १८७२ सालीं वारली. तेव्हां शेवडे घराण्यांतील
एका मुलीबरोबर त्यांचें दुसरें लग्न झालें. ह्या बायकोपासून सन १८७३
त त्यांस एक मुलगा झाला. त्याचें नांव लक्ष्मणराव. ह्यांचा अभ्यास
इंदुरास झाला. तेच हल्लीं हयात आहेत. दामोदरराव हे नुकतेच
वारले. अशा तऱ्हेनें दामोदररावांचा जो इतिहास सांपडला तो देऊन
हें प्रकरण पुरें करतों.

राणीसाहेब ज्या वेळीं वार लागून पडल्या, त्या वेळीं त्यांच्या बरोबर असलेल्या मंडळींस त्यांनीं असें सांगितलें कीं, काय वाटेल तें करा, पण माझें प्रेत इंग्रजांच्या हातीं लागूं देऊं नका. त्याप्रमाणें रामचंद्रराव वगैरे मंडळींनीं जवळच्या गंजींतून गवत आणवून चिता करून राणीसाहेबांचें दहन केलें. ह्या गोष्टीस आज सुमारें ७२ वर्षें झालीं. त्यामुळें राणीसाहेब पडल्या कोठें व त्यांचें दहन कोठें केलें, ती जागा समजेनाशी झाली होती. पण ग्वाल्हेरदरबारच्या पुराण–वस्तु–संशोधन खात्यानें आतां ती जागा शोधून काढून, त्या ठिकाणीं चौथरा बांधून त्यावर तुळशीवृंदावन बसविलें आहे. व सभोंवार लोखंडी कठडा घातला आहे. ह्या चौथऱ्यालाच छत्री अगर समाधि असें म्हणतात.

**नवी माहिती**

ह्या छत्रीच्या चारी बाजूंवर संस्कृत, मराठी, हिंदी, व इंग्रजी ह्या भाषांत राणीबद्दल मजकूर लिहिला आहे. त्यांतील मुद्दयाचा मजकूर पुढें देतों––

राणीचा जन्म ता. १९ नोव्हेंबर १८३५ मध्यें झाला. राणी ता. १८ जून १८५८ मध्यें लढाईंत पडली. हिजहायनेस महाराजा जयाजीराव शिंदे अलिजाबहाद्दर ह्यांनीं ग्वाल्हेरच्या पुराण-वस्तु–संशोधन खात्याकडून सन १९२९ मध्यें ही छत्री बांधविली. वरील जयाजीरावमहाराज हल्लीं १४–१५ वर्षांचे आहेत व ते देशाभिमानीही आहेत. त्यांना लहान मुलांचीही फार आवड आहे. हेच ग्वाल्हेरच्या गादीचे मालक आहेत. दुसऱ्या बाजूवर थोडक्यांत तिचें हिंदी भाषेंत चरित्र दिलें आहे, व शेवटीं असें म्हटलें आहे कीं, 'राणी लक्ष्मीबाईनें आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे'. इंग्रजांचा मुख्य सेनापति सर ह्यू रोज ह्यानें असे उद्गार काढले आहेत कीं, 'बंडवाल्यांच्या सैन्यामध्यें सर्वांत शूर व सेनानायक अशी झांशीची

राणीच होऊन गेली'. छत्रीच्या एका बाजूवर तांबे ह्या नांवाच्या कवींनीं केलेला पोवाडा कोरला आहे. तो फारच चांगला आहे.

## पोवाडा

रे हिंदबालका थांब । या स्थळीं अश्रु दोन ढाळीं ॥ ध्रु०॥
तांबे-कुल-वीर श्री ती
नेवाळकरांची कीर्ती
हिंदभू-ध्वजा जणुं जळती
मर्दानी राणी लक्ष्मीबाई, मूर्त महाकाली॥
कडकडा कडाडे बिजली
शत्रुचीं लष्करें थिजलीं
मग कीर्तीरूपें उरलीं
ती पराक्रमाची ज्योत, मालवे इथें झांशीवाली
गातील इथें शाहीर
लववितील माना वीर
तरु, झरे ढाळितिल नीर
या दगडा फुटतिल जिभा, कथाया कथा, सर्वकाळीं

ह्याप्रमाणें राणीसंबंधीं जी जी माहिती मला मिळाली ती मीं देण्याचा प्रयत्न केला आहे. ज्या कोणास राणीसंबंधीं आणखी माहिती असेल, त्यांनीं मला कृपा करून कळविल्यास व निरनिराळे फोटो पाठविल्यास त्यांचा मी आभारी होईन.

REFBK-0004114

समाप्त

क्र. ८०९४

# अभिप्राय

येथील न्यू इंग्लिश स्कूल व सेवासदन यांतील शिक्षक रा० रा० **घनश्याम बाळकृष्ण चिपळूणकर** यांनीं लिहिलेलें **बालबोध शिक्षणमालें**तील पांचवें पुस्तक "**महाराणी लक्ष्मीबाई-झांशी**" हें मीं समग्र वाचून पाहिलें. ज्या वर्गासाठीं हें पुस्तक लिहिण्यांत आलें आहे, त्याचा विचार करतां **पुस्तक चांगलें साधलें आहे, यांत कांहीं संशय नाहीं.** मनुष्यजातीस ललामभूत झालेल्या महाराणी लक्ष्मीबाईसाहेब यांच्या अनेक सद्गुणांचें वर्णन करतांना जेथें अडाणी लेखण्याही स्फुरण पावूं लागतात, तेथें रा० चिपळूणकरांसारख्यांच्या **कसलेल्या लेखणीनें** त्यांचें वर्णन स्फूर्तिकारक व रसभरित भाषेंत करावें, यांत आश्चर्य तें काय ! सदरहु छोटेखानी पुस्तकांत सत्तावन सालच्या बंडांतील ज्या ज्या प्रसंगांशीं लक्ष्मीबाईसाहेबांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें संबंध आला, त्याबद्दलचा संगतवार मजकूर देण्यांत आलेला आहे. लहान मुलां-मुलींच्या हातीं **बारगट** पुस्तकें पडूं देण्याऐवजीं हें पुस्तक त्यांचे हातीं देऊन तें त्यांनीं वाचल्यास अगर त्यांचेकडून वाचवून घेतल्यास त्याचा त्यांच्या मनावर इष्ट असाच परिणाम घडेल व **ग्रंथकर्त्याचा उद्देश** ब-याच अंशांनीं सुफलित होईल, असा भरंवसा वाटतो. पुस्तकाच्या मानानें त्याची किंमतही माफकच ठेवण्यांत आली आहे. लहान मुलां-मुलींच्या ग्रंथालयासाठीं पुस्तक संग्राह्य झालें आहे.

पुणें,
ता. २७।१०।२७.

ल. ब. भोपटकर.

# बालबोध शिक्षणमाला

## ग्रंथकर्त्यांच्या मालकीचीं पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| १ | **महाराणी लक्ष्मीबाई झांशी** [सरकार-मंजूर] ... | किं. ८ आ. |
| २ | **निबंध कसे लिहावे ?** [ „ ] ... | „ ६ „ |
| ३ | **घरगुती सोपा जमाखर्च** (चौथीकरितां)[सरकार-मंजूर] | „ २ „ |
| ४ | **नवीन सुबोध व्याकरण** (फक्त इयत्ता तिसरीकरितां) | „ २ „ |
| ५ | **नवीन सुबोध व्याकरण** (तिसरी व चौथिकरितां टेक्स्ट् बुक) [मि॰ डायरेक्टरसाहेब ह्यांजकडून मंजुरी मि.] | „ ४ „ |
| ६ | **नवीन सुबोध व्याकरण** (पांचवीकरितां) [मंजुरीस पाठविलें आहे] ... | „ ४ „ |
| ७ | **नवीन सुबोध व्याकरण** (इयत्ता ६–७ करितां) [छापण्याचें काम चालू आहे.] | |
| ८ | **मुलांचीं फुलें** (अभिनयगीतें, लहान मुलांकरितां) | „ ४ „ |
| ९ | **घरगुती व व्यापारी जमाखर्च** (इयत्ता ५, ६, ७ व मुलांमुलींची व्ह. फा करितां.] | „ ५ „ |

हीं सर्व पुस्तकें **ग्रंथकर्त्याकडे**–८९९ सदाशिव पेठ, पुणें, येथें आणि **ल. ना. गोडबोले, नवीन किताबखाना, पाठक** बुकसेलर, **परचुरे, पुराणिक** आणि **मंडळी**, ह्यांजकडे मिळतील.